कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M-2133 विषय

नांव चिकीत्सा परिक्षन

लेखक / लिपीकार डॉ. केशव. लक्ष्मण दप्तरी

पृठ ~~1-202~~ काळ ______ पूर्ण / अपूर्ण
1-202

Checked 2012

चिकित्सा परीक्षा:

१ ते ५ पानांतील मजकूर

आज ह्या भारतखंडात आयुर्वेद, युनानी, ॲलोपथी, होमिओपॅथी, बायोकेमिस्ट्री, क्रोमोपॅथी, सायकोपॅथी, हायड्रोपॅथी इत्यादि अनेक चिकित्सापद्धती प्रचलित (प्रचारांत) आहेत आणि प्रत्येक पद्धतीप्रमाणे चिकित्सा करणारे अनेक वैद्यही आहेत. या प्रत्येक पद्धतीला पुरस्कर्ते आमचीच पद्धती उत्तम ~~वा~~ आणि इतर कुचकामाच्या व निरुपयोगी आहेत असे म्हणत असतात. रोग्यांच्या दृष्टीने पाहिल्यास प्रत्येक पद्धतीने ह्या बरे झालेले व बरे न झालेले असे अनेक रोगी दिसून येतात. याशिवाय, एका चिकित्सा पद्धतीने दुरुस्त न झालेले परंतु कोणत्या तरी दुसऱ्या पद्धतीने दुरुस्त झालेले असेही अनेक रोगी दिसून येतात. ह्या अशा परिस्थितीमुळे रोग्यांची व त्यांच्या हितचिंतकांची मनःस्थिती फार भांबावल्यासारखी होते. आपण कोणत्या वैद्यांचा आश्रय करावा हे त्यांना सुचेनासे होते. त्या प्रश्नाचा विचार कोणत्या रीतीने करावा ~~हेही त्यांस समजत नाही~~ ~~त्यांस सुचेनासे होते~~ हेही त्यांस समजत नाही. बहुतकरून अमक्या वैद्याने अनेक रोगी दुरुस्त केले म्हणून, किंवा अमका वैद्य मोठ्या पदवीने अलंकृत आहे म्हणून किंवा अमक्याला प्रसिद्धि आहे म्हणून त्याचेकडे जावे अशा किंवा इतर कोणत्या तरी गौण रीतीने विचार होत असतो. परंतु वास्तविक पाहता या विषयाचे दोन भाग केले पाहिजेत.

गौणरीतीने *

खरी — खरोखर आरोग्यकारक चिकित्सा कोणती, या खऱ्या पद्धतीप्रमाणे कुशलपणे ~~[illegible]~~ निर्भयपणे चिकित्सा करणारा कोण? ~~हा दुसरा विचार~~. असा विभागशः विचार केला तरच आपल्या प्रश्नाचे उत्तर ~~बरोबर~~ येऊन रोग्याला सुख होईल.

ह्या वरील प्रश्नाच्या दोन भागांपैकी, दुसऱ्या भागाचा विचार फारसा कठीण नाही. किंवा तो युक्तीने सोडविला गेल्यास त्याचे मोठासा धोकाही नाही. कारण, प्रश्नाच्या पहिल्या भागाचे उत्तर ठरविल्यानंतर पसंत पडलेल्या चिकित्सापद्धतीच्या ज्या वैद्याने पद्धतीत पुरस्कर्त्या मनुष्याकडून पुरेसा कालपर्यंत त्या पद्धतीचे अध्ययन केले आहे व अनुभव घेतला आहे व जो साधारण बुद्धिमान आहे असा कोणताही मनुष्य त्या पद्धतीप्रमाणे बिनचूक चिकित्सा करू शकेल, असे मानण्यास काही हरकत ना तसेच त्या पद्धतीचा स्वतंत्रपणे अभ्यास करणारा जरी असला परंतु ज्याने त्या पद्धतीचा अनुभव पुष्कळ दिवस घेतला व त्याचे ताब्यात बरे झालेल्या रोग्यांचे प्रमाण बरेच मोठे असेल, तरीही तो त्या पद्धतीप्रमाणे बिनचूक चिकित्सा

२ ~~३~~ २

शकेल असे मानण्यास हरकत नाही. कदाचित् त्या पद्धतीप्रमाणे चिकित्सा करणाऱ्या चिकित्सकाच्या ठिकाणी असावी तितकी कुशलता नसली तरी त्या चिकित्सकाच्या आशयामुळे अशा चिकित्सेत विषयात असलेल्या मनुष्याकडे गाफीलपणा जितका धोका आहे त्यापेक्षा त्या पद्धतीत असलेल्या चिकित्सापद्धतीप्रमाणे चिकित्सा करणाराकडे गाफीलपणा अधिक होणे धोका आहे — एकंदरीत वरील प्रश्नाच्या दुसऱ्या भागाचा विचार कठीण नाही असे स्पष्ट दिसते.

वरील प्रश्नाच्या पहिल्या भागाचे मात्र तसे नाही. तो विचार करण्याकरिता चालू असलेल्या सर्व चिकित्सा पद्धतींचे पूर्णपणे अध्ययन करावे लागेल; व त्या सर्व चिकित्सा पद्धतीप्रमाणे चिकित्सा करण्याइतके कौशल्य मिळविण्याची जरी गरजी नसली तरी तुलनात्मक दृष्टीने त्यांचा विचार करता येईल इतके अध्ययन प्रत्येक चिकित्सा पद्धतीचे केले पाहिजे. हे काम फारच कठीण आहे खरे. तरी प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा (जो प्रश्न सोडविण्यावर मनुष्याचे जीवित अवलंबून आहे असा) असल्यामुळे त्याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे हे ही खरे. म्हणून, या प्रश्नाचा विचार करणे सोपे जावे या उद्देशाने हा प्रश्न सोडविण्याकरिता आम्ही जो काय स्वल्प कोटीचा विचार केला तो सर्व लोकांपुढे 'चिकित्सा परीक्षण' ह्या ~~निबंध~~ निबंधाच्या रूपाने ठेवणे आम्हाला अवश्य दिसते.

भांबावलेल्या रोग्यांना किंवा त्यांच्या हितचिंतकांना त्यांनीच खरी चिकित्सा पद्धती कोणती हे ठरविणे जरूर आहे असे नाही तर कोणत्याही पद्धतीप्रमाणे चिकित्सा करणाराला ही ते अवश्य आहे. लोकांचे प्राण हातांत घेणाऱ्या प्रत्येक ~~मनुष्याने~~ चिकित्सकाने आपण खऱ्याच पद्धतीने चिकित्सा करीत असतो अशी आपली खात्री करून घ्यावी हे त्याचे कर्तव्य आहे. अशी खात्री करून घेण्याकरिता त्याने चालू असलेल्या सर्व चिकित्सा पद्धतींचा तुलनात्मक दृष्टीने विचार करणे जरूर आहे. कारण प्रत्येक चिकित्सा पद्धतीने काहीनाकाही तरी रोगी दुरुस्त होतात. अर्थात्, त्या प्रत्येक चिकित्सा पद्धतीत चिकित्सेच्या सत्यत्वाचा काहीतरी आशय असला पाहिजे. तो सत्यांश तुलनात्मक विचार केल्याने जसा स्पष्टपणे दिसून येईल तसा तो एकाच पद्धतीच्या अभ्यासाने स्पष्टपणे दिसणार नाही — कदाचित् दिसूनही येणार नाही हे उघड आहे. आणि म्हणूनच, सर्व चिकित्सा पद्धतींच्या चिकित्सकांच्या प्रीत्य

म्हणजेच प्रत्येक
व्यवहारावर
~~[illegible]~~
वाटत नाही

यांच्या सूक्ष्म व शास्त्रीय विचारांकरिता हे योके सायन्टीफिक ठेवणें आम्हाला जरूर दिसते. आणि त्यांनीही "भिषग्बुद्धिमान् अतः स्वगुणसंपदि परं प्रयत्नमातिष्ठेत् प्राणदः स्याद्यथा नृणां" (श्लो० १३२, सू० स्था० अध्याय ९, चरकसंहिता)

या चरकोक्त वचनास अनुसरून या निबंधांतील मुद्यांचा सूक्ष्मपणें, अनुभवाच्या दृष्टीने सर्व विकाररहित मनाने विचार करावा. आणि त्या विचारांतें जो काही त्यांच्या मनाचा निर्णय होईल त्याप्रमाणे वागावें, व तो निर्णय लोककल्याणार्थ साधक बाधक प्रमाणांसहित सर्व लोकांपुढे ठेवावा अशी त्यांना आम्ही विनंती करतो.

आतां प्रचलित चिकित्सापद्धतींचें निरीक्षण योग्य रीतीनें करण्याकरिता प्रथमतः रोगचिकित्सा करण्याची निसर्गसिद्ध रीति कोणती याचा विचार करूं.

जी गोष्ट सर्व मनुष्यांच्या शरीरांत नसते किंवा एखाद्या मनुष्याच्या शरीरांत हमेशा नसते आणि ज्या गोष्टीमुळे मनुष्यास दुःख होतें अथवा असामर्थ्य उत्पन्न होतें किंवा शरीराच्या आंतील किंवा बाहेर वैरूप्य उत्पन्न होतें त्या गोष्टीस रोगचिन्ह म्हणतात. आणि अशा एक किंवा अनेक गोष्टी मनुष्यास झाल्यास त्याला रोग झाला असे आपण म्हणतो. उदा०- खोकला हा सर्व मनुष्यांत नसतो किंवा एखाद्या मनुष्यांत हमेशा नसतो व त्याने मनुष्यास दुःख होतें म्हणून खोकला हे एक रोगचिन्ह आहे. डोळ्यांत टीक पडणें दुःखकारक नसले तरी डोळ्याचे पाहण्याचे सामर्थ्य ~~नाहींसे~~ नाहींसे ~~करणारे आहे~~ करणारे आहे, म्हणून ते रोगचिन्ह होय — पांढरा कोड वैरूप्य करणारा म्हणून तो रोगचिन्ह होय.

त्यामुळे ~~नाहींसे होते~~

रोगचिन्हांशिवाय रोग आहे असे समजू शकत नाही अर्थात् रोगचिन्हें नाहींशी झाल्यास रोगही गेला हे मानले पाहिजे. म्हणून, रोगचिन्हें नाहींशी करण्याची जी क्रिया तीच चिकित्सा होय.

रोगचिन्हें नाहींशी करण्याचा एक उपाय फार उघड आहे. ज्या कारणामुळे रोगचिन्हें उत्पन्न झालेली दिसतात तें कारण नाहींसे करणें, हाच तो उपाय होय. उदा० बाण किंवा बंदुकीची गोळी शरीरांत घुसल्यामुळे दुःख, ताप, सूज व पू झाला असल्यास बाण किंवा गोळी काढून टाकणें ही

चिकित्साच आहे. तितक्याच पुष्कळदा रोग बरा होतो. दररोज जास्त अन्न खाल्ल्याने पोट दुखत असल्यास जास्त अन्न खाणे बंद करणे, इस्मार्च धमनी किंवा शीर कापली गेल्यास ती बांधून टाकणे, घशांत घास रुतून बसून श्वासोच्छ्वासमार्ग बंद झाल्याने गुदमरून मरण्याची वेळ आल्यास श्वासनलिकेस घशाखाली भोक पाडून श्वासोच्छ्वासमार्ग (घास रुतून बसल्या ठिकाणी नव्हे तर श्वासनिरोधाने होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी) खुला करणे वगैरे क्रिया म्हणजे रोगाचे कारण नाहीसे करणेच होय. एकंदरीत, कोणत्याही रोगाचे कारण नाहीसे करणे हे चिकित्सेचे एक अंग आहे हे निर्विवाद आहे.

= परंतु रोगाचे कारण काढून टाकल्यानेच सर्व रोग बरे ~~होत~~ होतात असे नाहीत. आणि कित्येक रोगांचे तर कारणच समजत नाही. आंबट फार खाल्ल्याने खोकला येतो, तरी आंबट न खाल्ल्यानेच खोकला बसतो असें नेहमी घडून येत नाही. रक्तार्बुदाचें (Cancer) कारण वैद्यशास्त्रांत देखील अजून ठरले नाही. राजयक्ष्मा (Tuberculosis), महाकुष्ठ (Leprosy), भूतोन्माद (Hysteria) वगैरे रोगांचे कारण आनुवंशिकत्व हें होय. अशी कारणें समजली तरी अपरिहार्य असतात. अशा प्रसंगी चिकित्सा कशी करावी हाच मुख्य प्रश्न आपणास सोडवावयाचा आहे.

अशावेळी रोगचिन्हांच्या उलट (व्याधिविपरीत) किंवा रोगचिन्हांच्या कारणांच्या उलट (हेतुविपरीत) क्रिया करावी अशा दोन कल्पना प्रथमतः कोणासही येतात. त्यांपैकी रोगचिन्हाच्या कारणाच्या उलट (हेतुविपरीत) क्रियेचा प्रथमतः विचार करू. या प्रकारची चिकित्सा करण्यांत बऱ्याच अडचणी आहेत. त्यांपैकी रोगाचे कारण वैद्यशास्त्रासही माहीत नसणे ही एक. आणि दुसरी, रोगाचे कारण माहीत असले तरी, त्या कारणाच्या विपरीत गोष्ट कोणती हे न समजणे! उदा० आंबट

खोकला उत्पन्न होतो हे खरे; तरी आंबटाच्या विपरीत काय हे आपणाला सांगता येत नाही. गोड किंवा तिखट किंवा खारट वगैरेपैकी आंबटाच्या विरुद्ध कोणते ते आपण निश्चयपूर्वक सांगू शकत नाही. तिसरी अडचण — रोगाची कारणे वैद्यशास्त्राला माहीत असली तरी त्यांपैकी ज्याची चिकित्सा करावयाची असेल त्या बिमाराच्या बिमारीत कोणते कारण घडले हे, बिमार आपली हकीकत बरोबर सांगू शकत नसल्याने; किंवा त्या रोगाची अनेक कारणे संभवत असल्याने; हेतुविपरीत चिकित्सा करता येणार नाही. या अडचणींमुळे हेतुविपरीत चिकित्सा ही फार कमी दर्जाची ठरते.

तथापि, या गोष्टीकडे दुर्लक्ष करून; हेतुविपरीत चिकित्सेचा विचार करू.

हेतुविपरीत चिकित्सा म्हणजे ज्या कारणाने रोग उत्पन्न झाला त्याच्या उलट अशा परिस्थितीचा रोग्यावर प्रयोग करणे. उदा० उष्णतेने ताप आला असल्यास त्यावर शीतजल स्नानाचा प्रयोग करणे किंवा जास्त खाल्ल्याने झालेल्या रोगावर लंघनाचा प्रयोग करणे. या हेतुविपरीत चिकित्सेच्या ठिकाणी दोन प्रकारची शक्ती आहे. रोगाचे जे कारण त्याला नाहीसे करण्याची शक्ती. जसे थंडी ही उष्णतेला नाहीसे करू शकते. ह्या शक्तीचा चिकित्सेत काहीच उपयोग नाही. कारण, हिने रोगाचे कारणच फक्त नाहीसे करता येते. पण ते रोगाचे कारण तर आपले रोगरूपी कार्य करून [~~पूर्वीच नाहीसे झालेले~~] — — — — — — — — — — —

— — — — — — — — —

करून पूर्वीच नाहीसे झालेले असल्यास व चिकित्सेच्या वेळीं अस्तित्वांत नसते. आतां हेतुविपरीत चिकित्सेच्या ठिकाणी दुसरी शक्ती म्हणजे रोग उत्पन्न करण्याची आहे, ही गोष्ट पुढील वचनांत सांगितलेली आहे:—

शक्ती

कालार्थकर्मणां योगो हीन मिथ्याति मात्रकः
सम्यग्योगश्च विज्ञेयो रोगारोग्यैक कारणं॥१॥ वाग्भट सु.सा.अध्याय १

[अर्थ:— काल इंद्रियांचे विषय आणि कर्म यांचा वाजवी पेक्षां कमी अगर जास्त किंवा अयोग्य संबंध हेंच एकंदर रोगांचे कारण आहे. आणि यांचा वाजवी उपयोग करणें हें आरोग्याचे मुख्य कारण आहे.] म्हणजे जास्त खाणें ~~हे~~ जसे रोगोत्पादक आहे तसेंच कमी खाणेंही रोगोत्पादक होते. ~~वाज~~ वाजवी पेक्षां जास्त उष्णता, ज्याप्रमाणें रोगोत्पादक आहे त्याचप्रमाणें ~~वाजवी पेक्षां~~ कमी उष्णता म्हणजेच थंडी, हीही रोगोत्पादकच आहे. तसेंच अतिनिद्रा किंवा जागरणही दोन्ही किंवा अति मेहनत किंवा आळस ही दोन्ही रोगोत्पादकच आहे. असा वरील वचनाचा अर्थ आहे, व तो अनुभवसिद्धही आहे.

एकंदरीत, हेतुविपरीत चिकित्सेची दुसरी शक्ती म्हणजे रोगोत्पादक शक्ती; व तिने उत्पन्न होणारा रोग चिकित्स्य रोगाच्या सारखाच किंवा चिकित्स्य रोगाहून भिन्न असा असेल. म्हणजे हेतुविपरीत चिकित्सा दरवील, पुढें ज्याचें विवेचन केलें आहे त्या समचिकित्सा (विपरितार्थकारी चिकित्सा) ~~विपरीत~~ विपरीत चिकित्सा व अन्य रोगोत्पादी चिकित्सा यांपैकी कोणती तरी एका चिकित्सेंत अंतर्भूत होईल. अर्थात, हेतुविपरीत चिकित्सेचा स्वतंत्र विचार करण्याची जरूरी नाही.

(प्यारा)

आता व्याधि विपरीत चिकित्सेचा विचार करूं. ताप आला असता ~~गार शेक~~ थंड पाण्याने स्नान करणे, किंवा अंग थंड गार ~~करणे~~ पडले असता त्यास शेकून उष्ण करणे, मलबद्धतेवर रेचक औषधे देणे ही या चिकित्सेची उदाहरणे होत. हीच चिकित्सा खरी असली पाहिजे असेच प्रथम दर्शनी कोणासही वाटते. परंतु, शरीर हे केवळ निर्जीव यंत्र नाही. ते जीवंत यंत्र आहे, त्यामुळे कोणतीही क्रिया स्वस्थपणे सहन करण्या ऐवजी त्या क्रियेनंतर शरीर प्रतिक्रिया करीत असते. ~~हे~~ या गोष्टीचा विचार केल्यास, प्रथमदर्शनी विपरीत चिकित्सा हीच खरी चिकित्सा असे जे वाटते ते चूक आहे असेच कोणाही समंजस मनुष्यास दिसून येईल. म्हणून, शरीराच्या प्रतिक्रिये संबंधी जे नियम दिसून येतात त्यांचे ज्ञान करून घेणे जरूर आहे. म्हणून आता आम्ही तिकडेच वळतो:

~~शरीर क्रिया~~ शरीर प्रतिक्रिये संबंधी पुढील नियम दिसून येतात:—

(१) शरीराच्या सहनशक्ती पेक्षा कमी जोराची अशी कोणतीही क्रिया थोडा वेळ करून ती बंद केली तर क्रियेइतकीच विपरीत क्रिया म्हणजे प्रतिक्रिया करून शरीर पूर्व स्थितीवर येते. (Organon; para 66)

(२) शरीराच्या सहनशक्तीपेक्षा जास्त जोराची कोणतीही क्रिया थोडा वेळ करून बंद केल्यास क्रियेपेक्षाही जास्त जोराची प्रतिक्रिया होते आणि ती मुळे क्रियेच्या अंती ~~जी~~ शरीराची जी स्थिती होती तिच्या विपरीत अशी स्थिती शरीरास प्राप्त होते.

(३) शरीरावर कोणतीही क्रिया एकसारखी फार वेळ करीतच गेले किंवा ती क्रिया फारच तीक्ष्ण असली तर प्रतिक्रिया फार उशीरा सुरू होते; किंवा क्रियेच्या जोरामुळे, ~~जोर~~, क्रियेच्या तीक्ष्णतेमुळे किंवा अवधीमुळे प्रतिक्रियाच होऊं शकत नाही.

पहिल्या नियमाची सत्यता कोणासही सहज पटेल. शरीरावर शीत, उष्ण, पाणी, हवा, ~~[illegible]~~ तीक्ष्णता इत्यादि ~~[illegible]~~ (तीक्ष्णादि) गुणकारक पदार्थ यांची जेव्हा क्रिया

होत असुनही शरीर क्वचितच रोगी होते. आणि बहुतेक निरोगीच असते. क्वचित म्हणण्याचे कारण उघड आहे. प्रत्येक मनुष्याची जी सहन शक्ति आहे त्यापेक्षां जास्त अशी रोगकारक क्रिया झाल्यास तो रोगी होतो. परंतु या मर्यादेचे जो पर्यंत उल्लंघन होत नाही तोपर्यंत तो निरोगीच राहतो. उदा० शरीराची निरोगी स्थितीतील उष्णता जरी ९८° आहे, तरी असा मनुष्य दहा-पाच तास शंभर किंवा आधीक अंश उष्णतेच्या हवेतून सहज फिरून येतो, व त्यामुळे त्यास परिणामी कोणताच विकार होत नाही. हिवाळ्यामध्ये, अग्नीचे परिमित सेवन करणाऱ्यास थंडी वाजत नाही. ह्यावरून, अल्प क्रियेनंतर शरीर तितकीच प्रतिक्रिया करून पूर्व स्थितीवर येते हे उघड आहे. ही प्रतिक्रिया शक्ती शरीराच्या ठिकाणी नसती तर शरीर घटकाभर देखील जीवंत राहू शकणार नाही हेही पण उघडच आहे.

दुसरा नियम पुढील उदाहरणांनी सिद्ध होतो.

(१) शरीरावर बराच वेळ थंडीचा असर केल्यास पुढे पहिल्या नियमाप्रमाणे शरीर केवळ स्वास्थ्य-स्थितीवर न येतां ताप येतो (२) मद्यपानाने शरीरास पहिल्याने फार उत्साह येतो परंतु पुढे लवकरच पहिल्या नियमाप्रमाणे शरीर स्वस्थस्थितीवर न येतां शरीरास थकवा येतो (३) रेचक औषधाने पहिल्याने रेच होतात पण पुढे मलावष्टंभ होतो. (४) उष्णतेचा शरीरावर असर केल्यास, प्रथम शरीर उष्ण होते पण पुढे लवकरच फार थंड होते. (५) अफूने प्रथमतः मलावष्टंभ होतो पण पुढे हागवण लागते. अशी अनेक ~~उघड~~ उदाहरणें ~~देता येतील~~ देता येतील. ~~दिली आहेत.~~ ~~ह्यावर दिलेल्या उदाहरणां संबंधाने ग्रंथोक्त पुरावाही आहे. तो पुढे दिला आहे.~~

P. 544

~~परंतु~~

~~१. पुढें हेंसंबंधें लागतें.~~

अशी ~~अनेक उदाहरणें देतां~~ येतील पण येथें साधारण जनतेच्या अनुभवांत असलेलींच उदाहरणें दिलीं आहेत. हीं वर दिलेल्या उदाहरणांसंबंधानें ग्रंथांत पुरावाही आहे, व तो पुढें दिला आहे:

plete

"The direct or primary effect of cold is to depress, cool, and deplete the part concerned. If its exhibition is brief, reaction (an important factor in hydropathic practice) quickly establishes an opposite condition, stimulating the part and determining an increased flow of blood to it, with increase of its temperature and vital activity. If it is continuous, the primary depression is maintained and the revulsive or secondary effect delayed or averted. The direct effect of heat is to increase the amount of blood present; but if the exhibition is brief, and evaporation is permitted, the contrary effect is produced viz., depression, coolness, and depletion. If it is continuous the primary effect is preserved. Thus with truth it may be said that cold heats and heat cools, while the converse holds good, and that by simple variations of detail." ~~From the intermediate temperature (80° to 100°) simple sedative effects are obtained with absence of secondary or revulsive effects in proportion as the temperature of the part is approximated to.~~

Folds

*||

~~("Encyclo-Brit.", Hydropathy 544)~~
~~9th edition.~~

("Encyclopaedia Britanica", 9th Edition, Hydrop. P. 574)

अर्थ :- थंडीचा प्रत्यक्ष किंवा प्राथमिक परिणाम असा आहे की, ज्या भागांस थंडी लावावी तो भाग थंड होतो, तेथील प्राणक्रिया कमी होते आणि तेथील रक्तवाहिन्यांतील रक्तही कमी होते. थंडी जर थोडा वेळच लावण्यांत आली तर परिणामानंतर ~~प्राथमिक [illegible]~~ प्रतिक्रिया

थंडीच्या क्रियेनंतर प्रतिक्रिया होऊन विरुद्ध स्थिती प्राप्त होते. म्हणजे, ज्या भागा-

से. उत्तेजित करून तेथील ~~[illegible]~~ प्रतिक्रिया ~~जोराने होते~~ जास्त आणविते, तेथें रक्तही जास्त ~~येते~~ आणते आणते तेथील उष्णताही वाढविते. ≠ ही प्रतिक्रिया (हैड्रोपॅथिक) जलचिकित्सा पद्धतीमध्यें ~~आ~~ ~~हे प्रतिक्रिया~~ अत्यंत महत्वाची आहे) म्हणजे जलचिकित्सा करतांना या प्रतिक्रियेचा विचार करावा लागतो. ≠ थंडी जर एकसारखी पुष्कळ वेळपर्यंत ~~लावलेच गेली~~ लावल्या गेली तर प्राथमिक परिणाम पुष्कळ वेळ कायम ~~[illegible]~~ राहतो आणि प्रतिक्रिया फार उशीरा सुरु होते किंवा मुळींच होत नाहीं. उष्णतेचा प्रत्यक्ष परिणाम ज्या भागास उष्णता लावली असेल तेथील रक्त वाढविणें हा आहे; परंतु उष्णता थोडाच वेळ लावली तर ~~व त्या भागांतील~~ शरीराच्या पाण्याची वाफ होऊं दिली तर विरुद्ध परिणाम होतो. म्हणजे त्या भागांतील प्राण-क्रिया कमी होऊन तो भाग थंड होतो व ते ~~तेथील~~ रक्त ही देखील कमी होते. उष्णता एकसारखी पुष्कळ वेळपर्यंत लावली तर प्राथमिक परिणामच कायम राहतो. या प्रमाणें, थंडीनें उष्णता उत्पन्न होते व उष्णतेनें थंडी उत्पन्न होते ~~आणि हे खरेंच आ~~ असें जर कोणी म्हणेल तर ते खरें आहे. आणि तसेंच उष्णतेनें उष्णता वाढते व थंडीनें थंडी वाढते, हेंही ~~म्हणणेंहि~~ खरें आहे. आणि ते उष्णता आणि थंडी लावण्याच्या प्रकारांत फरक केल्यानें होते.

*||

- After absorption ~~its~~ its (i.e. of alcohol) action is marked on heart + circulation. The pulse become fuller + stronger + beats quicker. As a result of this activity the mind becomes exhilarated, muscular power increased, more urine is passed + the skin perspires more freely.

this stimulant action does not last long and is soon followed by depression which is rather persistant. ~~It is therefore a mistake~~ to suppose that alcohol can help a person to perform more bodily work without bodily fatigue. ~~(Materia Medica & therapeutics, by R. Ghosh, L.M.S. edited by C. P. Lukis M.D. F.R.C.S. page 215)~~

not Cancelled

अर्थः- मद्य शरीरांत गेल्यानंतर त्याचा परिणाम हृदय आणि रक्ता-
भिसरण ह्यावर जोरदार असा होतो. धमनी (नाडी) जास्त भरीव व
जोरदार होते आणि जलद चालते. ह्या मुळें मनही अत्यानंदित
होते. स्नायूंची शक्ती वाढते. मूत्र जास्त होते. आणि घामही जास्त
येतो. परंतु ही उत्तेजन क्रिया फार वेळ राहत नाहीं. आणि ति-
च्यानंतर लवकरच थकवा येतो व तो उत्तेजनाचे मानानें
बराच वेळ राहतो.

याप्रमाणें शरीर सुस्थितींत असतां त्यावर क्रिया केल्यास तें
प्रतिक्रिया करतें हें उघड आहे. शरीर रोगी असतें तरी
क्रियेवर अशीच म्हणजे सुस्थितींत असल्याप्रमाणेंच प्रतिक्रिया
करतें. उदा० १०४° ताप असलेल्या मनुष्याचा ताप शीत-
जल स्नानानें उतरविला तर तो ताप पुनः १०४° पर्यंत किंवा
जास्त देखील चढतो.

"By ~~these~~ such means (i.e. by cold baths for 20 or 30 minutes), no doubt, the temperature can often be reduced two or three degrees F. Fahrenheit; but it is very apt to rise again and the bath must then be repeated (Encyclo Brit. ~~Encyclopedia~~, Typhoid, 680)

अर्थः- ह्या उपायानींहि. २० अगर ३० मिनिटें शीतजलस्ना
दिल्यानें) ताप दोन-तीन अंश निःसंशय कमी होतो
परंतु तो बहुतकरून पुनः चढतोच. आणि तेव्हां पुनः
शीत जलस्नान दिलें पाहिजे.

"The influence of a single bath upon the immediate condition of the patient is generally pronounced. Headache, delirium, stupor are at once diminished; the tongue becomes clea pulse slower and firmer, and the patient feels altogether relieved. But this effect is only temporary and by the next observation the temperature may be as high as before." (~~Taylor's Typhoid 54~~) (Taylor's Practice of Medicine, Typhoid, P. 91, Edition of 1925)

अर्थ :— विषमाच्या तत्कालीन स्थितीवर (शीतस्नानाचा परिणाम स्पष्ट दिसून येण्यासारखा होतो. डोके दुखणे, बडबड, मूर्च्छा हे एकदम ~~ते~~ कमी होतात. जीभ स्वच्छ होते, नाडी मंद आणि जोरदार होते आणि विषमाला, आगदी आराम वाटतो. परंतु हा परिणाम ~~क्षणिक~~ तात्पुरता असतो आणि नंतर पुन: ~~पाहण्याच्या वेळीं~~ ~~पाहिले असतां~~ स्नानापूर्वी जितका ताप होता तितकाच ताप असूं शकतो.+

पाहिले असतां

ताप प्रथमत: कमी करणाऱ्या औषधांच्या परिणामीही असाच होतो.

* Stronger antipyretic drugs :— These are sometimes given in single doses when the temperature reaches a certain height such as 102° or 103°. The result is that the temp. falls within two or three hours & remaining low for a time, rises again in six or seven hours to a height not much different if at all from what it would have reached had no antipyretic been given. (Taylor's 'Practice of Medicine', ~~on~~ Pyrexia, 29 page)

— जास्त जोरदार ज्वरहारक औषधा~~बद्दल असें म्हणतां येईल कीं~~ विषयीं :—— ज्वर काहीं एका मर्यादेला — जसें १०२° किंवा १०३° ला — पोहोंचला म्हणजे अशा औषधांची एकच मात्रा केव्हां केव्हां देतात. त्याचा परिणाम असा होतो कीं, दोन तीन तासांत ज्वर कमी होतो आणि कांहीं वेळ कमीच राहून सहा-सात तासानंतर ज्वरहारक औषध दिले ~~नसते~~ नसतां ~~[illegible]~~ त्यावेळीं जितक्या अंशावर राहिला असता त्यापेक्षां फार भिन्न नाहीं इतक्या अंशापर्यंत तो चढतो.+

— वरील तीन उतारे पहिला नियम सिद्ध करितात.

After the introduction of the new synthetic antipyretics antifebrin, antipyrine, phenacetin and their allies this method of treatment was tried on a very exicusive ~~excessive~~ extensive scale. As a routine plan of treating typhoid fever it has been universally abandoned owing to the depressing action of the drugs on the heart when administered for any length of time and also from the fact that the pyrexia returns in greater force almost immediately after their ~~suppression~~ suspension— (Whitla's Dictionary of treatment, ~~on~~ Typhoid, page 1107)

अर्थः— रासायनिक संयोगाने बनविलेल्या ॲंटिफेब्रिन, ॲंटिपिरीन, आणि फेन्यासिटीन वगैरे नवीन ज्वरहारकांची माहिती आल्यानंतर ~~त्यांना~~ औषधींनी ज्वर कमी करण्याच्या पद्धतीचा मोठ्या प्रमाणावर प्रयोग करून पाहण्यांत आला. ~~मुदती~~ ~~च्याज्वरावर~~ [illegible] या रीतीनें उपचार करण्याची ग्राविक ~~[illegible]~~ पद्धती आतां सर्वत्र टाकून देण्यांत आली आहे. कारण ~~त्याने~~ ती औषधें बराच वेळ दिल्यास त्यांनीं हृदयास थकवा येतो आणि दुसरें एक कारण असें आहे कीं, तीं औषधें देणें थांबविल्यावर बहुतेक लागलीच ज्वर पूर्वीपेक्षांही जास्त जोरानें परत येतो.

मलष्टंभावर रेचक औषधींचाही असाच परिणाम होतो.

As a rule, very active ~~active~~ or drastic purgatives must be avoided; They produce very abundant liquid motions from the effects of which the intestinal muscle is completely exhausted & consequently no further evacuation takes place for days afterwards (Taylor's 'Practice of medicine', Constipation, page 711)

अर्थः— मलष्टंभासंबंधी असा नियम आहे कीं, या रोगावर

कार जोराची रेचके देण्याचे टाळले पाहिजे. अशा रेचकांनी पुष्कळ व पातळ दाल होतात व त्यामुळे आंतड्याचे स्नायू अगदी थकून जातात; आणि याचा परिणाम असा होतो की, पुढे बरेच दिवसपर्यंत परसाकडेस होत नाही.

डॉक्टर R. Hutchinson याच्या 'Diseases of Children' ह्या पुस्तकाच्या ८०-८३ ह्या पानांत हगवणीवर मलस्तंभक औषधें निरुपयोगी आहेत असें सांगितलें आहे. याचा अर्थ हाच की, मलस्तंभक औषधांनी प्रथमतः मळाचें स्तंभन होतें, तरी नंतर पुनः हगवण सुरु होते. चरकसंहितेंत अतिसार-चिकित्सेंत हगवणीवर बाळहिरडा देण्यास सांगितलें आहे आणि 'तथा प्रवाहिते दोषे प्रशाम्यत्युदरामयः" म्हणजे बाळहिरड्यानें दोष वाहून गेल्यावर रोग बसतो म्हणजे बाळहिरड्यानें प्रथमतः हगवण जास्त होते तरी पण पुढें ती बंद होते. अंडकोशांतील किंवा पोटांतील पाणी शस्त्रक्रियेनें काढल्यानें तें पूर्वीपेक्षांही फार जोरानें भरून येतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे व पुष्कळांच्या अनुभवाचीही आहे. नाकांतील किंवा गुदद्वारांतील अर्श (कोंब) कापून काढले तरी ते पुनः फार जोरानें वाढून येतात. नाकांतील अर्शाबद्दल प्रसिद्ध उदाहरण पाहिजे असल्यास, नागपूरचे पेन्शनर इ. ए. सी. श्रीयुत शिरोळे हे होत. हे नासार्श वीस वर्षांपासून कितीने काढवीत आहेत तरी ते पुनः पुनः वाढून येतात. आरंभीं आरंभीं ही क्रिया दोन दोन वर्षांनी करावी लागे पण अलीकडे तर ही ~~[illegible]~~ क्रिया फारच वारंवार म्हणजे दोन तीन महिन्यांनी देखील करावी लागते. पुढील वचनाकडे देखील वाचकांनी लक्ष द्यावें.

आमें पडले आहे.

But polipii (नासार्श) show a great tendency to recur however thoroughly they are removed.
(Diseases of throat, nose & ears by W. G. Porter page 137) ([illegible] पहा)

अर्थ :- नासार्श कितीही पूर्णपणे ~~[illegible]~~ काढले तरी पुनः वाढण्याचा स्वभाव यांच्यांत दिसून येतो.

पुढें पाहूं :—

Tapping through the lateral angle of the fontanelle is a much more reliable method of removing fluid from the lateral ventricles, and if the hydrocephalic brain were merely a closed tank with no inlet, no doubt this would be an efficient procedure; but, as it is, experience shows that the brain fills up again within a day or two after the removal of the fluid.

('Common disorders and diseases
of Childhood.' by Still,
'~~Fr~~ Hydrocephalus, Page 691.)

अर्थः— जलशीर्षकरोगांत मागील रीतीपेक्षां जास्त भरवशाची रीति अशी आहे की, टाळूच्या बाजूच्या कोपऱ्याच्या ठिकाणी टोंचून ~~[illegible]~~ मेंदूच्या बाजूच्या भागांतील पाणी काढून ~~घेणें~~ घ्यावें. आणि ~~[illegible]~~ ह्या जलशीर्षक रोग्यांचा मेंदू ज्याला पाणी आंत येण्यास झरा नाही अशा टाक्यासारखा असता तर ही रीति निःसंशय यशस्वी झाली असती. परंतु अनुभवावरून असें दिसून येतें की, पाणी काढून घेतल्यानंतर एक दोन दिवसांतच मेंदू पाण्यानें पुनः भरून येतो.

माझ्या चुलत आजिच्या स्तनांवर भागामुळें ~~एक~~ गोट्यासारखी एक कठीण गांठ आली होती. ती शस्त्रक्रिया करून मेयो हॉस्पिटल नागपूर येथील शस्त्रवैद्यानें काढली तरी तेथून जवळच अशी दुसरी गांठ फारच लवकर उत्पन्न झाली.

ॲलोपॅथिक शल्यशास्त्रांत सध्यां असें मत प्रचलित आहे कीं, ग्रंथी पूर्णपणें काढून टाकल्यास त्या पुनः उत्पन्न होत नाहींत. परंतु त्या काढतांना त्यांच्या कांहीं अंश राहून गेल्यास त्या पुनः वाढतात. ('Manual of surgery' by Rose and Carless, page 186)

हें मत आमच्या प्रतिक्रिया मताला ~~विरुद्ध~~ पोषकच आहे खरें, पण तें चूक आहे. कारण त्यानें ~~त्या~~ काढलेल्या ज्या ग्रंथी वाढून येतात त्या पूर्वीपेक्षां जास्त जोरानें वाढून येतात ह्याची उपपत्ती लागत नाहीं. आतां, ज्या ग्रंथी वाढत नाहींत त्या न वाढण्याचें कारणही वरील प्रतिक्रिया सिद्धान्ताच्या दृष्टीनें उघड आहे. प्रतिक्रियेच्या तिसऱ्या नियमाप्रमाणें अतिशय जोराची क्रिया झाल्यास शरीर प्रतिक्रिया करूं शकत नाहीं; आणि प्रतिक्रिया करतां न येणें हा रोग त्या शरीराच्या ठिकाणीं जडतो. आणि त्या रोगाचा परिणाम शरीरांत झालेल्या दुसऱ्या कोणत्या तरी रोगाच्या रूपानें दिसून पडतो. अशी पुष्कळ उदाहरणें 'Allen's Chronic Miasm, Vol I' यांत दिलीं आहेत. परंतु शस्त्रवैद्य बहुधा ह्या गोष्टीकडे लक्ष्य देत नाहींत. ए[illegible]रीत, ग्रंथी शस्त्रक्रियेनें काढल्या असतां जी प्रतिक्रिया होते ती दुसऱ्या नियमाप्रमाणें फार जोराची होते.

आम्लपित्ताची बिमारी पुष्कळांना असते. या बिमारीत जेवणानंतर दोन तीन तासांनी पोटांत आंबट पदार्थ उत्पन्न

व त्यामुळे आंबट ढेंकर व पोटदुखी होते. हा आंबट पदार्थ नाहींसा करण्याकरितां ~~हा आंबट पदार्थ नाहींसा करणा~~ची ~~क्रि~~या ह्या आंबटपदार्थाशीं संयोग पावून त्याला नाहींसे करणारा पापडखार (सोडा-Sodium Carbonate) देतात. यानें तत्काळ फायदा वाटला तरी पुढें आंबट पदार्थ उत्पन्न होण्याची क्रिया प्रारंभ जोरावते, असें म्हणावें लागतें. ~~का~~ कारण बिमारास सोड्याची खुराक वाढती ठेवावी लागते.

~~चरक~~संहितेत आमज्वरास म्हणजे फार जोराच्या ज्वरास पक्व करण्याकरितां. म्हणजेच कमी करण्याकरितां स्वेदन-क्रिया सांगितली आहे. (चरकसंहिता, चि. स्था. अध्याय श्लो. ३, १३८)

'स्वेदन क्रिया' म्हणजे शरीराची उष्णता वाढविणें.
(च. सं. सू. स्था. अ. १४ श्लो. १२

हगवण किंवा निद्रानाश ह्यावर अफू दिल्यानें तत्काळ फायदा दिसतो परंतु पुढें ते रोग फार जोरानें परत येतात.

(त्यारी) II ह्या व इतर अनेक उदाहरणांवरून दिसून येईल कीं, शरीराच्या ला अस्वस्थ स्थितींतही मागें दिलेल्या दोन नियमांप्रमाणें प्रतिक्रिया होते.

(त्यारी) I शरीर स्वस्थ असो किंवा अस्वस्थ असो त्याची प्रतिक्रिया शक्ती त्याला सोडून जात नाहीं

~~प्रतिक्रियेचा तिसरा नियम सहज सिध्द होतो कारण क्रिया. थांबल्यानंतर कांहीं वेळानीं प्रतिक्रिया होते आणि क्रिये प्रतिक्रियेमधील वेळ~~ ~~प्रतिक्रिये~~ ~~क्रियेच्या जोरावर अवलंबून राहील हे साहजीक आहे आणि तसा अनुभवही येतो. म्हणजे क्रियेचा जोर जसजसा वाढवला जातो तसतसा क्रियेच्या आणि प्रतिक्रिया या मधील वेळही वाढत जातो. अर्थात क्रिया अतीच जोराची झाल्यास क्रिया प्रतिक्रिये-मधील वेळ अनंत होईल. म्हणजे~~

MD ASK

क्रियेचा तिसरा नियम साहजिक आहे. क्रिया जितकी जोराची तितक्या उशीरा प्रतिक्रिया सुरू व्हावी हें साहजिक दिसते आणि अनुभवासही येते. अर्थात्, क्रिया अतीच जोराची असल्यास प्रतिक्रिया अनंत काळाच्या उशीरानें होईल म्हणजे केव्हांच होणार नाहीं हेंही उघड आहे. आणि हाच अनुभव मागें दिलेल्या Encyclopedia मधील उताऱ्यांतही सांगितलेला आहे.

आतां, शरीराच्या प्रतिक्रियेचें ज्ञान ह्याप्रमाणें करून घेतल्यानंतर खरी चिकित्सापद्धती कोणती हे समजणें फार सोपें आहे. रोग नाहींसा करण्याकरितां शरीरावर कोणती क्रिया केली पाहिजे तें ठरविण्याकरितां फक्त क्रियेकडेच लक्ष देऊन चालावयाचें नाहीं. त्या क्रियेनंतर होणाऱ्या प्रतिक्रियेकडेही लक्ष दिलें पाहिजे. रोगचिन्हांच्या विपरीत क्रिया करून त्या चिन्हांस आपण जिंकू अशी कल्पना प्रथमतःच कोणासही येते हें खरें; पण, ही रोगचिन्हें जिंकण्याची खरी रीत नव्हे. कारण (१) विपरीत क्रिया थोडाच वेळ करून बंद केल्यास तिची प्रतिक्रिया होऊन रोगचिन्ह पुनः परत येईल. उ० तापावर शीतजलस्नान केल्यास ताप पहिल्यानें कमी होईल. परंतु थोड्याच वेळानें पहिल्या इतका किंवा जास्तही होईल. अशा चिकित्सेने रोग दुरुस्त होत नाहींत हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. ≠

(२) विपरीत क्रिया एकसारखी केल्यास प्रतिक्रिया नष्ट होईपर्यंत ती करावी लागेल. व स्वभावतःच असलेली प्रतिक्रिया शक्ती नष्ट होणे म्हणजे शरीर रोगी होणेंच होय. उ० ज्वरावर शीतजलस्नान एकसारखेंच करीत गेल्यास शरीराची प्रतिक्रिया न झाल्यामुळें शक्ती नष्ट होऊन शरीराची उष्णता अत्यंत कमी होत जाऊन मृत्यु येतो. आणि म्हणूनच, अॅलोपॅथिक ग्रन्थांत जेथें जेथें ज्वरावर शीतजलस्नानाची चिकित्सा सांगितली आहे तेथें तेथें शीतजलस्नान फक्त पंधरा वीस मिनिटेंच ~~देऊन~~ द्यावें आणि त्यानें शरीराची उष्णता कांहीं एका मर्यादेपेक्षां जास्त कमी होऊं देऊं नये असें स्पष्ट

+. Taylor's practice of Medicine page 28

In some cases of pyrexia, the temperature may be directly dealt with by methods known as antipyretic. It must be distinctly understood that such treatment will not lessen the duration of the illness; ~~that in many instances~~ illnesses, ~~the temperature will of itself fall in a few hours that is, in the early morning; and that there is very rarely (except in rheumatic hyperpyrexia) any danger that it will rise to a height which can be directly fatal~~. But efficient antipyretic treatment increases the comfort of the patient during the time that each successive dose or application is in operation and possibly in some diseases, diminishes the risk of damage to the viscera.

अर्थ: — ~~ज्वर~~ कांहीं कांहीं ज्वररोग्यांचे ज्वर ज्यांना ज्वरहारक उपाय त्यांनी प्रत्यक्षपणें कमी करण्यास हरकत नांहीं. ~~परंतु~~. अशा उपायांनीं रोगाची मुदत कमी होत नांहीं ही गोष्ट स्पष्टपणें समजून घेतली पाहिजे. तथापि परिणामकारक अशा ह्या ~~[illegible]~~ ज्वरहारक उपायांनी, प्रत्येक मात्रेची किंवा प्रयोगाची क्रिया चालू असते तोपर्यंत बिमारास आराम वाटतो आणि असें ही संभवनीय आहे कीं अंतस्थ इंद्रियांना अतिज्वरापासून होणाऱ्या नुकसानीचा धोका ~~[illegible]~~ कमी होतो.

(असें सांगून तेथेंच पुढें (१) मृदुज्वरहारक (२) जोरदार ज्वरहारक आणि (३) शीतजलस्नान हे ~~[illegible]~~, आपण जिचा विचार करीत आहो त्या पद्धतीचे तीन उपाय सांगितले आहेत.)

गुलकंद, त्रिफळा वगैरे मृदुसारक औषधांनीं मलावष्टंभाचा रोग हमेशा करितां कधींच बसत नसून, त्या रोग्यास हीं औषधें नेहमीं अन्नाप्रमाणें सेवनीय ठेवावीं लागतात असें दिसून येते.

सांगितलेलें असते. ह्याचा उद्देश हाच आहे की, प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~
नष्ट होईपर्यंत क्रिया ~~[illegible]~~ केली जाऊं नये. ~~परंतु~~ हा उद्देश
रास्त असला तरी क्रिया अर्धवटच झाल्यामुळें तिच्यानंतर प्रतिक्रिया
होऊन ताप पुनः चढतो; (हें मागें दिलेल्या उताऱ्यांत सांगितलेलेंच
आहे.) आणि अशावेळीं पुनः शीतजलस्नान देत जावें असेंही
ॲलोपॅथीच्या ग्रन्थांत सांगितलेलें असते. म्हणजे खरोखर ज्वर
शीतजलस्नानानें न बसतां आपोआपच किंवा त्यावेळीं
चालू असलेल्या इतर उपायांनीं बसतो. शीतजलस्नानानें फक्त
शरीराची उष्णता अतिशय वाढूं देत नाहीं म्हणजे ती ~~[illegible]~~च्या
प्रकृतीकडे उष्णता आल्यास मारक चिन्हें उत्पन्न होतील अशा
मर्यादेच्या वर जाऊं देत नाहीं. ह्या संबंधानें आम्हीं विशेष
~~खुलासा पुढें लिहिणारच आहे.~~ २ एक उतारा आताच दिला आहे.

तसेंच एकसारखें शीत जलांत बुडून ठेवण्याची चिकित्सा
जी सांगितलेली आहे तीमध्यें वापरावयाचें पाणी पूर्वी
सांगितलेल्या चिकित्सेइतकें थंड नसून ९०ं ते ९५ं अंशांचें
असावें म्हणजे शरीराच्या मानानें उष्णतेपेक्षा फार
थंड असूं नये असें सांगितलें असतें. ह्याचाही उद्देश
प्रतिक्रिया शक्ति ~~[illegible]~~ नष्ट ~~होईल~~ ~~हा~~ होऊं नये असाच
उघड दिसतो. एकंदरींत, क्रिया एकसारखी करून
प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट करणें हें कोणासच इष्ट नाहीं.
~~प्रतिक्रिया [illegible] नष्ट झाल्यानें शरीरास तत्काळ मरण~~
~~चिकित्सेविरुद्ध [illegible] किंवा [illegible]~~
~~येईल किंवा [illegible] दिसून येणारा दुसरा कोणता~~
~~तरी रोग होईल~~ असल्यास

येईल किंवा ~~चिकित्सेत रोग अकर्मे, आपल्यामांसी~~
~~वगैरे सारखा स्थानिक असल्यास तत्काळ~~ तत्काळ स्पष्टपणें
दिसून येणारा किंवा त्यानंतर बरेच दिवसांनीं ~~दिसून~~
~~येणारा~~ (म्हणजे काहीं कारणांनीं माहीत न झाल्यास)
दिसून येणारा दुसरा कोणता तरी रोग होईल. एकंदरीत
शरीराची प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट होणें ज्या अर्थी इष्ट

सांगितलेले असते. ह्याचा उद्देश हाच आहे की, प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट होईपर्यंत क्रिया ~~[illegible]~~ केली जाऊं नये. ~~परंतु~~ [हा] उद्देश रास्त असला तरी क्रिया अर्धवटच झाल्यामुळे तिच्यानंतर प्रतिक्रिया होऊन ताप पुनः चढतो; (हे मागें दिलेल्या उताऱ्यांत सांगितलेलेच आहे.) आणि अशावेळी पुनः शीतजलस्नान देत जावें असेंही ॲलोपॅथीच्या ग्रन्थांत सांगितलेले असते. म्हणजे खरोखर ज्वर शीतजलस्नानानें न बसतां आपोआपच किंवा त्यावेळीं चालू असलेल्या इतर उपायांनीं बसतो. शीतजलस्नानानें फक्त शरीराची उष्णता अतिशय वाढूं देत नाहीं म्हणजे तिच्या पलीकडे उष्णता आल्यास मारक चिन्हें उत्पन्न होतील अशा मर्यादेच्या वर जाऊं देत नाहीं. ह्या संबंधानें आम्हीं विशेष ~~खुलासा पुढें लिहिणारच आहे.~~ २ एक उतारा आताच दिला आहे.

तसेंच एकसारखे शीत जलांत बुडून ठेवण्याची चिकित्सा जी सांगितलेली आहे तीमध्यें वापरावयाचें पाणी पूर्वी सांगितलेल्या चिकित्सेइतकें थंड नसून ९०ं ते ९५ं अंशांचें असावें म्हणजे शरीराच्या मानानें उष्णतेपेक्षां फार थंड असूं नये असें सांगितलें असतें. ह्याचाही उद्देश प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ ~~नष्ट होईल इ~~ होऊं नये असाच उघड दिसतो. ⊕ एकंदरीत, क्रिया एकसारखी करून प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट करणें हें कोणासच इष्ट नाहीं. प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट झाल्यानें शरीरास तत्काळ मरण ~~येईल किंवा [illegible] दिसून येणारा दुसरा कोणता तरी रोग होईल~~ ~~असल्यास~~ येईल किंवा ~~चिकित्सेत रोग अंकुर, आपले सांधे वगैरे सारखा स्थानिक असल्यास तत्काळ~~ तत्काळ स्पष्टपणें दिसून येणारा किंवा त्यानंतर कांहीं दिवसांनी ~~दिसून येणारा~~ (म्हणजे ती कांहीं कारणांनी नाहींसा न झाल्यास) दिसून येणारा दुसरा कोणता तरी रोग होईल. एकंदरीत शरीराची प्रतिक्रिया शक्ती ~~[illegible]~~ नष्ट होणें ज्या अर्थी इष्ट

* टिप :– शरिराची प्रतिक्रियाशक्ती नष्ट झाल्यापासून काय परिणाम होतात त्याबद्दल जें हें आम्हीं लिहिलें आहे त्या त्याचा अनुभव जर कोणास आला नसेल तरी हरकत नाहीं एकसारख्या विपरीत चिकित्सेनें शरीराच्या स्वाभाविक प्रतिक्रियाशक्तीशीं झगडावें लागते व ती नाहींशी करावी लागते व त्यापासून शरीरावर कोणते तरी अनिष्ट परिणाम झाले पाहिजेत ~~हें कोणासही पटलें पाहिजे.~~ एवढें पटलें म्हणजे पुरें आहे व तें कोणासही पटलेंच पाहिजे.

~~१* तरी त्यासंबधानें पुढील उतारा पहावा.~~

⊕ अशा वेळीं प्रतिक्रियाशक्ती नष्ट झाल्यास काय होतें ह्याविषयी पुढील उतारा पहा. (Jousset's P. of medicine 231.)
This treatment (cold bath) reduces fever stops delirium and gives a certain degree of appetite (?) but it has grave disadvantage. The principal ones are the causation of broncho-pneumonia, syncope & especially hemorrhages

अर्थ:— ह्या शीतजलस्नानचिकित्सेनें ज्वर कमी होतो, बडबड थांबते व भूक लागते (?) परंतु तीमध्यें फार दोष आहेत. त्यांपैकीं मुख्य हेंच कीं तिनें फुफ्फुसप्रतिश्याय, हृन्मांद्य (ह्यांत नाडी मंद व अंग थंड होऊन रोगी मरतो) आणि विशेषतः रक्तस्राव होतो.

आणि म्हणूनच हे तीन विकार रोग्यांत असल्यास त्यास शीतजलस्नान रोग्यास देऊं नये असे Allopathic ग्रंथांत सांगितलें असतें. ह्यासंबधानें पुढील उतारा पहा.
The Contraindications are the extreme collapse of the patient, hemorrhage already established & severe condition of pulmonary congestion (Taylor's "practice of medicine": page 53)

अर्थ:— शीतजलस्नान जेव्हां देणे इष्ट नसतें तेव्हांचीं चिन्हें अशीं :– मेंदूच्या क्षीणतेमुळें शक्तिपात (ह्यांत ही हृन्मांद्याचींच चिन्हें होतात) रक्तस्राव आणि फुफ्फुसांत ~~तीक्ष्ण~~ तीक्ष्ण रक्तसंचय.

नाहीं ~~नहीं~~ (या अर्थी क्रिया एकसारखी करून रोग दुरुस्त करावयाची ~~घ्यायची~~ हाव धरणें ~~[illegible]~~ हितावह नाहीं. अर्थात्, ~~वि~~ विपरीत चिकित्सा ही खरी रोगहारक चिकित्साच होऊं शकत नाहीं हे स्पष्ट आहे.

आतां सम~~प्रकृतीच्या~~ क्रियेचा विचार करूं. समक्रिया म्हणजे ~~ज्या~~ ~~क्रियेनें~~ रोगी मनुष्याच्या ज्यो रोग घालवावयाचा आहे तोच रोग निरोगी मनुष्यामध्यें ज्या क्रियेनें उत्पन्न होईल ती क्रिया सौम्यपणें ~~[illegible]~~ करणें ----

उ. तापावर स्वेदन क्रिया करणें, (स्वेदन = शेकून शरीराची उष्णता वाढविणें) अशा क्रियें~~नंतर~~ ~~होणाऱ्या~~ प्रथमतः रोग जास्त होईल, हें खरें, पण त्या क्रियेनंतर होणाऱ्या जोराच्या प्रतिक्रियेनें रोग नाहींसा होईल. वरील ज्वराच्या उदाहरणांतच स्वेदन क्रियेनें ज्वर प्रथमतः जास्त होतो पण पुढें प्रतिक्रियेनें कमी होतो ही गोष्ट, आयुर्वेदांत तापावर स्वेदन क्रिया सांगितली आहे या वरूनही, उघड आहे. याप्रमाणें या रीतीनें शरीराच्या प्रतिक्रियेचा ~~[illegible]~~ उपयोग करून घेतला जातो. विपरीत क्रियापद्धतीप्रमाणें ह्या चिकित्सेंत शरीराच्या स्वाभाविक प्रतिक्रियाशक्ती विरुद्ध जावें लागत नाहीं. अर्थात्, रोगचिन्हें मिटण्याची खरी शास्त्रीय पद्धती समक्रिया हीच होते. हिलाच 'समचिकित्सा' असें कोणी म्हणतात. आयुर्वेदांत हिलाच 'विपरीतार्थकारी चिकित्सा' असें म्हटलें आहे आणि ती रोग दुरुस्त करण्याची एक पद्धती म्हणून मान्य केली आहे. [(च. सं. वि. स्था. ~~[illegible]~~ अध्याय २ श्लो. १९) 'यथा सं सर्वविकाराणामपि च निग्रहे हेतुव्याधिविपरीतमौषधं मिच्छन्ति कुशलाः । तदर्थकारि वा ।' अर्थ :- कुशल वैद्य सर्व रोगांत हेतु विपरीत किंवा व्याधिविपरीत किंवा हेतु ~~[illegible]~~

या ~~केत~~ व्याधिविपरीतार्थकारि यांपैकीं ज्यावेळेस जी चिकित्सा करणें योग्य असेल ती चिकित्सा करावी असें ~~म्हणणे लोक~~ म्हणतात. ~~त्यांचा (व. संपादित) ग्रंथ. अध्याय भागे ९० धातुवसनां तरी तेंच सांगितले आहे. व तेथें त्या वचनाच्या टीकेंत टीकाकाराने विपरीतार्थकारि चिकित्सेचीं उदाहरणेंही दिलीं आहेत. तीं पहावीं.~~]

पुष्कळ रोगचिन्हांवर विपरीतक्रिया करणेंच शक्य नसते. कारण त्या रोगचिन्हाच्या विपरीत चिन्हाची कल्पना करतां येत नाहीं. उदा०- खोकला, किंवा उलटी ह्यांच्या उलट चिन्हांची कल्पना करतां येत नाहीं. उष्णतेच्या विपरीत शैत्य, किंवा शैत्याच्या विपरीत उष्णता. मलावष्टंभाच्या विपरीत हगवण किंवा हगवणीच्या विरुद्ध मलावष्टंभ. ऊर शोष येणें याच्या विपरीत ऊर्ध्व शोष येणें. प्रश्नातले खोकला, उचकी किंवा पोटदुखी ह्यांच्या विपरीत काय याची कल्पना करतां येत नाहीं. खोकला, उचकी किंवा पोटदुखी नसणें हें विपरीत नव्हे, हा केवळ ~~अ~~ अभाव होय हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा चिन्हांच्या विपरीत चिन्हांची कल्पना ज्याअर्थी करतां येत नाहीं त्याअर्थी त्यावर विपरीत क्रियाही करतां येणें शक्य नाहीं. अशा चिन्हांवर समक्रियाच करणें म्हणजे खोकला, उचकी किंवा पोटदुखी ह्यावर खोकला, उचकी, किंवा पोटदुखीच उत्पन्न करणारेंच औषध शक्य आहे. आणि अशा समक्रियेनें आतांनी रोग [illegible] आला [illegible]

असा अनुमान येतोच. ~~[illegible]~~ ज्याप्रमाणे उलटी ~~बस~~ होते व त्यानें ~~उपकेंद्र~~ उलटी बसतेही ~~असें~~ ही गोष्ट (भ. सं. स्. स्था. अ. ४ श्लो. ३० व ३४) ध्वनित सांगितली आहे. ह्याचें रहस्य समचिकित्सेनें रोग बसतो हेंच आहे.

येथें एका शंकेचें समाधान करणें जरूर दिसतें. ज्या चिन्हांच्या विपरीत चिन्हांची कल्पनाच करवत नाहीं ~~असें~~ अशा चिकित्सेनें उत्पन्न केलेल्या चिन्हांवर शरीर प्रतिक्रिया कसें करूं शकतें ही शंका कित्येकांना येईल. तिचें एक समाधान असें कीं, समक्रियेनें रोग अशीं चिन्हें दुरुस्त झालेलीं ज्या अर्थी दिसतात त्या अर्थी आपणांस अकल्पनीय अशा कोणत्यातरी रीतीनें शरीर अशा चिन्हांवर प्रतिक्रिया करीत असलें पाहिजे; किंवा अशा चिन्हांच्या विपरीत चिन्हांची आपणांस जरी कल्पना करतां येत नाहीं तरी शारीरिक चैतन्य शक्तीला ~~[illegible]~~ ती कल्पना असली पाहिजे; किंवा, ~~अकल्पनीय [illegible]~~ अवास्तव अशा गोष्टीपासूनही वास्तव परिणाम साधलेले गणितांत जसे दिसून येतात त्यासारखी ही गोष्ट असली पाहिजे. ऋणसंख्येचें एक अकल्पनीय ~~आहे~~ (imaginary) आहे तरी त्याचा वर्ग कल्पनीय व खरा आहे. आणि ऋण एकाच्या (-1) वर्गमूळाच्या साहाय्यानें गणिती ~~[illegible]~~ वास्तव असे सिद्धान्त सिद्ध करून दाखवितात. तिकडे लक्ष दिलें तरी ही गोष्ट पटण्याजोगी आहे. स्वप्नांत दिसलेला वाघ जरी खोटा असला तरी त्यामुळें हृदयांत भरलेली धडकी खरी असते, त्यासारखेंच हें आहे.

[illegible] दुरीत, समचिकित्सेनें अशी चिन्हें दुरुस्त होतात हे प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ही शंका कोणास राहूं नये.

आतां दुसऱ्याही एका शंकेचे समाधान करणें जरूर आहे ती शंका अशी: ज्या कारणानें रोग उत्पन्न केला गेला असेल, त्याच कारणानें केव्हां ही तोच रोग ज्या अर्थी उत्पन्न होतो त्या अर्थी त्या कारणांचीच समचिकित्सातत्वाप्रमाणे, त्या रोगावर योजना केली असतां, म्हणजेच हेतुविपरीतार्थकारी चिकित्सेनें रोग दुरुस्त होईल का? व होत असल्यास कां व कोणत्या रीतीनें होतो? उदाहरणार्थ, कोणा एकाच्या ~~चे~~ डोक्यावर लाठीचा मार बसला व त्यामुळें तो बिमार झाला तर त्याला पुनः तेथेंच तेवढ्याच जोराचा मार दिल्यानें तो दुरुस्त होईल कां? किंवा कोणा एकाचें अंग भाजलें तर तेथे पुनः भाजल्यानेंच तो दुरुस्त होईल का? होत असल्यास मागें रोगाचें कारण नाहीसें करणें हें चिकित्सेचें एक अंग सांगितलें आहे तें चूक ठरणार नाहीं काय? अशा प्रकारची ही शंका आहे.

हिचें उत्तर असें की, रोगाचें जें कारण झालें असेल तें अगदी तसेंच रोगावर योजीलें गेलें तर त्या पासून रोगच उत्पन्न होईल हेंच खरें. परंतु, त्याच कारणाच्या अवधीत किंवा तीक्ष्णतेत किंवा दोहोंतही फरक करून ते रोगावर योजिलें तर रोग हारक होते. उदाहरणार्थ, डोक्यावर जेथें लाठीचा मार बसला असेल तेथेंच पुनः तितक्याच जोराचा मार ~~देण्या ऐवजीं~~ न देतां, फक्त जोरानें दाबल्यास तेथील दुःख व सूज फार लवकर दुरुस्त होते. अंग भाजल्यास ते अंग पुनः न भाजतां विस्तवाजवळ साधारण चटका झोंबेपर्यंत धरल्यास तें फार लवकर दुरुस्त होतें (See organon of medicine: Introduction page (2, 43 note) आणि ~~बर्फानें~~ थंडीनें जकलेल्या (Frostbitten) अंगावर बर्फच

घा पान ५ – 23

सावा असें Allopathic ग्रंथांत ही सांगितले आहे. ('Manual of Surgery' by Rose & Carless page 115 पहा)

अग्निदग्धावर अग्नीचा ताप द्यावा व उष्णक्रिया करावी असें आयुर्वेदांत ही सांगितले आहे. (योगरत्नाकर, अग्निदग्ध-चिकित्सा पहा "प्लुष्टस्याग्निप्रतपनं कार्यमुष्णं तथौषधम्")

मद्यात्ययचिकित्सेंत तर मद्यानें झालेल्या विकारांवर मद्य हेंच योग्य (अल्प) प्रमाणांत घेतले असतां त्यानें ते विकार बसतात असें आयुर्वेदांत सांगितले आहे. "मद्योत्थानां च रोगाणां मद्यमेव प्रबाधकं" ६१॥ मिथ्यातिहीनपीतेन यो व्याधिरुपजायते समपीतेन तेनैव स मद्येनोपशाम्यति ॥२६॥ (चरक, मद्यात्ययचिकित्सा) Dr Noack ह्यांनी सर्पदंश Lachesis 6X. लॅचेसिसच्या सहाव्या मर्दनानें दुरुस्त केला असें Jousset च्या 'Practice of Medicine' च्या ८९३ पानांत सांगितले आहे. लॅचेसिस हें औषध अमेरिकेतील एका अत्यंत विषारी सर्पाच्या विषापासूनच तयार करतात. एकंदरीत, ज्या कारणानें रोग उत्पन्न झाला असेल त्याच्याच मंदरूपाच्या प्रयोगानें रोग बसतो हें स्पष्टपणें दिसून येते.

– आणि ह्याची उपपत्तीही लावतां येते. रोगाचें कारण फारच जोरदार असल्यामुळें त्यावर होणारी प्रतिक्रिया, प्रतिक्रियेच्या तिसऱ्या नियमाप्रमाणें, फार उशीरा होईल ~~अशा~~ परंतु अशा ह्या रोगी स्थितींतही शरीराची प्रतिक्रियाशक्ती त्यास सोडून जात नाहीं म्हणून तेंच कारण मंदप्रकारचें योजल्यास त्यावर लगेच दुसऱ्या नियमाप्रमाणें प्रतिक्रिया होऊन रोग लवकर दुरुस्त होईल. एकंदरीत, समचिकित्सेचा प्रयोग इतक्या कमी जोराचा पाहिजे कीं त्यानें दुसऱ्या नियमाप्रमाणे प्रतिक्रिया उत्पन्न होईल. तो चिकित्स्य रोगापेक्षां जास्त तीव्र रोग उत्पन्न करील इतका जोरदार असण्याची जरूर नाहीं, आणि खरोखर पाहतां तितका जोरदार असणें इष्टही

ना
हीं.

आतां एका संशयाचा खुलासा करणें जरूर आहे. एकच रोगचिह्न ज्याला आहे असा बिमार फारच क्वचित आढळतो. बहुधा बिमारांत अनेक रोगचिह्नें दिसून येतात. उदाहरणार्थ, पुढील सर्व बिमार खोकल्याकरितांच म्हणून वैद्याकडे जातील तरी त्यांची इतर रोगचिह्नें भिन्न भिन्न आहेत.

अ :— (१) खोकला (२) खोकतांना डोळ्यास पाणी येणें (३) जीभ पाण्यानें डबडबलेली, स्वच्छ व फेसाळ (४) ठसे फेसाळ, पातळ व खारट (५) धमनी रुंद व स्पर्शास कठीण (६) छातीतून कुरकुर असा आवाज ऐकू येतो (७) ज्वर येतो व त्यावेळीं डोळ्यांची, तळपायांची व तळहातांची आग होते.

ब :— (१) खोकला (२) जिभेवर पांढरा थर (३) ठसे घट्ट व पांढरे (४) छातीतून कूंकूं असा आवाज ऐकू येतो. (५) ज्वर येतो पण त्यावेळी डोळ्यांची, तळपायांची किंवा तळहाताची आग होत नाहीं किंवा ज्वर येतच नाहीं.

क :— (१) खोकला (२) जिभेवर नारिंगी रंगाचा थर (३) ठसे फेसाळ, घट्ट व खारट (४) धमनी बारीक व स्पर्शास मऊ (५) छातीतून आवाज ऐकू येत नाहीं (६) ज्वर येत नाहीं पण डोळ्यांची आणि तळपायांची आग होते.

ड :— (१) खोकला (२) ठसे बिलकुल येत नाहींत (३) जीभ स्वच्छ किंवा पिवळी (४) खोकल्याची उबळ येते व उबळीच्या शेवटी शीटी वाजल्या सारखी होते.

ह्या चारही बिमारांत खोकला हें सामान्य चिह्न आहे. म्हणून, ह्या चौघांचाही खोकला, निरोगी मनुष्यांत खोकला उत्पन्न करणाऱ्या कोणत्याही एका

औषधानें ~~[illegible]~~ दुरुस्त होईल की काय हा संशय आहे. ह्याचें निराकरण सोपें आहे. प्रत्येकाच्या खोकल्याबरोबर असलेली इतर चिन्हें ज्या अर्थी भिन्न भिन्न आहेत त्या अर्थी ते रोगच भिन्न असले पाहिजेत, आणि प्रत्येक बिमारास भिन्न भिन्नच औषध — ज्यानें निरोगी मनुष्यांत त्या त्या रोग्याची सर्व चिन्हें उत्पन्न होतात तेंच — पाहिजे हें उघड आहे. एका मनुष्याचा खोकला किंवा इतर रोग एखाद्या औषधानें बसला म्हणजे तो तेंच औषध दुसऱ्यास मोठ्या कळकळीनें सांगतो; पण दुसऱ्याचा तोच रोग त्या औषधानें दुरुस्त होत नाहीं असें हमेशा घडतें. असा अनुभव पुष्कळांस येतो ह्यावरून ही हीच गोष्ट सिद्ध होते.

एकंदरीत, शरीरावर समचिकित्सा करतांना रोग्याच्या सर्व चिन्हांचा विचार करावा लागतो, हें उघड आहे.

~~येथपर्यंत~~ व्याधिविपरीतार्थकारी चिकित्सा म्हणजेच समचिकित्सा हीच खरी रोगहारक चिकित्सा होय ~~[illegible]~~ हेंच येथपर्यंत केलेल्या विचारांवरून ठरतें. असें आहे तरी व्याधिविपरीत चिकित्सेचा कांहींच उपयोग नाहीं असें मात्र नाहीं. कित्येक रोगचिन्हें फार जोराचीं झाल्यास तीं अत्यंत मारक अशा दुसऱ्या रोगचिन्हांस उत्पन्न करतात. म्हणजे ~~[illegible]~~ एक रोगचिन्ह दुसऱ्या मारक रोगचिन्हांचें कारण होतें. अशा वेळीं ह्या दुसऱ्या मारक रोगचिन्हांचें कारण (म्हणजे पहिलें रोगचिन्ह) नाहींसें करण्याकरितां शरीराच्या सहनशक्तीपेक्षां कमी जोराच्या विपरीतक्रियेचा उपयोग करितां येईल. उदाहरणार्थ, ज्वर १०४ अंशांच्या वर बराच वेळ राहिल्यास तो बडबड, भ्रम वगैरे वातचिन्हें उत्पन्न करतो व हीं चिन्हें फारच लवकर मारक होतात. ह्या मारक चिन्हांचें कारण १०४ अंशांवर असलेला ताप होय. हें कारण तत्काळ नाहींसें करणें फार जरूर आहे. ह्या अशा तापावर शीतजलस्नानाची क्रिया फार थोडा वेळ करून तो ज्वर १०२° पर्यंत हटविला

तर प्रतिक्रियेच्या पहिल्या नियमाप्रमाणें तो सुमारें १०४° पर्यंतच चढेल, व तेव्हां पुनः शीतजलस्नान देतां येईल. असें करीत गेल्यास तो ज्वर, बडबड, भ्रम वगैरे मारक चिह्नें उत्पन्न करूं शकणार नांहीं आणि नुसता तापच स्वतंत्रपणें मारक होणारा नसून आपोआपच कमी होणारा असेल तर तो कांहीं दिवसांनीं आपोआपच कमी होईल. म्हणजे ह्या उदाहरणांत तापावर केलेली विपरीत क्रिया ही वातप्रतिबंधक होईल. समचिकित्सेशिवाय रोग दुरुस्त होत नांहींत हें जरी खरें आहे तरी अशा वेळीं, ती प्रथमतः तापाला वाढविणारीच असल्यामुळें, कदाचित मारक ही होईल. अशा आणीबाणीच्या वेळीं विपरीतक्रियेनें ताप थोडा कमी करून मारकचिह्नें टाळणें जरूर आहे हें उघड आहे. ही विपरीतक्रिया, प्रतिक्रियेच्या दुसऱ्या नियमाप्रमाणें फार जोराची प्रतिक्रिया करील इतक्या जोराची नसावी. कारण, तिनें ही कारणभूत रोगचिह्न वाढून मारक रोगचिह्न उत्पन्न होईल. किंवा ही विपरीतक्रिया, प्रतिक्रियेच्या तिसऱ्या नियमाप्रमाणें, मारक होईल इतक्या जोराची नसावी - ह्या गोष्टी उघड आहेत. तसेच रोग (येथें उदाहरणांत ताप) हटविण्याकरितां केवळ विपरीतक्रियेवरच अवलंबून न राहतां, विपरीतक्रियेनें समक्रियेकरितां अवसर मिळवून समक्रिया ही केलीच पाहिजे हें लक्षांत ठेवावें. ह्याप्रमाणें समक्रियेसाठीं अवसर मिळविण्यास आणि मारक रोगचिह्नांचें कारण नांहींसें करण्यास विपरीत क्रियेचा परिमित उपयोग केला पाहिजे, असें ठरतें. ह्या अशा विपरीतक्रियेनें आपोआप दुरुस्त होणार रोग दुरुस्त झाल्याचा भ्रम होतो आणि ती नित्य ~~चालू~~ (सेवनीय) ठेवल्यास रोग दुरुस्त करणार नाहीं तरी त्यापासून दुसरा रोग होऊं देणार नांहीं हें मागें आलेल्या उदाहरणांवरून उघड आहे.

2 प्रसंग दुसऱ्याही एका प्रसंगी परिमित विपरीत क्रिया करतां येईल. रोग्यास जर अत्यंत असह्य वेदना होत असतील व त्या नाहीशा व्हाव्या अशी त्याची इच्छा असेल तर ती क्रिया (परिमित विपरीत क्रिया) करण्यास हरकत नाही. उदा.- आम्लपित्ताने बिमार असलेल्या बिमाराच्या पोटांत जेवणानंतर दोन तीन तासांनी आम्ल उत्पन्न होऊन त्याचें पोट फार दुखतें. हे दुःख असह्य झाल्यास तें कमी करण्यासाठीं पापडखाराचा (Sodium Carbonate) परिमित उपयोग करण्यास हरकत नाही. (पापडखाराच्या आम्लनाशक धर्माबद्दल मागें सांगितलेंच आहे.)

वर जे परिमित विपरीत क्रियेचे दोन प्रसंग सांगितले तशा प्रसंगी रोगचिन्हांच्या विपरीत चिन्हांची कल्पना होऊं शकत नसल्यास काय करावें असा एक प्रश्न येथें उपस्थित होतो. अशा वेळीं अन्य रोगोत्पत्ति चिकित्सा कामीं पडते. म्हणून, अन्य रोगोत्पत्ति चिकित्सा म्हणजे काय व तिचें तत्व काय तें सांगतो.

शरीरांत दोन किंवा अनेक रोग असल्यास व त्यांपैकीं एकच सर्वांत जास्त जोरदार असल्यास त्या अत्यंत जोरदार रोगाचीच चिन्हें दिसून पडतात व इतर रोगाचीं चिन्हें अव्यक्त स्थितींत राहतात. त्या अत्यंत जोरदार रोगाचा जोर कांहीं कारणामुळें हटून गेल्यावर दुसराच रोग जर अत्यंत जोरदार झाला तर हा दुसऱ्या रोगाचीं पूर्वीं अव्यक्त असलेलीं चिन्हें व्यक्त होतात. 3

हा सिद्धान्त पुढील अनुभवावरून सिद्ध होईल.

[illegible]

हीच गोष्ट दुसऱ्या तऱ्हेनें म्हणजे रोगांच्या कारणांचा विचार ~~करून [illegible]~~ करून ही सिद्ध करतां येते. रोगांच्या कारणांविषयीं Taylor आपल्या 'Practice of Medicine' ह्या ग्रंथांत म्हणतो:—

"The causes of diseases are commonly divided into predisposing and exciting but no broad line can be drawn between them. A predisposing cause may be in operation for a great length of time without the disease being produced; whereas the exciting cause usually is usually only of short duration; but conditions which act as predisposing causes at one time may act as exciting causes at another."

अर्थ:- "रोगांच्या कारणांचे सामान्यतः दोन भाग करतात: एक रोगाला अनुकूल स्थिती उत्पन्न करणारें कारण, आणि दुसरे क्षोभक कारण. परंतु, ह्या दोन प्रकारच्या कारणां-मधील फरक (परिणामाच्या दृष्टीनें ठरवितां येतो तरी स्वरूपाच्या दृष्टीनें) ठरवितां येत नाहीं. रोगाला अनुकूल परिस्थिती उत्पन्न करणाऱ्या कारणाची क्रिया फार वेळ चालू असते तथापि रोग उत्पन्न होत नाही. क्षोभक कारण क्षणिक असते (तथापि त्यानें रोग तत्काळ प्रगट होतो). परंतु ज्या गोष्टी एका प्रसंगीं रोगाला अनुकूल परि-स्थिती उत्पन्न करितात त्याच इतर प्रसंगीं रोगक्षोभक होतात."

-ह्यावरून दिसून येईल कीं, आनुकूल्योत्पादक कारणांनीं रोगानुकूल्य उत्पन्न झाल्यानंतर क्षोभक कारणानें रोग उत्पन्न होतो. म्हणून शरीरांतील रोगानुकूल्य नाहींसें करणें हेंच रोग जिंकण्याचा खरा मार्ग होय! शस्त्रक्रियेनें रोगानुकूल्य नाहींसें होईल ही कल्पनाच करतां येत नाहीं. अर्थात्, शस्त्रक्रियेनंतरही रोगानुकूल्य कायमच राहिल्यामुळें क्षोभक कारणानें (~~[illegible]~~ आणि हीं कारणें नेहमीं घडतातच) रोग पुनः त्याच ठिकाणीं, अन्य ठिकाणीं किंवा अन्यरोगाच्या रूपानें प्रगट झाला पाहिजे हें उघड आहे.

तिसऱ्याही एका रीतीनें ह्या गोष्टीचा विचार करतां येईल. शस्त्रक्रिया ही केवळ स्थानिक असते परंतु रोग स्थानिक असा कधींच नसतो. आगंतुक स्थानिक कारणामुळें उत्पन्न झालेला रोगही (जसें जखम, जळणे वगैरे) एका क्षणांत सर्व शरीर व्याप्त करतो. [illegible] आगंतुक कारणाशिवाय शरीरांतच उत्पन्न झालेला रोग स्थानिक असा भासत असला तरी तो स्थानिक नव्हे हें उघड आहे. ~~शारीरिक कारणामुळेंच~~ सार्वशारीरिक विकृतीमुळेंच तो उत्पन्न झालेला असला पाहिजे. शरीरांतील सर्व अवयवांचा एकमेकांशी इतका दृढ निकट संबंध आहे. ह्यासंबधानें Taylor काय म्हणतो

तें पहा :—

More modern study tends to show that diseases formerly regarded as having a local origin in viscus or joint are of a much more general character. Thus it is doubtful whether pneumonia, chronic Bright's disease, and gout should not be looked upon as general disorders, rather than as diseases of the lungs, kidneys & joints respectively.......... Diabetes mellitus, diabetes insipidus, and haemoglobinuria, although disorders of urine are not due to disease of kidney.......... Similarly rheumatism and rickets classified with diseases of bones & joints are obviously disorders involving a much wider area. (Preface to the first edition of Practice of Medicine)

~~अर्थ:~~ —

अर्थ:— अलीकडील शोधावरून असें दिसून येतें कीं, पूर्वी जे रोग स्थानिक म्हणजे सांध्यांत किंवा आंतरेंद्रियांमध्येंच उत्पन्न झालेले ~~आहेत असें~~ आहेत असे समजत असत ते रोग वास्तविकपणें अधिक ~~सार्वत्रिक असतात. सर्व शरीरास व्यापणारे होत.~~ एकापेक्षां अधिक इंद्रियांना व्यापतात. जसें, फुफ्फुसदाह, मूत्रसाद आणि खुडरोग ह्यांना फुफ्फुसें, मूत्रपिण्ड व सांधे ह्यांच्येच रोग न मानतां सार्वशारीरिक रोग मानावें असा संशय उत्पन्न होतो. मधुमेह, उदकमेह, रक्तसत्वमेह हे जरी मूत्रविकार आहेत तथापि मूत्रपिण्डाच्या विकारामुळें ते उत्पन्न होत नाहींत. (सार्वशारीरिक विकारामुळें उत्पन्न होतात.) (याचप्रमाणें आमवात आणि अस्थिमार्दव हे जरी वर्गीकरणांत सांध्यांच्या आणि हाडांच्या रोगांत घातले आहेत तथापि त्यांची व्याप्ती सांधे व हाडें ह्यांपेक्षां जास्त ठिकाणांवर आहे, हे उघड आहे.

Economy = The whole animal organism

Contagium = The septic matter of garms of specific diseases

Virus = A virulet secretion of an infections disease

६०

तसेंच Taylor चेंच पुढीलही वचन पहा:-

"Some time ago diseases were divided into general & local the latter ~~sometime ago~~ being those in which particular organs or parts of the body were mainly or alone affected, such as the heart, the lungs, the brain, or the skin; and the former ~~in~~ those in which the whole economy was disturbed, so that it could scarcely be said that one organ was more affected than another. ~~The peculiarity of many of these complaints was that~~ the - - - - - - - - - - - - - -

Improved methods of research with the microscope led to the proof that not only did the Contagium, or Virus, or virus medium of transmission from man to man, consist of visible particles, but that these particles were themselves living organisms, different in different diseases, capable of cultivation and reproduction both within and without the body. The study of these microorgani is the science of bacteriology.

(धारा) II – The general diseases were thus seen to be both infections and specific, and of these Typhus, scarlet fever, measles, small pox and influenza are examples. But extended researches showed also that many diseases hitherto considered local were also due to specific and infective agents; for instance Pneumonia, tetanus, and diphtheria, as well as suppurative fever; and in their intimate pathology these disorders with their pronounced local manifestations must fall into line with the well-known fevers, such as typhus and small pox. Classification then is rendered difficult by the fact that if the organs of the body are taken as a basis there are general diseases which affect the whole body [illegible]

multaner

Lesion = A structural tissue-change caused by ingury or disease

no one organ in particular. But when these are investigated and their bond of union is found to be the infective micro-organisms, then it is seen that a number of diseases affecting mainly one organ or part of the body (hence local diseases) must be included with the infectious disorders; and as the tendency of all modern research is to discover micro-organisms at the bottom of every inflamatory and degenerative lesions & even of new growths the list of infectious diseases is constantly being increased by the addition to its general disorders of diseases hitherto considered local and non-infective." (Tailor's 'Practice of Medicine, P. 758, Edn. 1925)

अर्थः— कांहीं काळापूर्वी रोगांचे सार्वत्रिक आणि स्थानिक असे दोन वर्ग करीत असत. ज्या रोगांमध्यें हृदय, फुफ्फुसें, मेंदू किंवा कातडी वगैरे असे विशिष्ट + इंद्रिय मुख्यत्वेंकरून किंवा एकटेंच विकृत होते त्या रोगांना स्थानिक म्हणत. आणि ज्यामध्ये सर्व शरीर इतकें विकृत होतें ~~असे~~ कीं, शरीरांतील एखादें इंद्रिय इतरांपेक्षां जास्त विकृत आहे असें म्हणण्याला जागा रहात नाहीं त्यांना सार्वत्रिक रोग म्हणत. सूक्ष्मदर्शक" यंत्रांनीं शोध करण्याच्या जास्त सुधारलेल्या रीती निघाल्या आणि त्यांवरून असें सिध्द झालें कीं, रोगाचें विष एका मनुष्यांतून दुसऱ्या मनुष्यांत जातें तें ~~ह्रस्व~~ ~~अशा~~ वास्तविक ह्रस्व अशा कणांचेंच बनलेलें असतें. आणि हे कण स्वतः जीवंत असे प्राणीच असतात. निरनिराळ्या रोगांत हे निरनिराळ्या प्रकारचे असतात. आणि शरीरांत व शरीराच्या बाहेरही ते जननक्रिया

करून वाढू शकतात. ह्या जीवकणांच्या शास्त्रालाच जंतुशास्त्र असें म्हणतात.

(प्रकारा) ☐ ह्या शास्त्राच्या अभ्यासानें असें दिसून आलें कीं, सार्वत्रिक रोग हे संसर्गजन्य असून विशिष्टप्रकारच्या विषापासून होतात. ~~जसें~~ प्रलापक सन्निपातज्वर, लोहितांगज्वर, गोवर, माता, तिव्हा हीं त्याचीं उदाहरणें आहेत. परंतु ~~अधिक~~ जास्त शोध केल्यानें असेंही दिसून आलें कीं, आजपर्यंत जे रोग स्थानिक म्हणून समजत त्यांपैकीं पुष्कळ संसर्गजन्य आणि विशिष्टविषापासून उत्पन्न होणारे (म्हणजेच सार्वत्रिक) आहेत. ~~उदा.~~ फुप्फुसदाह, धनुर्वात, धातसर्प आणि पूयजन्यज्वर ~~वगैरे~~ हीं त्यांचीं उदाहरणें होत. आणि हे रोग, त्यांचीं स्थानिक चिन्हें जरी विशेष स्पष्टपणें दिसून येणारीं आहेत तरी माता आणि प्रलापक सन्निपात ह्यांच्या वर्गांतच तेही घातले पाहिजेत. कारण ह्यांची सम्प्राप्ति त्या रोगांच्या संप्राप्तिसारखीच आहे. आणि म्हणूनच, रोगांचें वर्गीकरण फार कठीण जातें. कारण, शरीराच्या इंद्रियांच्या दृष्टीनें वर्गीकरण करतो म्हटल्यास ~~कोणते~~ ~~सर्व~~ एकाच इंद्रियांत न राहतां सर्व शरीरास व्यापून ~~असतात~~ राहणारे रोगही आहेत. ही अडचण त्यांत उत्पन्न होते. (ही अडचण टाळण्याकरितां रोगांचे 'स्थानिक' आणि 'सार्वत्रिक' असे दोन मोठे वर्ग करून नंतर वर्गीकरण करावें तर त्यांतही अडचणच आहे.) कारण, त्या स्थानिक रोगांचा शोध केल्यास ~~संसर्गकारक सूक्ष्म जंतु हे~~ निरनिराळ्या स्थानिक रोगांतही एकच संसर्गजनक सूक्ष्म ~~जंतु~~ जंतु दिसून आल्यामुळें त्या रोगांचे ऐक्य सिद्ध होतें. आणि नंतर असें दिसून येतें कीं, जे रोग मुख्यत्वेंकरून एखाद्या इंद्रियाला किंवा शरीराच्या कांहीं भागाला विकृत करतात आणि म्हणून जे स्थानिक मानले जातात असे पुष्कळ रोग संसर्गजन्य रोगांच्या (सार्वत्रिक रोगांच्या) वर्गांतच घातले पाहिजेत. आणि ~~[illegible]~~ आधुनिक शोधांची प्रवृत्ति प्रत्येक दाहकारक व हीनताकारक विकृतीच्या बुडाशीं व [illegible]

From the reverse.

पुढारी देशांत सूक्ष्म जंतू शोधून काढण्याकडे आहे. त्या अर्थी सांसर्गिक (सार्वत्रिक) रोगांची यादी वाढतच आहे. म्हणजे त्या यादींत, आजपर्यंत स्थानिक आणि असांसर्गिक मानलेल्या रोगांची दिवसेंदिवस भरती ~~वाढ~~ होत आहे.

Peripheeral = Pertaining to the Periphery

Periphery = ~~com~~ The circumference or bounding line

Circumcribed = Clearly defined, As an abscess

प्यारा — ह्यावरून असें उघड आहे कीं, एकाच स्थानीं विशेष जोरानें प्रकट झालेल्या रोगाला जरी स्थानिक-रोग असें आम्ही म्हटलें आहे तरी वास्तविक स्थानिक असा रोगच संभवत नाहीं. अर्थात्, स्थानिक व विपरीत अशा शस्त्रक्रियेनें रोगी दुरुस्त करणें शक्य नाहीं. ह्याच अनुमानास पोषक असा ~~Whitla चा पृ~~ पुढील उतारा पहा.

Scrofula: "Constitutional is of more importance than local treatment. The mistake is too liable to be made of regarding the enlarged glands as being always the result of some peripheral lesion through which the bacilli have gained admissi Recent ~~#~~ researches have demonstrated, as the author has shown in his Cavendish Lecture 1908 that the cervical lymphadinitis is often caused by the introduction of the bacilli through the intestinal route......

……

The remarkable tendency of the gland lesions to remain circumscribed or confined to the lymphatic system when not interfered with by efforts at removal is becoming more widely realised." (W.D.; 987)

अर्थः— गंडमाळेवर स्थानिक चिकित्सा करण्यापेक्षा सार्वशारीरिक चिकित्सा करणें जास्त महत्वाचें आहे.

~~सूक्ष्मजंतु~~ शरीराच्या बाह्य भागांतील विकृतीमधून (जखमांतून) ह्यातून प्रवेश ~~[illegible]~~ करून ~~ग्रंथींना~~ पिंडांना गाठे करतात. हेंच ~~ग्रंथि~~ पिंड ~~[illegible]~~ मोठे होण्याचें नेहमींचें कारण होय असा चुकीचा समज होण्याची फारच प्रवृत्ती आहे. अलीकडील शोधांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, (हें आणि ह्याच ग्रन्थकर्त्यानें १९०८ च्या कॉन्व्होकेशन व्याख्यानांत दाखविलें आहे ~~कीं~~) ~~[illegible]~~ गंडमाळा हा रोग पोटांतून गेलेल्या सूक्ष्मजंतूपासून उत्पन्न होतो. ~~ग्रंथि वृद्धि~~ पिंड वृद्धी हा रोग शस्त्रक्रियेनें ~~ग्रंथि~~ पिंड काढून टाकण्याचा प्रयत्न न केल्यास ~~ग्रंथि~~ पिंडांना सोडून इतर ठिकाणीं ~~[illegible]~~ न जातां ~~ग्रंथींत~~ पिंडांतच व्यापून राहतो हा जो त्याच्या ठिकाणीं विलक्षण धर्म आहे त्याची जाणीव दिवसेंदिवस जास्त होत चालली आहे. (म्हणजे ~~ग्रंथि~~ पिंड काढण्याचा प्रयत्न केल्यास तो रोग ~~ग्रंथि~~ पिंडांना सोडून इतर भागांतही जातो हा गर्भितार्थ ह्या उताऱ्यांत आहे.)

(ज्यास)

येथें असा आक्षेप घेण्यांत येईल कीं, जखम किंवा मार स्थानिक असला तरी त्याचे परिणाम सर्व शरीरावर होतात. मग शस्त्रक्रिया स्थानिक असली तरी तिचे परिणाम सर्व शरीरावर कां होऊं नयेत. ह्याचें उत्तर असें:- शस्त्रक्रियेचेही परिणाम सर्व शरीरावर होऊं शकतात; पण ती विपरीत चिकित्सा असल्यामुळें तिचे परिणाम अनिष्ट असेच होतील — म्हणजे स्थानिक रोग पुन: पलटेल किंवा अन्य रोग होईल. शिवाय, शस्त्रक्रिया ही नेहमीं एक प्रकारचीच असल्यामुळें व स्थानिकाचे हेतु उत्पन्न करणाऱ्या शरीरविकृती अनेकप्रकारच्या असल्यामुळें शस्त्रक्रिया नेहमींच सुखावह होणार नाहीं. जखम, मार वगैरे सारख्या रोगांवरच ती विपरीतार्थकारी चिकित्सा होत असल्यामुळें ~~सार्व~~शारीरिक परिणाम घडवून हितकर होईल. परंतु इतर प्रसंगीं हितकर होणार नाहीं.

रोग दुरुस्त करण्याकरितां शस्त्रक्रियेचा उपयोग करणें केव्हांही इष्ट नाहीं. तथापि, ज्या ज्या प्रसंगी विपरीत चिकित्सा करावी म्हणून आम्ही ठरविलें आहे त्या त्या प्रसंगी शस्त्रक्रिया ही करावी हें उघड आहे. ह्या दृष्टीनें शस्त्रक्रिया करण्याची जरूरी साधारणपणे पुढील प्रसंगीं पडते- (१) शरीरांत घुसलेलें शल्य बाहेर काढणें (२) अंतर्विद्रधि मध्ये झालेला पू फुटून शरीरांत पसल्याच ठिकाणीं जिरून मरण आणण्यापूर्वी विद्रधि फोडून पू बाहेर काढणें (३) अंतर्गळ (incarcerated hernia) सारखे रोग शरीररूपी यंत्राची रचना बिघडवून व शरीरांत होणाऱ्या निरनिराळ्या गतीला प्रतिबंध करून तत्काळ मारक होतात. अशा रोगांवर शस्त्रक्रिया करून तत्काळ मृत्यु टाळणें. आडवे आलेलें मूल कापून काढणें, मुतखडा काढणें, घटसर्प रोगांत श्वासनलिकाच्छेद करणें, अत्यंत स्रावाच्या फुफ्फुसावरण प्रतिश्यायांत (Pleurisy with effusion) हृदयादि इंद्रियांचें स्थानांतर व फुफ्फुसांचें संकोचन टाळण्याकरितां टोंचून पाणी बाहेर काढणें वगैरे क्रियांचा ह्यांत अंतर्भाव होतो. (४) रक्तस्रावासारख्या विकारानें होणारी अत्यंत मारक अशी अशक्ती शस्त्रक्रियेनें टाळणें. ह्या जरूरीच्या शस्त्रक्रियां शिवाय इतर प्रसंगीं ॲलोपॅथीचा आश्रय ज्यामुळें घ्यावा असें ॲलोपॅथींत कांहींच नाहीं असें वरील ऊहापोहावरून कोणासही दिसून येईल. परंतु शस्त्रक्रिया ही ॲलोपॅथीचीच नसून पाहिजे त्या पॅथीची ~~होऊ~~ असू शकेल त्या अर्थीं ॲलोपॅथींत खरोखर कांहींच नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

आयुर्वेद ~~निरीक्षण~~ परीक्षण

य असतें

अॅलोपॅथीनें दुरुस्त न झालेल्या हिंदूंचें मन ~~ब~~हुत करून साहजिकचें आयुर्वेदाकडे वळतें म्हणून आतां आयुर्वेदाचें निरीक्षण करूं. ~~आयुर्वेदप्रवर्तक ऋषींनां~~ (त्यांनीं) आयुर्वेदप्रवर्तक ऋषींना सामान्याचीकेल्सा तत्वाचें महत्व ओळखून चुकले होते. व जें सामान्य तत्व त्यांनीं ठरविलें, [redacted] ~~तें सत्य तें त्याच~~ ते असें:— ~~बरेंच सत्य आहे असें दिसून येईल. (च. वि. स्था.) येथें~~ ~~वाग्भट सू. अ. ८~~ ~~त्यांत म्हणतात कीं,~~

एवमन्यानपि व्याधीन् स्वनिदान विपर्ययात् ॥२२॥
चिकित्सेदनुबंधे तु सति हेतुविपर्ययम् ॥
त्यक्त्वा यथायथं वैद्यो युंजात् व्याधिविपर्ययम् ॥२३॥
तदर्थकारि वा - - - - - - -

— वाग्भट, सू. अ. ८

अर्थ— धान्यप्रमाणें इतर रोगांचीहि चिकित्सा त्यात्या रोगांच्या कारणाचा विपर्यय (अभाव) करून ~~चिकित्सा~~ करावी. या प्रमाणें चिकित्सा करूनहि रोगाचें शमन न झालें तर त्या चिकित्सेचा त्याग करून (तीवरच अवलंबून न राहतां) व्याधिविपरीत किंवा व्याधिविपरीतार्थकारि चिकित्सेपैकीं त्यावेळीं जी योग्य असेल ~~ती~~ (यथायथम्) ती चिकित्सा करावी.

∴ वरील वचनांत हेतुविपर्यय म्हणजे रोगाचें जें कारण झालें असेल त्याच्या उलट क्रिया करून, म्हणजे थंडीनें रोग झाला असल्यास ~~थंडीनें~~ उष्णतेनें व उष्णतेनें रोग झाला असल्यास थंडीनें इत्यादि प्रकारें चिकित्सा करावी असा अर्थ घेतल्यास ~~चूक~~ ती चिकित्सा नव्हे ~~चूक आहे~~ असें मागें दिसून आलेंच आहे. आणि ~~त्याचा~~ रोगाचें का नाहीसें करावें ~~इतकाच~~ हा ~~याचा~~ यांना अर्थ ~~असल्यास~~ घेतल्यास तें बरोबरच आ

मागें ५६८. ~~उलट आहे परंतु हेतुविपर्यय म्ह~~ ~~वरील दोन अर्थांपैकीं येथें कोणाच्या मनांत असलाच अर्थ होता असें निश्चितपणें सांगणे कर्म आहे.~~ ~~विपर्यय~~ परंतु तसा अर्थ विपर्यय या शब्दावरून निघ ~~तसा अर्थ~~ ~~कोणी काढल्यास~~ कदाचित् हेतु~~चा~~ विपर्यय करणें व हेतु करणें ~~या अर्थात स्वदेशभेद व त्यांचे होणारे भिन्नभिन्न परिणा~~ ~~त्या लक्षांत अ~~

(यथायथं) या शब्दावरून केव्हां व्याधिविपरीत चिकित्साच करणें

* हा चरकसंहिता वि. स्था. सात्विलनुबंधे – – – – – – – – –
– – – – – कुशलाः तदर्थकारिवा ॥ १५॥ ह्या वचनाचा अनुवाद होय

☒ *मार्ग दिसून आलेच आहे. म्हणून, आम्ही 'विपर्यय' याचा अर्थ अभाव किंवा निबर्हण असाच येथे घेतो. पुढेही वाग्भट अध्याय १३ श्लोक २४ यांत असलेल्या विपर्यय शब्दाचा अर्थ अभाव असाच आहे, असे दाखविले आहे. त्या आधारावर येथेही अभाव किंवा निबर्हण असा अर्थ घेतल्यास आयुर्वेदातील ह्या वचनाची चिकित्सेच्या सत्तत्वाशी उत्तम मेळ बसतो.
~~म्हणून विप~~

कृतापतर्पणानां व्याधीनां निग्रहे निमित्तविपरीत
मपास्यौषधं आतंकविपरीत मेवावचारयेत् । यथास्वं
सर्वविकाराणामपि च निग्रहे हेतुव्याधिविपरीतम्
औषधमिच्छंति कुशलाः स्तदर्थकारिणा ॥

असतें व केव्हां व्याधि विपरितार्थकारिचिकित्सा करणें योग्य असतें असें स्पष्ट दिसतें. परंतु हें कसें ओळखावें अशी शंका आल्यास तिचें उत्तर वाग्भटानें पुढील वचनांत देऊन ठेविलें आहे:—

" स्रोतोरोधबलभ्रंशगौरवानिलमूढता: ॥२३॥
आलस्यापक्ति निष्ठीव मलसंगारुचि क्लमा: ॥
लिंगं मलानां सामानां निरामाणां विपर्यय: ॥२४॥
— — — — — — — — —
— — — — — — — — — — — —

सर्व देहप्रविसृतान सामान् दोषान् न निर्हरेत् ॥
लीनान् धातुष्वनुत्क्लिष्टान् फलादाम्ररसानिव ॥२५॥
आश्रयस्य हि नाशाय ते स्युर्दुर्निर्हरत्वत: ॥
पाचनैर्दीपनै: स्नेहैस्तान् स्वेदैश्च परिष्कृतान् ॥२९॥
शोधयेच्छोधनै: काले यथासन्नं यथाबलम् ।
~~हन्त्याशु युक्तं वक्त्रेण द्रव्यमामाशयान्मलान्~~ ॥३०॥
~~घ्राणेन चोर्ध्वजत्रुस्थान्~~ — — — — — —
उत्क्लिष्टानध ऊर्ध्वं वा न चामान्वहत: स्वयम् ॥३१॥
धारयेदौषधैर्दोषान् विधृतास्ते हि रोगदा: ॥
प्रवृत्तान् प्रागतो दोषानुपेक्षेत हिताशन: ॥३२॥
विबद्धान् पाचनैस्तैस्तै: पाचयेन्निर्हरेत वा । (वाग्भट सू. स्था. अध्याय १३)

अर्थ:— स्रोतसांचा अवरोध (स्रोतसें दुष्ट असणें) बलहानि, वायुचा योग्य रीतीनें संचार न होणें, आलस्य, अपचन, तोंडास पाणी सुटणें मलबद्धता, अरुचि, ग्लानि हीं सामदोषांची चिन्हें होत. निराम-दोषांची चिन्हें ह्यांच्या उलट असतात; म्हणजे निराम दोषांत ह्या चिन्हांचा अभाव असतो. * (मागें पहा)

~~त्यांपैकी~~ सामदोष ~~सामदोष~~ सर्व देहांत पसरलेले ~~(म्हणजे शरीरांत कोठेंही असलेले~~ असतात. ते जर ~~(आणि~~ धातूंत लीन झालेले ~~आणि~~ म्हणजेच स्वस्थानापासून च्युत न झालेले (न सुटलेले) असे ~~असतील~~ असतील तर त्यांना एकदम बाहेर काढून टाकूं नये. ज्याप्रमाणें अपक्व (कच्च्या) आंब्यांतील रस काढूं गेले असतां तो न निघतां आंब्याचाच नाश

टिप :: येथें 'विपर्यय' शब्दाचा अर्थ अभाव असाच आहे. कारण मलबद्धता हें आमदोषाचें चिन्ह सांगितलें आहे. त्याचा विपर्यय म्हणजे हगवण, व हगवण ही निरामदोषाचें चिन्ह होय असें म्हणता येणार नाहीं. परंतु मलबद्धतेचा अभाव हा निराम दोषाचें चिन्ह म्हणता येईल.

☒ शप: 'अरुणदत्त टीकाकारानें ह्याचा अर्थ असा केला आहे कीं, "आमदोष सर्व देहांत पसरलेले असल्यास त्यांस काढून टाकूं नये परंतु शरीराच्या एखाद्या भागांत आमदोष असल्यास त्यांस काढावें" परंतु हा अर्थ चूक आहे कारण वाग्भटानें ह्या सिद्धान्ताचें जें कारण दिलें आहे ~~तें म्हणजेच~~ (आशयस्थाहि नाशाय तेस्युर्दुर्निर्हरत्वतः) त्यांतील आशय न दुर्निर्हरत्व या सामान्य शब्दावरून तें सर्व शरीरास किंवा शरीराच्या एका भागासही लागूं आहे. म्हणजे शरीराच्या एका भागांतच असलेले आमदोष जरी काढून टाकले तरी ते त्या भागाच्या नाशास कारण होतील हा वाग्भटाचा उद्देश स्पष्ट आहे.

होतो त्याप्रमाणें सामदोषांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्यास शरीराचा नाश होतो. कारण शरीरापासून ते दोष वेगळे करणें अशक्य असते. म्हणून त्यावर पाचन, दीपन, स्नेहन व स्वेदन हे संस्कार करून, ते पक्व झाले म्हणजे जवळच्या मार्गानें व रोग्याचें शक्तिमान पाहून त्यांना काढून टाकावे. आमदोष केव्हां केव्हां स्वस्थानापासून च्युत होऊन ~~स्वाळि किंवा वर आतात~~. स्खलून किंवा [illegible] आपोआपच वाहतात. त्यावेळीं त्यांना औषधांनीं धरून ठेऊं नये. कारण, धरून ठेवले असतां ते रोग उत्पन्न करतात. म्हणून या वेळीं पहिल्यानदां पथ्यानें राहून बाहेर जाणाऱ्या मळांची उपेक्षा करावी. किंवा ते बद्ध होऊन थोडे थोडेच बाहेर जात असतील (विबंधात्.×) तर त्यांस योग्य पाचनक्रियांनी पक्व करावे, म्हणजेच त्यांस बाहेर काढावें.

येथें स्रोतोरोध म्हणजे काय हें समजलें पाहिजे. स्रोतोरोध म्हणजे स्रोतसें दोषानें बिघडणें. तसें आलें म्हणजे काय होतें तें पुढील वचनांवरून समजेल:-

'स्रोतांसि नासिके कर्णौ नेत्रे पाय्वास्यमेहनं ॥१०॥
स्तनौ रक्तपथश्चेति नारीणामधिकं त्रयं ।
जीवितायतनान्यंतः स्रोतांस्याहुस्त्रयोदश ॥११॥
प्राणधातुमलांभोन्नवाही न्यहितसेवनात् ।
तानि दुष्टानि रोगाय विशुद्धानि सुखाय च ॥१२॥
- - - - - - - - - - - - -
अतिप्रवृत्तिः संगो वा सिराणां ग्रंथयोऽपि वा ।
विमार्गतो वा गमनं स्रोतसां दुष्टिलक्षणं ॥२४॥

-शारीरस्थान, अध्याय ३

अर्थ:— नाक, कान, डोळे, तोंड, गुद, आणि मूत्रद्वार अशीं मनुष्याच्या शरीरांत नऊ स्रोतसें आहेत. स्त्रियांत दोन स्तन व योनि

हीं तीन ~~[illegible]~~ स्रोतसें जास्त आहेत. जीवाचीं स्थानें अशीं तेरा अंतःस्रोतसें आहेत. तीं प्राणवह, रसवह, ~~म~~ रक्तवह, मांसवह, मेदोवह, आस्थिवह, मज्जावह, शुक्रवह, शकृद्वह, मूत्रवह, स्वेदवह, उदकवह, अन्नवह हीं होत. हीं अपथ्य सेवनानें दूषित झाल्यास रोग होतो, व शुध्द झाल्यास मनुष्य निरोगी होतो. धातूंची किंवा मळांची अतिप्रवृत्ती किंवा अप्रवृत्ती ~~झाल्यास~~ किंवा अयोग्य मार्गानें प्रवृत्ती झाल्यास किंवा स्रोतसांत ग्रन्थि होणें, (हें मळाच्या अप्रवृत्तीनें म्हणजे सांचल्यानें होईल.) हीं स्रोतसें दुष्ट झाल्याचीं लक्षणें होत. ~~विपरीतार्थकारि चि~~

फार्म पूर्ण.

(प्यारा) फार्म नं. ५ सुरुव

☐ ~~व~~विपरीतार्थकारि चिकित्सा म्हणजे काय हें समजून घ्यावयाचें असल्यास चरक संहिता नि. स्था. येथील उपशय 'पुनर्हेतुव्याधिविपरीतानां विपरीतार्थकारिणांचौषधाहारविहाराणां मुपयोगः सुखानुबंधः' ॥१०॥ ह्या वचनावरील चक्रपाणिदत्त ह्याची टीका पहावी. ह्या टीकेंत उलटीवर उलटी करणारे मदनफळ आणि अतिसारावर रेच करणारे दूध ही व्याधिविपरीतार्थकारि चिकित्सेची उदाहरणें तो देतो. आणि उपशय म्हणजे चिकित्साच होय. ('उपशयस्तु चिकित्सा') असें तोच ह्या श्लोकाच्या मागील श्लोकाच्या टीकेंत म्हणतो. ह्यावरून, व्याधिविपरीतार्थकारी चिकित्सा म्हणजे समाचिकित्साच होय हें उघड आहे.

प्यारा ~~#~~ आयुर्वेदांत व्याधिविपरीत व व्याधिविपरीतार्थकारि अशा दोन्ही चिकित्सा मान्य केल्या असल्यामुळें विपरीत चिकित्सा केव्हां करावी आणि विपरीतार्थकारि चिकित्सा केव्हां करावी हें सांगणें भागच होते. आणि तेंच अंशतः वाग्भटानें सू. स्था. अध्याय १३ ह्यांतील मागें दिलेल्या ~~[illegible]~~ वचनांत सांगितलें आहे, असें ~~[illegible]~~ मनुष्यास दिसून येईल.

आमदोष, शरीरांत बद्ध होऊन राहील तर त्यांस पक्व होण्यापूर्वी बाहेर काढूं नये, आणि जर ते आपोआपच बाहेर वाहत असेल तर त्यांस पक्व होण्यापूर्वी धरून ठेवूं नये; ह्याचा उघड उघड अर्थ हाच आहे कीं, अशा वेळीं व्याधिविपरीत चिकित्सा करूं नये; अर्थात्, सू. स्था. अध्याय ८ श्लोक २३।२८ ह्यांत मान्य केलेल्या व्याधीविपरीत आणि व्याधीविपरीतार्थकारी ह्या दोन्हीं चिकित्सांपैकीं ढिळक वाहिलेली दुसरी चिकित्सा करावी. ~~को~~ ह्या अर्थाबद्दल कोणास संशय असेल तर आयुर्वेदांत आमातिसारावर ~~वा~~ स्तम्भक औषधें (पथ्यें) सांगितलीं असून बाळहिरड्यासारखीं रेचक औषधें सांगितलीं आहेत (च. सं. चि. स्था. अध्याय १० ५१ वा) इकडे लक्ष द्यावें म्हणजे हा संशय राहणार नाहीं. तसेंच, पुढील वचनांत ज्वरावर ही विपरीतार्थकारी क्रिया हीच सत्क्रिया होय असें स्पष्ट सांगतें.

"ज्वरप्रमोक्षे पुरुषः कूजन्वमति चेष्टते ।
श्वसन्विवर्णः स्विन्नाङ्गो वेपते लीयते मुहुः ॥३१९॥
प्रलपत्युष्णसर्वाङ्गः शीताङ्गश्च भवत्यपि ॥
विसंज्ञो ज्वरवेगार्तः सक्रोध इव वीक्ष्यते ॥३२०
सदोषशब्दश्च शकृद्द्रवं स्रवति वेगवत् ॥
लिङ्गान्येतानि जानीयाज्ज्वरमोक्षे विचक्षणः ॥३२१॥
बहुदोषस्य बलवान्प्रायेणाभिनवो ज्वरः ॥
साक्रिया दोषपक्वाचेद्विमुच्यति सुदारुणम् ॥३२२॥
कृता दोषवशाद्वेगं क्रमादुपरमान्ते ये ।
तेषां मन्दबलो मोक्षो ज्वराणां चिरकालिनाम् ॥३२३॥

अर्थः — ज्वर जातांना रोग्याच्या घशांत शब्द होतो; त्यास उलटी होते; रोगी गडबडा लोळतो; धापा टाकतो; विवर्ण होतो; त्यास घाम येतो; अंग कापतें; वरचेवर निश्चेष्ट पडतो; बडबड करतो; सर्वांग उष्ण होतें; केव्हां केव्हां अंग थंडही होतें; बेशुद्ध होतो; ज्वराचा वेग वादल्यानें पीडित होतो; रागावलेल्या मनुष्याप्रमाणें पाहतो; जोरानें पातळ,

६ दोषयुक्त

व, आवाजासहित परसाकडे होते. हीं चिन्हें झालीं असतां शहाण्यानें ज्वर जात आहे असें समजावें. हीं चिन्हें, बलवान अशा आमज्वरावर योग्य अशी चिकित्सा (सत्क्रिया) केल्यामुळें त्याच्या दोषांचें पचन होऊन तो जेव्हां रोग्यास दोषाच्या जोरामुळें ~~भयंकर~~ आपलें दारुण स्वरूप दाखवून सोडतो तेव्हां होतात. परंतु जे ज्वर (~~चिकित्सा न केल्यामुळें~~) पुष्कळ वेळ राहून हळूहळू जातात ते ~~सोड~~ रोग्याला सोडतांना असें दारुण रूप दाखवीत नाहींत.

वरील वचनांवरून ज्वरावर केलेली सत् चिकित्सा प्रथमतः ज्वराला वाढविते व नंतर त्याला कमी करते हें उघड आहे. ~~१२~~ त्याच अध्यायांतील १३८ व्या श्लोकांत सांगितलेली स्वेदन क्रिया (लंघन, उष्णजल वगैरे) ही सत् चिकित्सा, होय हें उघड आहे. तेथीलच १३७ व्या श्लोकांत आमज्वरावर स्नान वर्ज सांगितलें आहे. एकंदरीत चरकसंहितेच्या मतानें ज्वरावरही विपरीत चिकित्सा वर्ज्य असून विपरीतार्थकारी चिकित्सा इष्ट आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ~~कोणत्याही~~ कित्येक आमरोगावर विपरीत चिकित्सा न करतां विपरीतार्थकारी चिकित्सा करावी हाच आयुर्वेदाचा हेतु दिसतो. ~~एकंदरीत रोगावर विपरीत किंवा विपरीतार्थकारी चिकित्सा करावी आणि कित्येक प्रसंगी विपरीत चिकित्सा न करता विपरीतार्थकारी चिकित्सा करावी हा या शास्त्राचा सामान्य सिद्धांत [illegible]~~

हा समय ज्यापानावर पहा

॥ ·धारा74

आतां आमरोगाची व्याख्या पाहावी तर तींत स्रोतोरोध हें मुख्य (स्रोतसें दूषित होणें) लक्षण आहे. आणि स्रोतोरोध म्हणजे मळ शरीरांत धरून राहणें किंवा आपोआप अयोग्य रीतीनें बाहेर पडणें. ~~स्रोतोरोधांत हीं चिन्हें होतात~~. स्रोतसें दुष्ट आहेत तोपर्यंतच रोग असतो आणि तीं शुद्ध झालीं म्हणजे मनुष्य निरोगी होतो (तानि दुष्टानि रोगाय विशुद्धानि सुखाय च) असेंही स्पष्ट म्हटलें आहे. (मागे पहा) ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, ~~स्रोतोरोध~~ आमरोग म्हणजे कोणताहि ~~रोग~~ स्थिती तीली रोग म कोणताहि आणि निरोम रोग म्हणजे सुख किंवा आरोग्य. अर्थात ~~रोगाच्या~~ कोणत्याहि रोगाच्या आमस्थितीत विपरीत क्रिया करूं नये, विपरीतार्थकारीच क्रिया करावी असें आयुर्वेदाचें तत्त्व सिद्ध होतें.

ज्वर झाल्याने ~~आले~~ खोकले नाही असे मानावे

ह्यावर कांहीं आक्षेप येतील. त्यांचें निराकरण करूं. पहिला आक्षेप असा की, स्रोतोरोध हा शब्द स्रोतसें दोषांनीं रुद्ध होणें म्हणजे स्रोतोदोष या अर्थीं आम्हीं घेतला आहे. परंतु त्याचा अर्थ स्रोतोदोषानें शरीरांत

खोकले नाही असे समजावे

रोगाचें कारण स्रोतोदोष किंवा दुसरें कोणतें तरी होय असें मानल्यास स्रोतोदोष नाहींसा झाल्यास आरोग्य होतें असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. कारण तें दुसरें कारण तेव्हां शिल्लक असण्याचा ~~अ~~संभव असतो. म्हणून वरील वचनाचा अर्थ असा कीं स्रोतोदोष हें एकटेंच रोगाचें कारण आहे. म्हणजे कोणताही रोग असेल तेथें स्रोतोदोष असलाच पाहिजे व स्रोतोदोष असेल तेथें रोग असलाच पाहिजे. आणि स्रोतोदोष गेला कीं पूर्ण आरोग्य ~~आहे~~ असलें पाहिजे.

लाल रेषा रद्द करण्याच्या व तो (५८) मजकूर छापावा

मलबद्ध होऊन राहणें असा घेतला पाहिजे असें कोणी म्हणतील. हें म्हणणें चूक आहे. कारण, या प्रमाणें अर्थ केल्यास आमदोषामध्यें मलाचें बाहेर वाहणें याचा अंतर्भाव होणार नाहीं. परंतु ज्या वचनाचा आपण विचार करीत आहोत त्यांत तर आमदोष जर स्वतः बाहेर वाहत असेल तर त्यांस धरून ठेऊं नये असें स्पष्ट म्हटलें आहे. अर्थात मलांच्या बाहेर वाहण्याचा अंतर्भाव आमदोषांत करणें जरूर आहे. आणि असा अंतर्भाव स्रोतोरोध म्हणजे स्रोतोदोष असा अर्थ घेतला तरच होऊं शकतो हें उघड आहे.

दुसरा आक्षेप असा कीं, आम्हीं ~~रोगाच्या~~ कोणत्याही रोगाच्या कोणत्याही स्थितीवर विपरीत चिकित्सा करूं नये हें जें अनुमान काढलें, तें आयुर्वेद-प्रवर्तकांना मान्य नाहीं. व तें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. कारण तसें असतें तर सामान्य सिद्धान्त सांगताना विपरीत आणि विपरीतार्थकारी अशा दोन्ही चिकित्सा त्यांनीं सांगितल्या नसत्या. विशेषतः वाग्भटाच्या १३ व्या अध्यायांतील ज्या वचनाचा विचार चालला आहे त्या वचनांतच बद्ध झालेल्या मलावर त्यांनीं शोधन सांगितलें नसतें. या आक्षेपकास आयुर्वेदाचें खरें रहस्यच समजलें नाहीं. प्रत्येक रोगाच्या आम आणि ~~(अशा स्थितींत रोग परत येण्याचा संभव असतो म्हणूनच)~~ निराम ~~म्हणजेच पक्व म्हणजे जितावस्था~~, अशा दोन अवस्था कल्पून आमावर विपरीतार्थकारी चिकित्साच करावी आणि ~~पक्व~~ निराम पक्वावरच शोधन क्रिया म्हणजेच येथें विपरीत चिकित्सा करावी, आणि तीही यथाबल म्हणजे रोग्याची सहनशक्ती पाहून करावी हें आयुर्वेदाचें रहस्य होय. विपरीतक्रिया रोग्याची सहनशक्ती पाहून करावी ह्याचा मागें जे आम्हीं चिकित्सा तत्वाचें सामान्य विवेचन केलें त्या दृष्टीनें अर्थ केल्यास तो असा होतो कीं, विपरीत क्रिया इतकी अल्प करावी कीं, तिची दुसऱ्या किंवा तिसऱ्या नियमाप्रमाणे प्रतिक्रिया होऊं नये.

[illegible]

प्रत्येक आक्षेपाला
वेगवेगळा जबाब
द्यावा.

[illegible]

(व्याख्या) रोग पक्व झाल्यावरही म्हणजे जिंकल्या गेल्यावरही ~~बाहेरला आल्यावरही~~ विपरीत चिकित्सा मग सांगितली तरी कशाला, अशी शंका कोणास येईल तिचें उत्तर पुढील वचनांत आहे:-

" दोषा: कदाचित् कुप्यन्ति जित्वा लंघनपाचनै: ।
येतु संशोधनै: शुद्धा न तेषां पुनरुद्भव: ॥२०॥ वाग्भट- सू. स्था. अध्याय ४

अर्थ:- लंघनपाचनांनीं जिंकले गेलेले दोष कदाचित् पुन: कोपतात. परंतु लंघनपाचनांनीं जिंकल्या गेल्यानंतर (संशोधनांनी) शुद्ध झालेले रोग पुन: उत्पन्न होत नाहीत. अर्थात्, जिंकल्या गेलेला रोग पुन: येऊं नये म्हणूनच संशोधनरूपी विपरीत क्रिया सांगितलेली आहे. रोग प्रथमत: जिंकण्याला म्हणजेच पक्व करण्यास आयुर्वेद विपरीतार्थकारि चिकित्साच सांगतो.

(व्याख्या) ☐ ~~तिसरा~~ तिसरा आक्षेप असा ~~कीं~~ येईल कीं, आयुर्वेदाचें खरें तत्व, विपरीत किंवा विपरीतार्थकारी चिकित्सा नसून ~~हे~~ रसचिकित्सा, म्हणजे पित्तावर ~~क~~ मधुर, कषाय आणि कडू रसाचें औषध देणें; कफावर तिखट, कडू किंवा कषाय रसाचें औषध देणें वगैरे, ही होय. विपरीत ~~व~~ किंवा विपरीतार्थकारि चिकित्सा सांगणारीं वचनें गौण होत. " ह्या आक्षेपकानें वाग्भटाच्या पुढील वचनाकडे लक्ष द्यावें:

"रसं विपाकस्तौ वीर्यं प्रभावस्तान् व्यपोहति ।
बलसाम्ये रसादीनां इति नैसर्गिकं बलम् ॥२५॥
रसादि साम्ये यत्कर्म विशिष्टं तत् प्रभावजम् ।
दंती रसाद्यैस्तुल्यापि चित्रकस्य विरेचनी ॥२६॥
- - - - - - - - - - - -
~~स्वादुर्गुरुश्च गोधूमो वातजित् वातकृद्यव: ॥२७॥~~

अर्थ:- विपाक रसाचा पराभव करतो; वीर्य, रस आणि विपाक ह्या दोहोंचा पराभव करतें आणि प्रभाव रस, विपाक व वीर्य ह्या तिहींचाही पराभव करतो. रसादिकांचें बल सारखें असलें तरी त्यांचें नैसर्गिक बल असें असतें. रस, विपाक आणि वीर्य हीं सारखीं असूनही कोण्या एका

८

~~[illegible]~~ ८४

पदार्थांत विशिष्ट कार्य असतें तें प्रभावामुळेंच असतें. उदाहरणार्थ, चित्रक व दंती ह्यांत रस, विपाक व वीर्य सारखींच आहेत तरी विशिष्ट प्रभावामुळें दन्ती हीच रेचक आहे.

ह्यावरून दिसून येईल कीं, कोणत्याही पदार्थाचा प्रभाव हाच मुख्य गुण होय; व तो पाहूनच त्या पदार्थाचा चिकित्सेंत उपयोग करावा लागेल. आणि अर्थातच प्रभावापेक्षां कमजोर असलेला रस ह्यानें केलेली चिकित्सा गौण होते. आणि आयुर्वेदीय चिकित्सा म्हणजे प्रभावचिकित्साच होय असें स्पष्ट ठरतें.

प्यारा II आतां आयुर्वेदांत एके ठिकाणीं प्रभावचिकित्सा सांगितली आहे, आणि दुसरे ठिकाणीं विपरीत किंवा विपरीतार्थकारी चिकित्सा सांगितली आहे असे म्हणणे प्राप्त होते. ह्या दोन्हीं ठिकाणच्या वचनांची एकवाक्यता करणें जरूर आहे. आणि अशी एकवाक्यता केल्यास असा सिद्धान्त सिद्ध होतो कीं, औषधीमध्यें जो रोगहारक प्रभाव असतो तो त्याच्या ~~विपरीतकारित्वामुळें~~ किंवा विपरीतार्थकारित्वामुळें असतो. एकंदरीत, एकवाक्यतेच्या आवश्यकतेमुळें विपरीत आणि विपरीतार्थकारी चिकित्सा गौण ठरूं शकत नाहीं. आणि ह्या दोहोंपैकीं कोणती केव्हा उपयोगांत आणावी ह्याचें स्पष्टीकरण आयुर्वेदानुसार आम्हीं केलेंच आहे.

वरील आयुर्वेदांतील वचनांच्या व्याख्यानावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, आयुर्वेदांत सांगितलेले ~~चिकित्सा तत्व~~ त्या ~~तीनी~~ सामान्य चिकित्सा तत्त्वांत ~~[illegible]~~ कांहींसे सत्य आहे. ~~हा बद्दल~~ कारणास्तव

मागे पहा

लाल रेषा [illegible]

~~आयुर्वेदप्रवर्तक ऋषी बद्दल कोणालाही अत्यंत आदर वाटला पाहिजे. आणि हा लेखक त्याला अपवाद नाहीं. तथापि दोषावाच्या पुरो[illegible] या न्यायानें आयुर्वेदांतील दोषही सांगितले पाहिजे. ह्यापासून सत्यशोधक अशा आपल्या ऋषींस आनंदच होईल.~~

मागे पहा. → ~~पाहिजे दोष. दोष पुढे होऊन गेलेल्या ऋष्यानंतरही अनवश्यक असलेली शोधनत्रयी विपरीत औषध आयुर्वेदांत सांगितली आहे तें बरोबर नाहीं. दोष पुढे हा त्याचा ते आपल्या [illegible]~~

मागें पहा.

~~आमरोगावर कित्येक प्रसंगीं विपरीत चिकित्सा करूं नये आणि विपरीतार्थकारी चिकित्सा करावी हेंच तें होय. हें अर्थातच अपूर्ण आहे. कारण कोणत्याही आम किंवा पक्व रोगावर विपरीतार्थकारीच चिकित्सा केली पाहिजे हें मागें सिद्ध झालेंच आहे. एकंदरीत आयुर्वेदातील चिकित्सेच्या दृष्टीनें केलेला आम व पक्व असा रोगांचा विभाग चूक असून आयुर्वेदोक्त सामान्य तत्व ही अपूर्ण आहे.~~

पहिला दोष: विपरीतार्थकारी चिकित्सेने जिंकले गेलेले रोग केव्हा केव्हां पुन: उद्भवतात परंतु यावर विपरीत चिकित्सा~~नें~~ ~~जिंकले~~ केली असतां ते पुन: उद्भवत नाहीत, (वाग्भट सू.स्था. अ. ४ श्लो. २७) हे आयुर्वेदाचे मत बरोबर नाहीं. विपरीतार्थकारी चिकित्सेने जिंकलेला रोग पुन: कां उद्भवतो याचा विचार केला असतां हे ~~[illegible]~~ दिसून येईल. रोगाचा सूक्ष्म (स्पष्टपणे दिसून न पडणारा) अवशेष कायम राहिला तर तोच वाढून रोग पुन: येईल व हा अवशेष घालविण्यास वास्तविक विपरीतार्थकारी चिकित्साच केली पाहिजे; विपरीत चिकित्सा हें कार्य करूं शकणार नाहीं हें उघड आहे. ~~किंवा~~ विपरीत चिकित्सा न केल्यास रोग कदाचितच पुन: उद्भवतात - म्हणजे पुष्कळ वेळां पुन: उद्भवत नाहींत हाच अर्थ वरील वाग्भटाच्या त्या वचनांत आहे, त्यावरूनही रोग निर्मूल करण्यास ~~सम~~ विपरीत चिकित्सेची आवश्यकता नाहीं व विपरीतार्थकारी चिकित्सा पूर्णपणें समर्थ आहे असेंच ठरतें..

~~बाहेर निघून जातात. त्यांस काढण्यासाठी प्रयत्न करावा लागत नाही. पक्व झालेल्या स्फोटकातून पू आपोआपच फुटून बाहेर पडतो. त्याला शस्त्रक्रिया करण्याची वास्तविक जरूरी नसते. अजीर्णापासून आलेला आमदोष लंघनाने पक्व झाला म्हणजे तो आपोआपच बाहेर पडतो त्याला वास्तविक रेचक किंवा सारक औषध देण्याची जरूरी नाहीं. आंबा चांगला पिकला म्हणजे [illegible] आपोआपच गळून पडतो त्याप्रमाणेच हें आहे. केवळ विपरीतार्थकारी चिकित्सा करणाऱ्यांना संशोधनार्थ विपरीतचिकित्सेची केव्हांच गरज पडत नाहीं हा प्रत्यक्ष अनुभव येतो. म्हणून पक्व झालेल्या रोगावर सांगितलेली शोधनचिकित्सा यथावत केल्यास अहितकारक जरी नाहीं तरी आवश्यक नाहीं हें उघड आहे. अशी चिकित्सा केली असता रोग पुनः परत येत नाहीं हें जें म्हटलेलें आहे हें अनुभवाच्या कसोटीस उतरत नाहीं कारण अशी चिकित्सा न केली तरीही रोग उलटत नाहीं असा अनुभव आहे.~~

हे खोडलेले समजावे.

दुसरा दोष— आमरोगावरही विपरीतचिकित्सा करण्याचे दोन प्रसंग आम्हीं दाखविले आहेत; व अशा वेळीं ही विपरीत क्रिया किती जोराची व किती वेळ करावी हें ही तेथेंच दाखविलें आहे. विपरीत क्रियेचे हे (×) प्रसंग व नियम आयुर्वेदांत सांगितलेले कोठें आढळून येत नाहींत. म्हणजे विपरीतचिकित्सा जेव्हां अवश्य आहे तेव्हां आयुर्वेदांत सांगितलेली नाहीं.

नं: ३ हीपण गाळावा

तिसरा दोष— आयुर्वेदांतील औषधिगुणादर्श फार अल्प किंवा निश्चत भ्रामक, ~~[illegible]~~ आहे. विपरीतार्थकारी चिकित्सा कशी करावयाची ते पूर्णपणें उजेडांत आणल्यावर आयुर्वेदाच्या हा दोष वाचकांच्या मनांत चांगला ठसेल. विपरीतार्थकारी चिकित्सा करतांना रोग्याच्या सर्व चिन्हांचा आणि औषधींनें ~~[illegible]~~ निरोगी मनुष्यांत उत्पन्न होणाऱ्या सर्व चिन्हांचा विचार करावा लागतो; आणि रोगाची सर्व

(१) वाग्भट चिकित्सास्थान अध्याय १ला श्लोक नं.- ८

ह्यांत सद्योभुक्ताला म्हणजे नुकतेंच जेवलेल्याला ज्वर
आला असून याचे मळचळ असतील व त्याला जर मळमळ, तोंडास पाणी सुटणें
वगैरे चिह्नें ~~असतील तर~~ असतील म्हणजेच उलटीची पूर्वचिह्नें
असतील तर वामक औषध द्यावें असे म्हटले आहे
~~वे~~ हें विपरीत चिकित्सेचे उदाहरण नसून वास्तविक
विपरीतार्थकारी चिकित्सेचेच होय. कारण उलटीची पूर्व-
चिह्नें असलेल्याला उलटीचे औषध सांगितले आहे.
~~चिह्न~~ "विबद्धान् पाचनैस्तैस्तैः पाचयेन्निर्हरेत वा"
ह्या मागील वचनाचेंच हें उदाहरण होय ~~हें~~
~~उघड आहे~~. दोष बाहेर पडण्यास उत्सुक आहेत
पण कमजोरपणामुळें बाहेर पडूं शकत नाहीं. अशा
प्रसंगीं दोष बाहेर काढणें म्हणजे विपरीतार्थकारी
चिकित्साच होय. हें उघड आहे.

चिन्हें औषधीच्या चिन्हांत असतील तरच तें औषध त्या रोग्यावर योजतां येतें. अर्थात्, विपरीतार्थकारी चिकित्सा बरोबर होण्यास औषधानें निरोगी मनुष्यांत कोणती कोणती चिन्हें उत्पन्न होतात तें पूर्णपणें माहीत पाहिजे. परंतु आयुर्वेदांत तर कोणत्याही औषधांची चिन्हें, फार अल्प. ~~प्रमाणांत असल्या~~ त्यानें दिलेली असतात. ह्या आमच्या म्हणण्याची प्रचीती पाहावयाची असल्यास मिठाचीं चिन्हें (अत्युपयोगापासून होणारीं चिन्हें) चरक संहिता, सू. स्था. अध्याय २६ वा येथें दिली आहेत, तीं पहा. व मिठाचीच चिन्हें होमियोपॅथिक ग्रंथांत दिलेलीं असतात तीं पहा, म्हणजे जमीन-अस्मानचा फरक दिसून येईल. आयुर्वेदांतील मिठाचीं चिन्हें १०-१५ ओळींतच संपतात पण होमियोपॅथींतील चिन्हांस त्यांच्या कितीतरी पट जागा लागते. आयुर्वेदांत इतर औषधींचीं चिन्हें मिठाइतक्याही विस्तारानें सांगितलेलीं नसतात. ह्यावरून, आयुर्वेदांतील औषधी-गुणादर्श किती अल्प आहे हें उघड आहे.

See the reverse
मागील पानास पद्य १ ते येथे जोडा.

~~[illegible]~~

पचवा दोष: आयुर्वेदांतील औषधी गुणादर्श शास्त्रीय पद्धतीनें तयार झालेला नाहीं. औषधींच्या ~~शास्त्रीय~~ गुणादर्श तयार करण्याची शास्त्रीय पद्धती म्हणजे प्रत्येक औषधी निरोगी अशा अनेक मनुष्यांस देऊन त्यांच्या ठिकाणीं कोणतीं चिन्हें उत्पन्न होतात तीं सूक्ष्मपणें व पूर्णपणें पाहून लिहून ठेवणें ही होय. ~~ह्याप्रमाणें~~ ~~आयुर्वेदांतील गुणादर्श ह्याप्रमाणें तयार केला आहे असें आयुर्वेदांत कोठें सांगितलें नाहीं. औषधि गुणादर्श ह्याप्रमाणें तयार करावा असेंही कोठें सांगितलें नाहीं. ह्यावरून अनुमान असेंच निघतें कीं, आयुर्वेदांतील औषधीगुणादर्श हा शास्त्रीयपद्धतीनें तयार झालेला नाहीं.~~

जोडून घ्यावे

Same para

याशिवाय औषधींचे धर्म समजण्याची दुसरीही एक रीती आहे. औषध बिमारास दिल्यानें जर त्याची बिमारी हमेशाकरतां व दुसरा कोणताही रोग उत्पन्न न करितां नाहींशी झाली तर त्या औषधानें तो रोग बसतो असें ठरेल. व ह्या रीतीनेंही [illegible] हे धर्म समजून ती निरोगी मनुष्यांत [illegible] पद्धतीने [illegible]

* पुढें चालू :—

*: ह्यावर आक्षेप असा येईल कीं, आयुर्वेदांतील औषधिगुणधर्मांचें वर्णन थोड्यांत असलें तरी तें वास्तविक मोघेंच असतें. कारण, प्रत्येक औषधी संबंधानें ती वात उत्पन्न करणारी किंवा शमविणारी, कफ उत्पन्न करणारी किंवा शमविणारी किंवा पित्त उत्पन्न करणारी किंवा पित्त शमविणारी असें वर्णन आयुर्वेदांत असतें. आणि वात, पित्त कफ एकच रोगचिन्ह नसून अनेक रोगचिन्हांचा त्यांत अंतर्भाव होतो. अर्थात् त्या सर्व चिन्हांचा त्या वर्णनांत अंतर्भाव झाल्यामुळें तें वर्णन वास्तविक मोघेंच आहे असें कबूल करणें भाग आहे. ह्या आक्षेपास उत्तर असें आहे कीं, पुढें दाखविल्याप्रमाणें आयुर्वेदांतील प्रत्येक दोषाचा पुनः पोटविभाग करणें अवश्य आहे. अर्थात् अमकी औषधी कफोत्पादक किंवा पित्तोत्पादक आहे म्हटल्यानें ती त्या दोषाच्या कोणत्या उपदोषांना उत्पन्न करते किंवा बसविते हें निश्चितपणें न समजल्यामुळें तें वर्णन जास्त जरी असलें तरी, अनिश्चित, किंवा भ्रमोत्पादक ~~होते~~ असतें हें निश्चीत आहे. म्हणूनच आम्हीं वर असें म्हटलें आहे कीं, आयुर्वेदांतील औषधिगुणादर्श अल्प किंवा निदान भ्रमोत्पादक तरी आहे.

उत्पन्न ~~[illegible]~~ करते हें ही समजेल. कारण, जीं रोगचिन्हें त्या
औषधीनें बसावीं जीं तीच रोगाचीं चिन्हें ती औषधी उत्पन्न करूं शकते
हें उघड आहे. ह्या पद्धतीनें ह्या अर्थी औषधींचे धर्म
समजूं शकतात त्या अर्थी तिलाही शास्त्रीय पद्धती म्हण-
ण्यास हरकत नसावी. तथापि, या पद्धतीनें औषधींचे गुण-
धर्म ठरवितांना चुका होण्याचा फार संभव असल्यामुळें तिला
शास्त्रीय पद्धती म्हणतां येत नाहीं. व सूक्ष्मदर्शी लोक तिला शा-
स्त्रीय पद्धती म्हणून मानीतही नाहींत. ह्या पद्धतींत चुका
होण्याचें कारण ~~संभव~~ असें आहे कीं, औषधीनें रोग बसवितांना
दुसरा रोग उत्पन्न केला नाहीं किंवा औषधीनें रोग हमेशा-
करितां बसविला, अशी पहिल्यानें खात्री करून घ्यावी
लागते. व ही खात्री करून घेतांना औषधीनें उत्पन्न केले~~ला~~
ला रोग दिसून पडण्याइतका स्पष्ट नसल्यास
~~नवीन रोगाकडे लक्ष न गेल्यास~~ किंवा बसलेला रोग पुनः परत
येतो कीं काय हें दिसण्यास पुरेसा वेळ न दिल्यास किंवा ~~बसलेला~~
~~रोग~~ पुनः परत आलेला रोग ~~ल्यास तो~~ रोगोत्पादक अशा नवीन कारणामुळें आला
किंवा पूर्वीच्या औषधानें अपूर्णपणें बसलेला रोग वाढून प्रगट झाला असें
समजत ~~आले~~ गेल्यास चुकी होण्याचा संभव आहे. अशा
तऱ्हेची स्थिती पहिल्या रीतींत होण्याचा संभव नाहीं. या रीतींत निरोगी
मनुष्य बिमार होईपर्यंत त्याला औषधी देऊन उत्पन्न होणारीं
चिन्हें फक्त पाहावयाचीं असतात. त्या शिवाय दुसऱ्या कोणत्याच
गोष्टीचा निर्णय किंवा विचार करावा लागत नाहीं. म्हणून च
पहिली ~~[illegible]~~ शास्त्रीय पद्धती होय ~~[illegible]~~ व दुसरी ~~पद्धती~~ अशास्त्रीय
पद्धती ~~म्हणावी~~ होय. आयुर्वेदांत दिलेले औषधींचे गुणधर्म वरील
दोन रीतींपैकीं कोणत्या रीतीनें ठरविले हें आयुर्वेदांत ~~स्पष्टपणें~~ कोठेंच
सांगितलेलें नाहीं. म्हणून, ह्या दोन्ही पद्धतींपैकी ते कोणत्या पद्धतीनें ठर-
विले हा संशय येतो. म्हणून शास्त्रीय चिकित्सा करणाराला
आयुर्वेदांतील औषधी गुणादर्शाचा निःशंकपणें उपयोग करतां येत नाहीं.
आता → ~~सारांश~~ आयुर्वेदांतील औषधीगुणादर्श वर सांगितलेल्या दोन
पद्धतींपैकीं कोणत्या पद्धतीनें ठरविला याबद्दल संशय आहे असें
आम्हीं वर म्हटलें; हें परंतु वास्तविक पाहतां एवढाच दोष आयुर्वे-
दांत नाहीं. आयुर्वेदांतील औषधीगुणादर्शांपैकीं बराचसा भाग
[illegible]

⊞ मधुरं श्लेष्मलं प्रायो जीर्णाच्छालियवादृते
मुद्गाद्गोधूमतः क्षौद्रात्सिताया जांगलामिषात् ॥ ३३ ॥
प्रायोऽम्लं पित्तजननं दाडिमामलकादृते ।
अपथ्यं लवणं प्रायश्चक्षुषोऽन्यत्र सैंधवात् ॥ ३४
तिक्तं कटु च भूयिष्ठमवृष्यं वातकोपनम् ।
ऋतेऽमृतापटोलीभ्यां शुंठीकृष्णारसोनतः ॥ ३५ ॥
कषायं प्रायशः शीतं स्तंभनं चाऽभयामृते ॥ ३६
तिक्तः कटुः कषायश्च रूक्षा बहुफलास्तथा ॥३६॥)
वाग्भट सू. अ. १० वा.

संतर्पणकृतान् रोगान् प्रायो हंति हरीतकी |३९
तृष्णायां मुखशोषे च हनुस्तंभे गलग्रहे ।
नवज्वरे तथा क्षीणे गर्भिण्यां न प्रशस्यते ॥४०
धन्वंतरीयनिघंटुः प्रथमवर्गः

ह्यावरून हरीतकी कांहीं रोग बसविते पण तृष्णावगैरे रोग उत्पन्न करते हें उघड आहे.

रसोन देखील पित्तकोपन आहे. कारण,
लशुनो भृशतीक्ष्णोष्णः कटुपाकरसः सरः ॥ १०९
वाग्भ. सू. अ. ६ वा.
तो तीक्ष्ण व उष्ण आहे आणि असे पदार्थ पित्तकोप करतात (वाग्भट सू. अ. १२ श्लो २०,२१ पहा).

"व्याधिबलादधिकमौषधमुपयुक्तं तमुपशम्य व्याधिं व्याधिमन्यमावहति" सुश्रुत सू. स्था. अ. ३९ ॥ ४ ॥

अर्थ = रोगाच्या जोरापेक्षां जास्त जोराचें औषध योजल्यास तें तो रोग बसवून दुसरा उत्पन्न करतें.

✓ दिसून येतात.

✓ चुकाही त्यांत ~~दिसून येतात. आहेत असें म्हणावयास पुष्कळ कारणें आहेत. पिंपळी खोकला बसविणारी आहे असें आयुर्वेद म्हणतो. तिने खोकला बसतो हें खरें पण खोकला बसवितांनाच दाह होतो. लोह अग्निमांद्य सुंठ, मिरे, पिंपळी हे अग्निमांद्य नाहींसें करणारे आहेत असें सांगितलें आहे (चरक अध्याय ६) तथापि अग्निमांद्य नाहींसें करतांना ते दाह उत्पन्न करितात.~~

(मागें पहा)

आरा → II आयुर्वेदांत ~~ब~~ बहुतेक प्रत्येक औषधीबद्दल असें सांगितलें असतें कीं, वात,पित्त,कफ, या त्रिदोषांपैकीं तिने एक किंवा दोन दोष हरतात व बाकीचे उत्पन्न होतात. हीं विधानें आमच्या म्हणण्याचें प्रमाण होय. मागें ज्या अनेक प्रकारच्या चिकित्सा आम्हीं सांगितल्या त्यांपैकीं विपरीतार्थकारी चिकित्सेनें रोग हमेशा करतां बसतो व दुसरा कोणताच रोग उत्पन्न होत नाहीं. औषधी जास्तच देण्यांत आली तर रोग्यांतील मूळचीं रोगचिन्हें ~~[illegible]~~ प्रथम जास्त होतील ~~व नंतरच~~ व नंतरच दुसरीं चिन्हें उत्पन्न होतील. रोग्याचीं मूळचीं चिन्हें बसून दुसरीं चिन्हें उत्पन्न होतील असें व्हावयाचें नाहीं. असें अन्यरोगोत्पत्तिचिकित्सेनेंच होऊं शकते. ह्यावरून, आयुर्वेदांत सांगितलेले औषधींचे रोगहारक धर्म विपरीतार्थकारी पद्धतीचे नसून अन्यरोगोत्पत्तिचिकित्सापद्धतीचे आहेत असें कोणासही ~~कळू~~ कळून पटेल. अर्थात् आयुर्वेदांत औषधींचे गुणधर्म ठरवितांना दुसऱ्या अशास्त्रीय पद्धतीचा उपयोग केला गेला व त्यामुळें चुकाही पुष्कळ झाल्या हें उघड आहे. ~~अंतिम या दोषामुळेंच~~

ध्यानबंधाच्या उतारे आयुर्वेदाच्या पानांच्या मागें पहा

*(मागें पहा) # See this

आरा → I वर सांगितलेल्या तिसऱ्या ~~अ~~ अवस्था व पांचव्या दोषामुळें आयुर्वेदाची चिकित्सा बहुतेक ॲलोपॅथिक चिकित्सेप्रमाणेंच अनिश्चित आणि अन्यरोगोत्पत्तिकारक झालेली आहे. ह्या आमच्या म्हणण्यास आयुर्वेदांतीलच प्रमाणें देता येतात. तीं अशीं:— चरक संहितेंत ज्वरहारक अनेक औषधयोग सांगून नंतर म्हटलें आहे:—

~~[illegible]~~ क्रियाभिराभिः प्रशमं न प्रयाति यदा ज्वरः ।
अक्षीणबलमांसस्य शमयेत्तं विरेचनैः ॥ [illegible] ॥ अध्याय ३

अर्थः— ह्यावर सांगितलेल्या उपायांनीं ज्वराचें शमन न झालें तर, आणि रोग्याचें बल मांस क्षीण झालें नसेल तर, रोग्याचा

※ पुढें चालू

पांचवा दोष असा कीं, आयुर्वेदांत सांगितलेले औषधींचे गुणधर्म औषधिच्या क्रियेच्या वेळीं होतात किंवा त्यानंतर होणाऱ्या प्रतिक्रियेच्या वेळीं होतात हें स्पष्टपणें सांगितलेलें नाहीं; व त्याबद्दल निश्चित असें अनुमानही करतां येत नाहीं. क्रियेच्या वेळीं होतात असें म्हणावें तर त्या अनुमानास विरोधी अशा कांहीं गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, च.सं. सू. स्था. अध्याय २५ श्लोक ३५ यांत ज्येष्ठमध ओकारी बसवितो असें सांगितलें आहे. हा त्याचा धर्म प्रतिक्रियेच्या वेळीं दिसून येतो हें उघड आहे. कारण, तेथीलच तिसाव्या श्लोकांत तो ओकारी उत्पन्न करतो असें सांगितलें आहे. बेल हा अर्शोघ्न आहे असें तेथीलच एकोणविसाव्या श्लोकांत सांगितलें आहे. बेल हा प्रतिक्रियेच्या वेळींच अर्शोघ्न आहे आणि क्रियेच्या वेळीं अर्शोकारक आहे याचा आम्हाला प्रत्यक्ष अनुभव आहे. रक्तमूळव्याधीवर एका बिमारास संबंध बेलफळ दिलें गेलें व त्याची पहिली क्रिया मूळव्याधींतून अतिशय रक्त वाहणें ही झाली. आयुर्वेदांत सांगितलेले गुणधर्म प्रतिक्रियेच्या वेळींच होते असें मानावें तर त्यालाही विरोधक अशा गोष्टी आहेत. कारण, च. सं. सू. स्था. अध्या. २५, श्लो. ३९ येथें हिरडा हा विरेचक आहे असें सांगितलें आहे. परंतु हिरडा हा क्रियेच्या वेळींच विरेचन करतो हा अनुभव प्रसिद्ध आहे. तेथीलच तेराव्या श्लोकांत आलें, ओवा, मिरीं ही क्षुधावर्धक आहेत असें म्हटलें आहे. परंतु हीं क्रियेच्या वेळींच क्षुधा वाढवितात हाही अनुभव प्रसिद्धच आहे. तेथीलच चाळिसाव्या श्लोकांत मूत्र कमी करणारीं औषधें सांगितलीं आहेत व बेचाळिसाव्या श्लोकांत मूत्र वाढविणारीं औषधें सांगितलीं आहेत. हे यांचे धर्म क्रियेच्या वेळीं दिसून येतात किंवा प्रतिक्रियेच्या वेळीं दिसून येतात हें अनुभवाशिवाय नुसत्या ग्रंथावरून समजूं शकत नाहीं. एकंदरीत, आयुर्वेदांतील औषधींचे गुणधर्म मिश्रित व अनिश्चित असल्यामुळें शास्त्रीय चिकित्सेंत त्यांचा उपयोग करतां येत नाहीं.

क्विनाईननें नहिं ताप न बसल्यास सोमल घ्यावा असें जें ॲलोपॅथींत सांगितलें आहे त्या प्रकारचें हें अशास्त्रीय आहे.* See the reverse तसेंच वाग्भटांतील पुढचें वचन पहा :— "दृष्टापचारजः कश्चित्कश्चित्पूर्वापराधजः । तत्संकरात् भवत्यन्यो व्याधिरेवं त्रिधा स्मृतः ॥ ७० ॥

सू. स्था. अध्याय १२

विपक्षशीलनात्पूर्वः कर्मजः कर्मसंक्षयात् ।
गच्छत्युभयजन्मा तु दोषकर्मक्षयात्क्षयम् ॥ ७१ ॥

अर्थ:— कित्येक व्याधी ऐहिक अपराधापासून (ह्या जन्मींच्या आहारविहारादिकांच्या चुकीमुळें) होतात; कांहीं पूर्वजन्मींच्या पातकानें होतात व कांहीं दोन्हींच्या मिश्रणानें होतात. याप्रमाणें ~~व्याधीला~~ व्याधींचे तीन प्रकार आहेत. (७०)

दोषज व्याधि विरुद्ध गोष्टींच्या सेवनानें नाहींसा होतो; कर्मज व्याधि ~~[illegible]~~ कर्माचा नाश झाला म्हणजे नाहींसा होतो; आणि उभयप्रकारचा मिश्रव्याधि, त्या त्या कारणांचा क्षय झाल्यानें नाश पावतो.

या वचनाचा विचार करतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, असाध्यत्वामुळें दुरुस्त न झालेल्या रोगांचें हें वर्गीकरण नसून मागें पुढें केव्हां तरी दुरुस्त झालेल्या रोगांचें हें ~~[illegible]~~ वर्गीकरण आहे. ह्या वर्गीकरणामध्यें दुरुस्त झालेले रोग औषधानें दुरुस्त न होतां कांहीं तरी कर्मसंज्ञक अज्ञात कारणानें दुरुस्त झाले अशी गणति व कबुली आहे. शास्त्रीय चिकित्सापद्धतीमध्यें साध्य रोग औषधानेंच निश्चितपणें दुरुस्त ~~[illegible]~~ होतोच असा निश्चय पाहिजे. तो निश्चय ह्या वचनांत दिसून येत नसल्यामुळें आयुर्वेदचिकित्सापद्धतींत दोष आहे आणि ~~तो~~ तो दोष स्पष्टपणें दिसून ~~के~~ ने पडण्याला कर्मसिद्धांत हें एक साधन आहे. सूक्ष्मदर्शी मनुष्य तर हें चिकित्सेंतील दोषामुळेंच होतें ~~शास्त्राचाच दोष आहे~~ असें म्हणेल. ते दोष कोणते हें मागें आम्ही दाखविलेंच आहे.

तिसरें एक वचन पहा :— वातरोगि ~~[illegible]~~ स्व साध्योऽयं दैवयोगात्कु सिध्यति । ~~प्र~~ अनुमानेन कुर्वन्ति वैद्यकं न प्रतीतये ॥ ८ ॥ योगरत्नाकर वातव्याधिचि

*: अशाच प्रकारचें पुढील वचनही आहे — अशांतौ सर्वथा मन्थे भुवो-
रुपरि दाहयेत् ॥४॥ उत्तरस्थान अध्याय ३८ (वाग्भट)

अर्थ: चांपै की कोणत्याही उपायांनी अधिमंथ बरा न झाल्यास भिंवयांच्या वर के
डाग द्यावा.

अर्थः-

अर्थ - वात रोग हा असाध्य आहे. तो दैव योगानेंच साध्य होतो. ह्याजवर अनुमानानेंच चिकित्सा करितात. प्रतिज्ञेने कोणीही वैद्य उपचार करूं शकत नाहीं.

चिकित्सा शास्त्रांत ~~पण~~ अशा प्रकारचा अनिश्चितपणा असणे इष्ट नाहीं; हें उघड आहे.

आयुर्वेदांत वर सांगितलेले दोष, आयुर्वेदांतील सामान्यत दुर्बोध वचनें कारच मोघम व अस्पष्टार्थक असल्यामुळें, कारच वृद्धिंग झाले आहेत. वाग्भट सू. स्था. अध्याय १३ ह्यांतील आमरोगाचे चिकित्सेसंबंधी असलेल्या वचनांचा अर्थ विपरीत चिकित्सा न करता रोगावर हमेशा विपरीतार्थकारीच चिकित्सा करावी असाच सूक्ष्मदर्शी मनुष्यास दिसतो. पण आज कालच्या वैद्या तो तसा दिसत नाहीं.

"अजीर्ण इव शूलघ्नं सामे तीव्र रुजिज्वरे । न पिबेदौषधं तादृ
भूय एवामभावहेत् ॥१८॥ वाग्भट- चि. स्था. अध्याय १

अर्थः- जसें आमयुक्त अजीर्णांत पोटांत तीव्र वेदना होत असल्या तरी शूलघ्न औषध देऊं नये त्याप्रमाणें आमयुक्त तापांत ज्वरघ्न औषध देऊं नये. कारण तें मागाहून आमाला वाढवितें.

ज्यारा → A

ह्या वचनाचा अर्थ आमज्वरावर कोणतीच चिकित्सा करूं नये असाच ~~अर्थ~~ आजकालचे बहुतेक सर्व वैद्य करतात. टीकाकार मात्र आमज्वरावर ग्रन्थोक्त स्वेदनादि क्रिया करावी म्हणतात परंतु ग्रंथोक्त क्रियांचे रहस्य व्याधीविपरीतार्थकारी अशी कोणतीही चिकित्सा होय हें टीकाकारांनीही स्पष्ट ~~[illegible]~~ सांगित ~~ले~~ ~~आहे~~ नाहीं. असेंच इतर रोगांबद्दलही झालें आहे.

~~विपरीतार्थकारी पद्धतीनें औषध देणें म्हणजे एकप्रकारचे विषच देणें होय. 'योगादपि विषं तीक्ष्णं उत्तमं भेषजं भवेत्' च. सं. सू. स्था. अध्याय १ला श्लोक १२७ ह्या वचनाप्रमाणें विषाचा उपयोग युक्तीनें केल्यास ते उत्तम~~

[illegible]

नानारूपैरसंख्येयैर्विकारैः कुपिता मलाः ॥३०

तापयंति तनुं तस्मात्तद्धेत्वाकृतिसाधनम् ॥

[illegible]

~~औषध होतें. आणि ही युक्ति चक्रपाणिदत्ताच्या टीकेंत 'विषस्य तु तिलं दद्यात' म्हणजे विष तिळभर अथवा फार थोड्या प्रमाणांत द्यावें अशी सांगितली आहे. परंतु ती~~ ~~हल्ली~~ ~~अशा रीतीनें सांगितली आहे कीं, तिचा मागमूसही~~ ~~पुष्कळ~~ ~~वैद्यांना नाहीं.~~

(आक्षेप २) विपरीतार्थकारी पद्धतीनें — प्रथमतः रोगवृद्धि होते व नंतर प्रशमन होतें ही गोष्ट मनावर ठसण्याजोग्या रीतीनें कोठेंच सांगितलेली नसल्यामुळें वैद्य व बिमार दोघेही घाबरून जाऊन योग्य उपचार भलत्याच वेळीं सोडून देण्याची किंवा अधिकाधिक करण्याची पुष्कळ वेळेस भीति असते. 'मर्दनं गुणवर्धनं' ~~हें तत्व~~ ह्या तत्वाचा स्पष्टपणें निर्देश केलेला नाहीं व कधी मर्दनाच्या औषधानें गुण न आल्यास जास्त मर्दनाचें औषध दिलें पाहिजे हें ~~[illegible]~~ पुष्कळ वैद्यांच्या मनावर ठसलेलें नसल्यामुळें ही बराच घोटाळा होण्याचा संभव आहे. एकंदरीत, आयुर्वेदांतील सामान्य चिकित्सा ~~त्वाचा~~ तत्वाचा निर्णय जरी ~~[illegible]~~ ~~बहुतेक~~ बुद्धिक सत्य आहे तरी तो व त्याचे उपसिद्धान्त मनावर ठसतील इतक्या स्पष्टपणें सांगितलेले नाहींत हा ~~आयुर्वे~~ आयुर्वेदांत विचार करण्यासारखा दोष आहे.

शास्त्रात सांगितले नसल्यामुळे

होते तिनेंच रोग बसतात असा एक आक्षेप येईल. तो बरोबर नांहीं. कारण कोणताही रोग कोणत्याही सूक्ष्मीकृत द्रव्यानें बसतो असें ~~नांहीं तर~~ नसून सूक्ष्मीकृत अशा विशिष्ट द्रव्यानेंच बसतो. जसें दाह हा सूक्ष्मीकृत लोहानेंच बसतो. प्रतिश्याय (catarrh) हा सूक्ष्मीकृत मीठानेंच बसतो. ~~rickets~~ हाडें वाकडे होण्याचा रोग सूक्ष्मीकृत क्यालशियम फास्फेटनेंच बसतो.

दुसरा आक्षेप मानसोपचार वाद्यांचा. तो असा "ज्या अर्थी सर्व पद्धती रोगनिवारणाच्या कामीं जवळ जवळ सारख्याच उपयोगी आहेत त्या अर्थी या सर्व पद्धतींत अहेतुकरीत्या एकाच व्यापक नियमाचा उपयोग होत असावा असें अनुमान निघतें व तें तर्कशास्त्र दृष्ट्या युक्त नांहीं काय? याच अनुमानापासून आरंभ करून मानसोपचार वैद्यांनीं अनेक प्रयोग करून सर्व प्रचालितपद्धतींचें निरीक्षण केलें व शेवटीं असा सिद्धांत काढला कीं रोगनिवारणाच्या कामीं उपयोगी पडणारी अशी एकच शक्ति जगांत आहे आणि ती शक्ति म्हणजे शरीरास अधिकारविशिष्ट प्रेरणा करून त्यास वाटेल त्या प्रकारच्या कार्याला प्रवृत्त करण्याची रोग्याच्याच मनाची नैसर्गिक शक्ति होय. या शक्तिला जागृत करून तिचें सहाय्य घेतल्या खेरीज रोगपरिहार करण्याचें ~~[illegible]~~ सामर्थ्य जगांतील कोणत्याही औषधिद्रव्यांत किंवा वैद्यकी करणाऱ्या व्यक्तींत नांहीं. ज्या ज्या ठिकाणीं रोगाचें परिमार्जन होतें त्या त्या ठिकाणीं ह्याच शक्तीचा उपयोग झालेला असतो. आणि या शक्तिला प्रवृत्त करण्याचें मार्ग असंख्य असल्यामुळेंच असंख्य उपचारपद्धती आज सुखानें नांदू शकल्या आहेत" (गणपुले ह्यांचे मानसोपचार [illegible])

~~[illegible]~~ १७८

कोणत्याही पद्धतीनें चिकित्सा करणाऱ्या वैद्याला व त्याच्या बिमाराला ही मन हें असतेंच. त्यामुळें हा ~~सिद्धांतावरून कोणत्याच चिकित्सापद्धतीची सुटका होऊं शकणार नांहीं असें~~ सिद्धांत ~~[illegible]~~ सर्वच इतर चिकित्सा-पद्धतींचा समूळ घात करतो. म्हणून त्याचा येथेंच विचार करणें जरूर आहे.

मनाच्या शक्तीनेंच (म्हणजे इच्छेनेंच) रोग दुरुस्त होतात असें जर आहे तर एकच रोगी एकाच्च वैद्याचें एक औषध घेत असतांनां दुरुस्त होत नांहीं पण दुसरें औषध घेत असतांनां दुरुस्त होतो हें कसें? अशा प्रकारचे अनुभव नेहमीं येतात, ह्या अशा अनुभवात व्यतिरेकानें ~~[illegible] सहाय्यासिवाय ही~~ रोग केवळ औषधीनेंच बसला असें ठरतें. फार ~~[illegible]~~ झाल्यास मनाची शक्ति व औषधी यांच्या संयोगानें रोग बसला असे ठरेल. परंतु हें दुसरें अनुमान टिकत नांहीं. कारण (मागें पहा) वैद्य व रोगी ह्या दोघांचाही औषधावर विश्वास नसतांनां देखील औषध रोग दुरुस्त करतें

omit! किंवा अकस्मात् रोग दुरुस्त व्हावा अशा हेतु-शिवाय घेतलेल्या पदार्थांनीं ही रोग दुरुस्त होतात असे अनुभव येतात. ~~एका बिमाराच्या स्वतःच येणें. म्हणून केवळ औषधीनें मनाच्या सहाय्या शिवाय रोग बसणार~~. ह्या शिवाय आकस्मिकपणें देण्यांत आलेल्या पदार्थांनीं रोग उत्पन्न होतात. अर्थात ~~पदार्थांमध्ये रोगोत्पादक शक्ति आहे अर्थात [illegible] त्यांच्यामध्ये रोगनाशक शक्ति ही आहे असें म्हणणे आणि प्रतीति~~ तेच पदार्थ तेच रोग प्रतीति येच्या वेळीं बसवितात हें निःसंशय सिद्ध होतें. ~~म्हणून~~ एकंदरीत मनाच्या सहाय्या शिवाय ही केवळ पदार्थांनींच रोग बसतात आणि केवळ

मनाच्या शक्तिनेंही रोग बसतात असें जर आहे तर मग मनाच्या शक्तिनें शरीरांतीलच शारीर घटक द्रव्यांचें सूक्ष्मीकरण होऊन त्यानें रोग बसतात असें मानून खरोखर रोगहारक शक्ति सूक्ष्मीकृत शारीरघटकांतच आहे असाच सिद्धांत ठरविणें योग्य आहे. आतां मनाच्या शक्तीनें शरीरांतील घटक द्रव्य जास्त सूक्ष्म कसें होतें अशी शंका कोणास आल्यास ~~[illegible]~~ तिचें समाधान करणें कठीण नाहीं. मनाच्या शक्तिनें शरीरांत गती उत्पन्न होते आणि गतीमुळें शारीरद्रव्यास सूक्ष्मत्व येतें इतकेंच येथें सुचवितो. ह्याचा पूर्ण विचार पुढें मानसोपचार निरीक्षणांत करूं.

पुढील चिकित्सापद्धती संबंधानें ही प्रस्तावना करून त्यापैकीं जीवाणूंच्या पोषणानें रोग बसतात असेंच आम्हां ~~[illegible]~~ प्रमाणें माननारी ~~प्रधान~~ जी Hydropathy तिचें निरीक्षण करूं. Hydropathy चे ~~[illegible]~~ जुना व नवा असे दोन पंथ आहेत. त्यामधील फरक पुढील उताऱ्यावरून दिसेल:

The Natural Method Commands a wealth of forms in which water may be applied: packs, enemas, douches, shower baths, half-baths, whole-baths, sitz-baths and steam-baths of Various descriptions. These many remedies, however, prove in part superfluous and Confusing when once insight into the true nature of disease has been gained. The new art of healing simplifies the application of water as much as possible.

Whilst on the ordinary Nature Cure System the diet, at all events very often, has been wholly unregulated; arbitarily accomonodated to the traditionary mixed diet, the New Science of Healing prescribes a non-stimulant system of dietetics based on natural laws and accurately and clearly defined.

As you see, ~~the~~, the deviations from the usual methods of the Nature Cure System — which, I repeat it again, has nevertheless, worked wonders — are so great, that I feel quite justified in giving my theory and practice a new name that of the New Science of Healing without Drugs and without Operations. (The New Science of Healing By Louis Kuhne Page 849

अर्थ:— नैसर्गिक चिकित्सापध्दतीमध्यें पाण्याचेच बहुप्रकारानें प्रयोग करतां येतो:— आर्द्रवस्त्रबंधन, बस्ति, पाण्याचीधार, जलबिंदुस्नान, अर्धस्नान, पूर्णस्नान, उपविश्यस्नान, बाष्पस्नान हे सर्व प्रयोग निरनिराळ्या प्रकारानें या पद्धतींत योजल्या जातात. परंतु हे सर्व उपाय रोग्यांच्या स्वरूपाचें रहस्य समजल्यानंतर अनवश्यक आणि श्रमोत्पादक होतात. नवीन निसर्ग-चिकित्सेंत हे पाण्याचे प्रयोग शक्य तितके सोपे केले आहेत. जुन्या निसर्गचिकित्सेंत रोग्यांच्या अन्नाबद्दल्या कांहींच नियम नाहीं. अथवा पूर्वपरंपरागत मिश्र ~~अन्नामध्यें~~ आहाराशीं कशी तरी अन्नाची जुळणी करतात. परंतु नवीन शास्त्रांत स्वाभाविक नियमानुसार अनुत्तेजक आहार घ्यावा असा नियम केला असून त्याचें स्वरूप स्पष्टपणें आणि बारकाईनें ठरविलें आहे. ~~जुन्या~~

जुन्या शास्त्रांत हे जे दोन फरक केले आहेत (हा मी ~~केलेल्या~~ पुनः सांगतो कीं, या पद्धतीनें चमत्कारिक

माझ्या या नवीन पद्धतीला नवीन नांव देणें मला अगदीं वाजवी वाटते. आणि तें नांव औषधी शिवाय ~~खेरीज~~ आणि शस्त्रक्रियेशिवाय रोग दुरुस्त करण्याचें नवीन शास्त्र हें होय.

ह्यावरून दिसतें कीं, नवें व जुनें निसर्गचिकित्साशास्त्रज्ञ ह्याकरितां पाण्यानेंच निरनिराळ्या प्रकारानें चिकित्सा करतात. ह्या चिकित्सापद्धतीचें म्हणजे जिला कोणी जल-चिकित्सा (Hydropathy) असें म्हणतात तिचें रहस्य पुढील उताऱ्यांत स्पष्ट करून दाखविलें आहे.

~~ह्या दोन्ही पद्धतींच्या तत्वांची उत्तम माहिती अगदीं थोडक्यांत~~ (Encyclop. Brit. Vol. XII page 542, 43 ~~मध्यें दिली आहे~~. तेथील महत्वाचे उतारे: ~~पुढें देतों~~.

Hydropathy is the treatment of disease by water, used outwardly and inwardly. Like many descriptive names, the word "hydropathy" is defective and even misleading, the active agents in the treatment being heat and cold, of which water is little more than the vehicle, and not the only one: Thermo-therapeutics (or thermo-therapy) is a term less open to objection. The name "hydropathy," however, as being itself an advance on an earlier and less happy designation "the water cure" as having obtained general currency, is here employed.

अर्थः— जलचिकित्सा म्हणजे पाण्याचा आंतून किंवा बाहेरून उपयोग करणें. इतर पुष्कळ वर्णनात्मक

नांवप्रमाणें ~~सहेतुक~~ हें नांव ही अन्वर्थबोधक व भ्रमोत्पादकही आहे. कारण ह्या चिकित्सेंत प्रत्यक्ष कार्य करणारे थंडी आणि उष्णता हे होत आणि पाणी हें केवळ शरीरास थंडी किंवा उष्णता पोहचविण्याच्या अनेक साधनांपैकीं एक होय. ह्या चिकित्सापद्धतीचें शीतोष्णचिकित्सा हें नांव ठेवल्यास तें जास्त निर्दोष होईल.

———X———

हैड्रोपथीक चिकित्सा परीक्षण
(पान १५१ ते १६०)

Hydropathy

The theoretical basis of hydropathy is wide and fundamental enough to include within its~~elf~~ scope all disease. Each individual cell of the mass constituting in various forms and combinations the human body being in ~~its~~ its growth and function~~s~~

मूलग्राही

dependant ~~on~~ ~~the~~ regulated by the nervous and Vascular systems, themselves cellular, and every derangment of these cells originating in or being attended with a derangement of their nervous and Vascular supply, and that supply being powerfully and in quite diverse ways influenced by heat and Cold,—all morbid Conditions of economy may be influenced materially by the regulated employment of heat and Cold, which are entitled therefore to rank as powerful factors in therapeutics.

अर्थः — जलचिकित्सेचें तत्व इतकें व्यापक आणि मूलग्राहि आहे कीं, त्याच्या सहाय्यानें सर्वच रोग बसविता ~~येत~~ येतात. हें मानवी शरीर निरनिराळ्या आकाराच्या जीवाणूंनीं आणि त्यांच्या संयोगानें बनलेलें आहे. ~~हे~~ हे जीवाणूं देखील आपल्या वाढीसाठीं आणि काम करण्याचें सामर्थ्य येण्यासाठीं तंतुमण्डलावर आणि रक्ताभिसरणेंद्रियावर अवलंबून असतात. (तंतुमण्डल आणि रक्ताभिसरणेंद्रियें हींहि स्वतः जीवाणूंचीच बनलेलीं आहेत.) अर्थात जीवाणूंत झालेली विकृति ही तंतुमंडळाच्या आणि रक्ताच्या ~~विकृतीमुळेंच~~ पुरवठ्याच्या विकृतीमुळें उत्पन्न होते. आणि हा पुरवठा थंडी आणि उष्णता ह्यांनीं भिन्न भिन्न रीतीनें आणि पाहिजे तितक्या प्रमाणांत (जोरानें) कमीजास्त करता येतो. आणि म्हणून शरीरांतील सर्व रोग थंडी आणि उष्णता यांच्या प्रयोगानें ~~रोग~~ बसविता येतात. अर्थात चिकित्साशास्त्रामध्यें

थंडी आणि उष्णता हे जोरदार उपाय मानल्यांत आले पाहिजेत.

The agents of hydropathy are at once simple and complex – simple in their elements, and complex in their combinations and modifications. They afford the physician a series of effects almost infinite in variety, both in kind and in degree, both immediate and remote. According as heat and cold are used in their extreme or their intermediate degrees, singly or in combination, successively or alternately, momentarily or continuously, dry or moist, and according as the primary action is utilized or the secondary, do their effects differ. (P.544)

अर्थ:— जलचिकित्सेचे उपाय साधे तसेंच ~~क्लिष्ट~~ संकीर्णही आहेत. ते स्वतः साधेच आहेत परंतु हे साधे उपायच त्यांत निरनिराळे फेरबदल केल्यानें व त्यांचे निरनिराळे संयोग केल्यानें ~~हे~~ संकीर्ण होतात. या अनेकविध उपायांनीं वैद्य शरीरावर अनेकविध परिणाम करूं शकतो; हे परिणाम निरनिराळ्या प्रकारचे निरनिराळ्या जोराचे, तात्कालिन किंवा दूरचे असतात. हे असे भिन्न भिन्न आणि असंख्य प्रकारचे ~~प्रकार~~ परिणाम होण्याचीं कारणें:- उष्णता किंवा थंडीचा मध्यम मानानें पाकीने ओलीने किंवा तीक्ष्ण मानानें ~~उपयोग केल्यानें~~ एकेकाचा किंवा संयोगाने ओलीपणाने किंवा वारंवार एकट्याचा उपयोग केल्यास ~~थंड~~ क्षणभर किंवा एकसारखा करीत

शुष्क किंवा आर्द्र पद्धतीनें अथवा उपायाच्या क्रियेचा किंवा प्रतिक्रियेचा उपयोग करून ~~घेतल्यानें भिन्न भिन्न होतात.~~ घेण्याच्या हेतूनें करणें हीं होत.

ह्या शेवटल्या उताऱ्यापुढें प्रतिक्रियेचे नियम सांगितलेले आहेत तो भाग आम्हीं ह्या निबंधांत प्रतिक्रियेचे नियम सिद्ध करतांना दिलेलाच आहे. ह्या तिन्ही उताऱ्यावरून जलचिकित्सेचें तत्व ठरतें तें हेंच कीं, थंडीचा किंवा ऊष्णतेचा शरीरावर प्रयोग करून त्याच्या क्रियेनें अथवा त्या क्रियेनंतर होणाऱ्या प्रतिक्रियेनें रोग दुरुस्त करावा. क्रियेनें रोग दुरुस्त करावयाचा असल्यास प्रतिक्रिया टाळतां येईल इतक्या जोरानें क्रिया केली पाहिजे. आणि प्रतिक्रियेनें रोग दुरुस्त करावयाचा असल्यास क्रिया क्षणिक व मंद प्रकारची केली पाहिजे हें उघड आहे. ह्या दोन रीतींपैकीं पहिली रीति खरोखर रोगहारक नसून अन्यरोगोत्पादकच आहे हें ज्यांनीं आम्हीं ग्रन्थाच्या आरंभीच केलेला चिकित्सातत्वविचार वाचला असेल त्याला अगदीं स्पष्ट दिसून येईल. ह्या संबंधानें माझ्या पहाण्यांत आलेलें एक उदाहरण दिल्यास वावगें होणार नाहीं. एक बाई मोटरगाडींत बसली असतां त्या मोटरला कांहीं अपघात होऊन तिच्या डोक्याला फार जबर धक्का बसला व ती मूर्छित होऊन पडली. ती एक दिवस मूर्छितावस्थेंतच होती. बाहेरून कांहीं जखम झाली नव्हती परंतु तोंडांतून व नाकांतून रक्त पडत होतें आणि डोक्यांचा दाह होऊन ~~तें~~ फार सुजून गेलें. ह्यावर ॲलोपथीक डॉक्टरांनीं संबंध पाहिमीर बर्फ ठेऊन चिकित्सा केली. ह्या चिकित्सेचा परिणाम असा झाला कीं, डोक्याचा दाह व सूज, तोंडांतून ~~व~~ व नाकांतून रक्त पडणें हीं चिन्हें बंद झालीं

९५५

परंतु ~~जिभेला रुचि न समजणें~~ अरुचि (tastelessness) खातांना ऐकूं न येणें, ~~त्या~~
~~डोक्याला दुखापत झाली होती~~ नव्हती ~~या आहीं स्पष्टपणें न दिसणें~~
~~घेरी आली वाटणें~~
A मळकी असणें व त्या मळकीमुळें भूक लागली असूनही पोटांत
अन्न न जाणें हीं ~~नवीन~~ * चिन्हें विभागास आघात झाल्यावर उत्पन्न झालेलीं. ~~(मूल रोगाची)~~ ह्यां ~~रोगकुलव्यक्त~~ त्रासदायक चि-
न्हांकरितां ती बाई माझ्याकडे आली. तेव्हां अपघातामुळें झाले-
लीं चिन्हें माझ्या औषधानें पुनः उत्पन्न होतील व तीं
उत्पन्न झाल्यावर त्या चिन्हांवरही औषधी द्यावी लागेल
असें सांगून, मी त्रासदायक ~~नवीन~~ चिन्हांवर जें औषध होतें तें तिला
दिलें. ~~सर्व नवीन चिन्हें निरोपत.~~ १०/१२ दिवसांत मळकी पूर्णपणें
व इतर ~~नवीन~~ चिन्हें अंशतः कमी झालीं ~~असतां~~ व
तोंडांतून रक्त पडणें, डोक्याची सूज, डोकें दुखणें, हीं
आघातापासून झालेलीं चिन्हें पुनः प्रकट झालीं. त्यावरही
योग्य औषध दिल्यानें तींही बसलीं. ह्यावरून दिसेल कीं,
क्विनीच्या उपायांनी मूळ रोग दुरुस्त झाला नव्हता.
क्विनीनें मळकी वगैरे ~~नवीन~~ रोगचिन्हें उत्पन्न केल्यामुळें
किंवा वाढविल्यामुळें आघातापासून झालेलीं रोगचिन्हें फक्त अव्यक्तस्थितीला
प्राप्त झालीं आणि म्हणूनच योग्य औषधींनीं ~~नवीन~~
रोगचिन्हें नाहींशीं करतांच आघातापासून झालेलीं चिन्हें
पूर्ववत् प्रकट झाली.] ~~ह्यावरून~~ (मागे पहा)

* ह्या चिन्हांना त्रासदायक चिन्हें म्हटलें आहे व आणि पुढें ⁑ भागीत चिन्हांना अपघात चिन्हें म्हटलें आहे

९ वा
फार्म संपूर्ण.

~~फार्म~~ १० वा
सुरु केलें.
१५५ पासून

~~ह्यावरून~~ एकंदरीत असें स्पष्ट आहे कीं, जलचिकित्से~~नाही~~चाही
उपयोग करतांना प्रयोगाच्या क्रियेनें रोग दुरुस्त करे-
ण्याचा प्रयत्न करणें हें चूक आहे. अर्थात् प्रयोगाच्या
प्रतिक्रियेनें म्हणजेच समचिकित्सातत्वाप्रमाणें जलाचा
प्रयोग करून रोग दुरुस्त करणें हेंच शास्त्रीय ठरतें.
आणि ही गोष्ट ~~मुळीच~~ स्पष्टपणेंतरी जलचिकित्सा ~~[illegible]~~ शास्त्रांत सांगितली नाहीं
हा या चिकित्सापद्धतीचा मोठा दोष आहे.

एका रोग्याला मलबद्धता होती. ~~[illegible]~~ तीवर त्यानें पात्रस्नाना-(Tub-bath)-चा प्रयोग केला. त्यानें मलबद्धता गेली पण फुफ्फुसावरणप्रतिश्याय (Wet Pleurisy) झाली. असें त्याला दोनदां झालें. मीच त्याला त्यांतून दोनहीवेळीं वाचविलें. दुसऱ्या एका बिमारास खरूज व इसब होता. त्यावर त्यानें बाष्पस्नानाचा (Steam-bath)-चा प्रयोग केला. त्यानें खरूज व इसब गेली पण मूत्रसादरोग (Acute Bright's disease) हा मूत्रपिंडाचा मारक रोग उत्पन्न झाला. मीच त्याला त्या रोगातून वाचाविलें तेव्हां ~~झाला~~ पुनः खरूज व इसब ~~उत्पन्न~~ प्रकट झाला. योग्य चिकित्सा करून ते रोग ही दुसराकोणताच रोग उत्पन्न न करतां मी दुरुस्त केले.

वर जें आम्हीं सांगितलें आहे त्याच्याच पुष्टीकरणार्थ पुढील उतारा जलचिकित्सेच्या ग्रन्थांतूनच आम्ही देतोंः

जलोपचारांत ध्यावयाची सावधगिरी:— "जलोपचार करतांना पुढील गोष्टी मुख्यत्वेंकरून विसरतां कामा नये."

(१) व्यक्तिविषयक विचार:— गार पाण्यापासून अनाहित न होऊं देतां हितच साधावयाचें असेल, तर रोग्याची शरीरप्रकृति, त्याचें वयोमान, त्याची जाति (स्त्रीपुरुषभेद) व विशेषेंकरून रोग्याची व्यक्तिविषयक प्रतिक्रियाशक्ति यांचा जरूर विचार झाला पाहिजे.

(२) "सौम्य उपचार बहुतेक वेळां अत्युत्तम गुणदायी होत असतो, ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेविली पाहिजे. पाण्याच्या उष्णतेंतील मोठे फरक शरीराच्या ज्ञानतंतूंना व रक्तवाहिन्यांना जागे करून उत्तेजित करतात, परंतु पाण्याच्या उष्णतेंतील फरक थोडा ठेविल्यास त्याच ज्ञानतंतूंना व त्याच रक्तवाहिन्यांना आराम वाटून ते ज्ञानतंतू व त्या रक्तवाहिन्या मजबूत बनत असतात. उपचार पुष्कळ वेळ करीत राहिल्यास, त्यांत पाण्याच्या उष्णतेचा फाजील फरक राहिल्यास अगर ते उपचार फाजील वारंवार झाल्यास कांहींच हित न होतां, उलट फार अनाहित होईल.

(३) "सर्व नैसर्गिक उपचाराप्रमाणें उदकोपचार सुरू केल्यानंतर, विकार थोडा जोराचा वाढल्यासारखा वाटल्यास तो बरा होण्याची क्रिया सुरू झाली आहे; व रोग शरीराबाहेर घालविण्याची चेतना शक्ति हळूं हळूं वाढत चालली आहे असें समजावें.

एडॉल्फ.
("डॉ. पाणी" पृष्ठ ७६-७७)
(गोपाळ रामचंद्र दाते यांचा)

~~[illegible]~~

१५८

ह्या उताऱ्यांतील तिसऱ्या सावधागिरीवरून जलचिकित्सेचे प्रयोग समचिकित्सातत्वाला धरूनच केले पाहिजेत असें ठरतें. आणि पहिल्या दोन सावधागिऱ्यांवरून असें ठरतें कीं जलचिकित्सेचा प्रयोग विपरीतचिकित्सापद्धतीनें करावयाचा असल्यास, जास्त थोडी प्रतिक्रियेच्या पहिल्या नियमाप्रमाणे प्रतिक्रिया ~~[illegible]~~ ~~[illegible]~~ होईल इतका सौम्य असावा. परंतु हा सौम्य प्रयोग रोग हरण करूं शकणार नाहीं. फक्त त्या रोगापासून उत्पन्न होणारे दुसरे मारक रोग टाळील हें उघड आहे. हीं तत्वें जलचिकित्साशास्त्रांत स्पष्टपणें सांगितलेलीं नाहींत. ~~पान १६० नंतर~~

जलचिकित्सा ही समचिकित्सातत्वानुसारच करावयाची असें तत्व या शास्त्रांत स्वीकारलें तरी देखील हें शास्त्र अपुरेंच आहे. समचिकित्सातत्वाप्रमाणें नेटकी आणि शास्त्रशुद्ध चिकित्सा करण्याला निरोगी मनुष्याच्या शरीराच्या निरनिराळ्या भागावर थंडीचा किंवा उष्णतेचा प्रयोग करून त्या ~~क्रियेचे~~ प्रयोगाच्या क्रियेच्या वेळीं कोणतीं कोणतीं चिन्हें उत्पन्न होतात हें पूर्णपणें आणि सूक्ष्मपणें पाहिलेलें असलें पाहिजे. असें ह्या शास्त्रांत अजून केलेलें नसल्यामुळें कोणत्याही शास्त्रीय मनुष्यानें ही चिकित्सा करण्यास धजूं नये. शिवाय ह्याप्रमाणें करून सर्व प्रकारच्या उष्ण व शीत प्रयोगांची सिद्धचिन्हें ठरविलीं जातील तेव्हां मानवी शरीरास होणाऱ्या सर्वच रोगांचा व रोगचिन्हांचा त्यांत अंतर्भाव होतो किंवा नाहीं हें पहावें लागेल. होत नसल्यास हें शास्त्र तेव्हांही अपुरें ठरेल.

सूक्ष्मीकृत शारीरघटक द्रव्यानें रोग दुरुस्त होतात असें जें आम्हीं मागें ठरविलें आहे त्याच्या दृष्टीनेंही जलचिकित्सेचा विचार करतां येतो. रक्ताभिसरणेंद्रियें व ~~[illegible]~~ तंतुमण्डल यांच्या क्रिया जलचिकित्सेनें उत्तेजित करून ~~नी~~ रोगग्रस्त जीवाणूंचें पोषण करणें हें जलचिकित्सेचें तत्व होय असें Encyclopaedia? मधून घेतलेल्या दुसऱ्या उताऱ्यांत म्हटलेंच आहे. ~~[illegible]~~ तंतुमण्डलाला व रक्ताभिसरणेंद्रियाला उत्तेजित केल्यानें शारीरघटक द्रव्याचें सूक्ष्मीकरण होतें हें आम्हीं पुढें दाखविणारच आहोंत. अर्थात् जलचिकित्सेनें जेव्हां रोग दुरुस्त होतो तेव्हां तो वास्तविक सूक्ष्मीकृत शारीरिक द्रव्यांनींच होतो हें उघड आहे.

आतां हें शारीरिक घटकांच्या सूक्ष्मीकरणाचें कार्य ∴ क्षीणशक्ति अशा रक्ताभिसरणेंद्रियाकडून व ~~[illegible]~~ तंतुमण्डलाकडून करवितांना त्यांना उत्तेजित केल्यास त्या उत्तेजनानंतर प्रतिक्रियेनें त्यांना मांद्य उत्पन्न होईल व त्या मांद्यामुळें जीवाणूंच्या पोषणास अडथळा येऊन रोग पुनः परत येईल हें उघड आहे. ~~उ~~ परंतु रक्ताभिसरणेंद्रियें व ~~[illegible]~~ तंतुमंडल यांना मांद्य ~~आणून~~ येईल अशी चिकित्सा केल्यास रोग तत्काळ जास्त झालेला दिसेल, ~~परंतु~~ तथापि प्रतिक्रियेनें रक्ताभिसरणेंद्रियें व ~~[illegible]~~ तंतुमंडळ उत्तेजित होऊन रोग नाहींसा होईल हेंही उघड आहे. एकंदरीत या दृष्टीनें विचार केला तरी असेंच ठरतें कीं, जलचिकित्सा करतांना ती समचिकित्सा तत्वानुसारच केली पाहिजे.

आतां जीवाणूंना लागणारें पोषण रक्तांतूनच घेववून रोग दुरुस्त करावयांच्या या पद्धतीच्या चिकित्सेमध्यें सिद्धि येण्याला ~~स्वतंत्र~~ शारीरिघटकद्रव्य रक्तांत असलें पाहिजे व असावें तितक्या प्रमाणांत असलें पाहिजे. अशी परिस्थिति नस-
~~त्यास~~

∴ जीवाणूतील विकृति-यांच्या दुर्बलत्वामुळेंच रोग होतो असें मागील उताऱ्यांत म्हटलेंच आहे

∴ (जीवाणूतील विकृति यांच्या दुर्बलत्वामुळेंच रोग होतो असें मागील उताऱ्यांत म्हटलेंच आहे

-ण्यास या चिकित्सापद्धतीनें रोग दुरुस्त होणार नाहीं, हें उघड आहे. ~~आणि हि गोष्ट या शास्त्रांत मान्यही केली आहे.~~

~~अशा प्रसंगीं सूक्ष्मीकृत शरीरघटक द्रव्य बाहेरून घातल्यास रोग दुरुस्त होण्याचा संभव आहे. संभव आहे असें म्हणण्याचें कारण असें कीं, ज्याच्या रक्तांतील शरीरघटक नाहींसे किंवा कमी होऊन ज्याचें रक्त इतकें विकृत किंवा बिघडलेलें आहे~~ ~~की~~ ~~मनु~~ ~~त्या मनुष्याचा रोग जलचिकित्सेनें असाध्य तर आहेच परंतु इतर चिकित्सा पद्धतींनींही असाध्यच असेल असा संशय~~ ~~असेल~~~~. येतो.~~

अशा प्रसंगीं जें काम ~~[illegible] करण्यास~~ शरीर स्वतः करूं शकत नाहीं तें काम (त्याच्या कडून करविण्याच्या भरीस न पडतां दुसऱ्या कडून, शरीराच्या फायद्याकरितां करविल्यास म्हणजेच आयतें सूक्ष्म केलेलें असें शरीरास अवश्य तें द्रव्य बाहेरून पुरविल्यास रोग दुरुस्त होण्याचा फार संभव आहे. अर्थात् जेथें जलचिकित्सेनें कार्य होत नाहीं तेथें निराश न होतां होमिओपॅथी~~नें~~क किंवा बायोपॅथी~~नें~~क औषधांनीं प्रयत्न करून पाहिला पाहिजे असें सिद्ध होतें. डॉ. कुन्हे म्हणतात:— No one should, however, suppose, ~~suppose~~ that these remedies ~~(adapted to the circumstances of each individual case)~~ will infalliably cure every patient. As I have already remarked, I can cure all diseases, but not all patients.

~~for~~ अर्थः— परंतु कोणी असें समजूं नये कीं, वर सांगितलेल्या उपायांनीं प्रत्येक रोगी निःसंशयपणें ~~बरा होईल~~ झाला पाहिजे. कारण पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, या उपायांनीं सर्व रोग ~~[illegible]~~ बरे करतां येतात परंतु सर्व रोगी बरे करतां येतात असें म्हणवत नाहीं.

यावरून दिसेल कीं, जलचिकित्सेनेंही कांहीं रोग्यांना फायदा होत नाहीं आणि याचें कारण रोग्याचें अत्यंत क्षीणत्व असें जरी

ह्या शास्त्रांत म्हटलें असलें तरी त्या क्षीण शरीरास बाहेरून मदत मिळाल्यास तें दुरुस्त व्हावें असेंच कोणत्याहि समंजस मनुष्यास वाटेल. आणि आम्हीं वर दाखविल्याप्रमाणें सूक्ष्मीकृत शारीरिक द्रव्यानें शरीरास बाहेरून मदत करतां येतेंच. ह्या दृष्टीनें पाहिल्यास जलचिकित्सा ही होमिओपॅथी किंवा बायोपॅथीपेक्षां कमी दर्जाची व अपुरी ठरते.

हें जें आम्हीं जलचिकित्सेसंबंधीं लिहिलें आहे तें पुढें येणाऱ्या इतर चिकित्सा पध्दतींनाही लागूं पडतें हें उघड आहे म्हणून त्या त्या पध्दतींच्या निरीक्षणांत पुनः पुनः सांगण्याची जरूरी नाहीं.

येथपर्यंत जलचिकित्सेचें अगदीं शास्त्रीयदृष्ट्या ~~वि~~परीक्षण केलें. आतां बिमारांच्या व परिचारकांच्या सोईच्या दृष्टीनेंही विचार केल्यास तें वावगें होणार नाहीं. जलचिकित्सेचे प्रयोग करतांना रोग्याला व परिचारकांना पुष्कळ तकलीफ पडते, ~~व~~ कंटाळा ~~येतो~~ वाटतो, व उपकरणें पुष्कळ लागतात. ~~वारंवार - सुकी सेक्याची फार भीति असते व सुकी झाल्यास परिणाम भयंकर होतात. प्रयोग चालू असतांना हवा लागूं नये अशी खबरदारी घ्यावी लागते.~~ ह्या मानानें होमिओपथीची किंवा बायोपथीची एखादी दुसरी मात्रा घेऊन स्वस्थ निजून राहणें किंवा आपले मामुली व्यवहार सुरक्षितपणें करणें बिमाराला कितितरी जास्त सोईचें असलें पाहिजे! बायोपथी किंवा होमिओपॅथीसारख्या अत्यंत सुखकर अशा चिकित्सापध्दति रोग्यांना दुरुस्त करण्याला तयार असतांना अत्यंत कष्टदायक अशा ~~व~~ जलचिकित्सेचा आश्रय करणारे रोगी व त्यांचे हितचिंतक हतभागीच समजले पाहिजेत.

Chromopathy पान ~~१६९~~ - १८७

वर्ण~~मल~~ ~~किरण~~ चिकित्सा निरीक्षण.

जलचिकित्सा ज्याप्रमाणें ऊष्णता व थंडी ह्यावर अवलंबून आहे त्याप्रमाणें वर्णचिकित्साही थंडी आणि ऊष्णता ह्यांनींच आपलें कार्य करिते म्हणून आतां वर्णचिकित्सेचाच विचार करूं. ह्या पद्धतीवर डॉ. बॅबिट यांचा ग्रंथ वाचून व स्वतः अनुभव घेऊन पण्डित ज्वालाप्रसाद झा ह्यांनीं एक २३ पानांचा ग्रंथ लिहिला आहे. ह्या पद्धतीचा एवढाच एक महत्वाचा ग्रन्थ उपलब्ध आहे. त्या ग्रंथावरून क्रोमोपथी संबंधानें जी माहिती मिळते त्या माहिती वरून हें निरीक्षण लिहिलें आहे. ह्या ~~ग्रंथांतील~~ चिकित्सेचें तत्व पुढील वाक्यावरून समजेल

'The Cause of disease according to the science of chromopathy is the want of a certain Colour in the human system. ~~And the~~ .... On a broad principle there are two principal Colours the red & the blue - Yellow representing the midde point between both. These are the three principle Colours of the Rainbow. Thus we are required to know which colour is wanting in a certain body and how to makeup that Colour to remove the disease. Thus if a man wants red Colour in the system, he would be idle, lazy and sleepy. He would feel loss of appetite, Constipated and so on. If a man wants blue Colour, he would be hot-tempered, active, he would get feverish, may take to purging, and so on. (Page 1)

Blue colour is cooling, soothing, electric and stringent and it is always used in heated conditions of the system, whether local or general. (P. 7)

Red Colour. This colour is heating, non-electric and non-stringent. It is useful in removing dormant conditions of the system. It expands what has been contracted by an undue blue colour. It is the colour ~~It is the colour~~ which can cure partial or total paralysis. It ~~Can Cure Cold inflamations. Local paralysis Can be Cured can be Cured by red light thrown on the diseased part.~~ (page 20-21)

~~अर्थ~~:

Deep blue ~~Colour~~ :— This colour has some of red in it. It may be called Indigo or even purple though purple has more of red than blue. ~~Some~~ diseases require blue colour but at the same time a little of red is necessary. All the diseases of (page 17) not Cancelled

~~the lungs~~ and the bronchial tube require ~~a little red combined with blue. The~~ intestines requires a little excitement ~~to them to~~ enable them to throw the dis~~agreeable~~ matter ~~of the system~~.

~~Orange~~ Yellow — This is the best colour to remove constipation of the bowels. ~~Long treatment is necessary for thoroughly exciting the bowels.~~ To produce sudden heat in them by taking large

doses of this colour would prove injurious and complications may arise; ~~but a slow and steady use of this colour internally is sure to cure constipation of however long standing it may be~~. (page 18)

अर्थः— वर्णचिकित्सेच्या शास्त्राप्रमाणें रोगाचें कारण मनुष्याच्या शरीरांत कोणता तरी ~~रंग~~ वर्ण कमी होणें हेंच होय. स्थूलमानानें मुख्य रंग दोनच आहेत. ते लाल आणि अस्मानी हे होत. पिवळा त्या दोहोंच्या मध्यबिंदूवर आहे. हे इंद्रधनुष्यांतील मुख्य रंग होत. अर्थात कोणत्या ~~[illegible]~~ ~~शरीरांत~~ मनुष्यांत कोणता रंग कमी आहे, आणि रोग नाहींसा करण्याकरितां त्या ~~[illegible]~~ रंगाची भरती कशी करावी हें समजणें जरूर आहे. उदा० कोणत्याही मनुष्याला जर लाल रंगाची जरूरी असेल तर तो आळशी, सुस्त आणि झोपाळू असा ~~[illegible]~~ राहील, त्याची भूक मंद होईल, मलाचा अवष्टंभ होईल आणि अशींच इतरही चिन्हें होतील. जर कोणा मनुष्याला अस्मानी रंगाची जरूरी असेल तर तो रागीट स्वभावाचा, चळवळ्या राहील. त्याला ताप येईल व त्याला हगवण लागेल. आणि अशींच इतर चिन्हें होतील.

अस्मानी रंग हा थंड करणारा, शांत करणारा, वीज उत्पन्न करणारा आकुंचन उत्पन्न करणारा असा आहे. आणि ~~शरीरांत~~ ~~[illegible]~~ शरीरांत [illegible] उत्पन्न करणारे रंग [illegible]

उत्पन्न झालेल्या ~~शारीरिक~~ सार्वत्रिक किंवा स्थानिक उष्ण स्थितीवर त्याचा उपयोग करतात.

लाल रंग हा उष्णता उत्पन्न करणारा, वीज उत्पन्न न करणारा आणि आकुंचन उत्पन्न न करणारा असा आहे. शरीरांतील पांध नाहीसें करण्याकडे त्याचा उपयोग होतो. असमानी रंग अतिशय झाल्यामुळें जे आकुंचित झाले असेल ते हा रंग विस्तृत करतो. ~~अपूर्ण किंवा पूर्ण लकव्याला~~ ~~स्थानिक~~ ~~किंवा~~ ~~पूर्ण किंवा अपूर्ण लकव्याला~~ पूर्ण किंवा अपूर्ण लकवा ह्यानें दुरुस्त होतो.

गहरा असमानी — ह्या रंगांत ~~[illegible]~~ कांहीं लाल रंग असतोच त्यालाच निळा किंवा जांभळा असेंही म्हणतां येईल. तथापि जांभळ्यामध्यें असमानी पेक्षां लाल रंगच जास्त असतो. कांहीं रोगांना असमानी हा रंग लागतो परंतु त्याचवेळीं थोडासा लाल रंगही लागत असतो.

पिवळा :— मलावष्टंभ नाहीसा करण्याला पिवळा हाच रंग उत्तम आहे. — — — —

योग्यमात्रा घेऊन ह्या रंगाच्या ~~[illegible]~~ मलाशयामध्यें एकाएकी उष्णता उत्पन्न केल्यानें नुकसान होईल आणि उपद्रव (अन्य रोग) उत्पन्न होतील

ह्या उताऱ्यावरून व ग्रंथांतील इतर भागांवरून दिसेल कीं, लाल नारिंगी व पिवळा हे उष्णता उत्पन्न करणारे रंग होत. हिरवा व ~~अ~~ असमानी हे थंडी उत्पन्न करणारे रंग होत.

व गांभिका हे अंशतः थंडी व अंशतः उष्णता उत्पन्न करतात. ~~सांम्या~~ उष्णतेनें किंवा थंडीनें ~~[illegible]~~ तंतुमण्डल व रक्ताभिसरणक्रियें ह्यांचें उत्तेजन ~~किंवा बंध~~ होऊन जीवाणूंचें पोषण होईल व ह्या रीतीनें रोग दुरुस्त होईल. ह्या दृष्टीनें पाहिल्यास रोगाच्या चिकित्सेचें सामान्य तत्व व चिकित्सा जी मागें आम्हीं ठरविली आहे त्याला अनुरूप असेंच हें आहे. म्हणजे शरीराच्या निरनिराळ्या भागास लावलेल्या रंगापासून उत्पन्न झालेल्या उष्णतेनें व थंडीनें रोग दुरुस्त होतात ही गोष्ट खरीच आहे. तथापि ह्या चिकित्सेनें रोग नाहींसे होण्यास तिचा समचिकित्सा पध्दतीप्रमाणेंच उपयोग केला पाहिजे. कारण रंगानीं उत्पन्न केलेली उष्णता किंवा थंडी ह्यां~~ना~~वर देखील प्रतिक्रियेच्या नियमाचा अमल आहेच. रंगांचा जो शरीरावर परिणाम होतो तो ते थंडी किंवा उष्णता उत्पन्न करतात म्हणून नव्हे तर रंग स्वतः शक्तिरूप असल्यामुळें ते आपली शक्ति जीवाणूंना देऊन त्यांचा रोग (म्हणजेच त्या त्या विशिष्ट गतींचा जीवाणूंतील अभाव ~~नाहींसा~~ ~~[illegible]~~) हरण करतात असें जर कोणाचें म्हणणें असेल तरी देखील रंगांचा उपयोग समचिकित्सापध्दतीनेंच केला पाहिजे.

कारण रंगांच्या साहाय्यानें जीवनांतील गति वाढविल्यानंतर प्रतिक्रियेनें ती लवकरच कमी होऊन रोग पुनः परत येईल. ह्या शास्त्रांत शरीरावर कोणतीही क्रिया केली असतां त्यानंतर होणाऱ्या प्रतिक्रियेचा ~~[illegible]~~ बिलकुलच — जलचिकित्सेंत केला आहे इतकाही विचार केला नाहीं. म्हणजे वर्णचिकित्सेचा प्रयोग करतांना वर्णाच्या क्रियेनें किंवा त्या नंतर होणाऱ्या प्रतिक्रियेनें किंवा ह्या दोहोंपैकीं इष्ट वाटेल तिनें रोग दुरुस्त करण्याचा प्रयत्न करावा हें कांहींच सांगितलें नाहीं. ~~असल~~ त्यामुळें ह्या शास्त्राप्रमाणें जी चिकित्सा होते ती कधी विपरीत पध्दतीची कधी विपरितार्थकारि पध्दतीची कधीं मिश्रित प्रकाराची अशी असल्यामुळें काकतालियन्यायानें कधीं रोग दुरुस्त होतील व कधीं दुरुस्त होणार नाहींत हें उघड आहे. म्हणून क्रोमोपथीची वास्तविक सिध्दिदायक चिकित्सा करावयाची असल्यास ती समचिकित्सापध्दतीनेंच केली पाहिजे. आणि समचिकित्सा पध्दतीनें ती चिकित्सा बिनचुक करतां यावी म्हणून ~~[illegible]~~ प्रत्येक रंगानें निरोगी मनुष्यांमध्यें कोणतीं कोणतीं चिन्हें उत्पन्न होतात हें सूक्ष्मपणें व पूर्णपणें पाहिलें पाहिजे. परंतु हें काम अजून क्रोमोपथीकांकडून करण्यांत आलेलें नाहीं हा वर्णचिकित्साशास्त्राचा मोठा दोष होय.

वर सांगितलेल्या दोषामुळें वर्णचिकित्सा ॲलोपथीप्रमाणेंच अन्यरोगोत्पादक व केवळ तत्काळ फळ देणारी अशी झालेली आहे. दोन महिने क्रोमोपथीची चिकित्सा

१९८

आलेल्या एका बुद्धिमान बिमाराने अशी हकीकत मला सांगितली कीं, त्याला असलेल्या मलावष्टंभाला औषध दिले असतां मलावष्टंभ नाहींसा होई परंतु अंगांत उष्णता वाटत असे. व उष्णतेकरितां औषध दिल्यास उष्णता कमी होऊन मलावष्टंभ वाटत असे. दुसरी एक बाई बारीक तापानें व इतर विकारांनीं पुष्कळ दिवसापासून बिमार होती. तिला पुढें मूर्छेचा विकार झाला असतां वर्णचिकित्सा सुरू केली गेली. त्या चिकित्सेनें तिची मूर्छा फारच लवकर नाहींशी झाली तेव्हां त्या बाईचा एक हितचिंतक वर्णचिकित्सेची व त्या वर्णचिकित्सकाची मजजवळ फार तारीफ करूं लागला. मी त्याला ~~विचारलें~~ तिचा ताप वाढला कीं काय असें विचारलें. त्यानें होय म्हटलें तेव्हां त्यांतच भय आहे, चिकित्सेनें मूर्छा बसविली परंतु ताप वाढविला असें मी त्याला सांगितलें. पुढें खरोखरच एक दोन दिवसांत त्या बाईचा ताप अतिशय भडकून तिला मृत्यु आला. मी स्वतः इ.स. १९०६ मध्यें मलबद्धतेनें बिमार होतो. तेव्हां माझा ह्या शास्त्रावर फार भरंवसा होता. मी नारिंगी रंगाचें पाणी घेत असे. ते घेतल्यानें ~~अंगांत उष्णता वाढून~~ मलबद्धता नाहींशी होई (मागे पहा) ते घेणें बंद केलें म्हणजे पूर्ववत् स्थिति येत असे. एकंदरीत आठ महिन्यांच्या चिकित्सेनंतर माझी स्थिति पूर्वींपेक्षां जास्तच बिघडली. म्हणून मला ही चिकित्सा सोडावी लागली.

१९८

~~केव्हां केव्हां (~~

~~ज्वर कमी करण्याक्ता~~ एकंदरीत ~~ही चिकित्सा हि~~, समचिकित्सा तत्वानुसार ही चिकित्सा न केली गेली तर एक रोग बसून दुसरा उत्पन्न होणें आणि रोग तात्पुरताच बसून पुनः परत येणें हे दोष ह्या पद्धतींत असतात. (भाग पहा) ह्या संबंधानें येथील प्रसिद्ध वर्णचिकित्सक आणि मानसोपचारचिकित्सक श्री. वनसोळे यांचेंही मत असेंच आहे. येथील दुसरे वर्णचिकित्सक श्री. फडनवीस ह्यांचेही मत असेंच आहे की, ह्या चिकित्सेनें केव्हां केव्हां एक रोग बसून दुसरे रोग उत्पन्न होतात. या विषयीं त्यांचा व माझा श्रीयुत रामभाऊ परांजपे वकील यांचे घरीं झालेला संवाद महत्वाचा आहे व म्हणून तो येथें संक्षिप्तपणें फाजील भाग गाळून दिला आहे.

फडनविस :— ॲलोपथी ~~[illegible]~~ ही सर्व चिकित्सापद्धतीमध्यें श्रेष्ठ आहे.

मी :— काय हो! तुम्हाला तो ~~[illegible]~~ हिस्लॉप कॉलेजमध्यें मुकरजी नांवाचा प्रोफेसर होता तो माहित आहे काय?

फडनविस — होय

मी — तो आम्लपित्तानें (acidity) बिमार होता व त्यानें श्री. खरोंचें औषध (वर्णचिकित्सेचें) सहा महिने घेतलें तरी तो बरा कां झाला नाहीं.

फड० — अहो खरोंच्या मेथडनें (पद्धतीनें) असें होतें माझ्या मेथडनें असें होत नाहीं.

मी — खरोंची व आपली मेथड भिन्न कशी तें

फडनविस:— खेरांच्या मेथडनें रोग बरा झाला तरी इंद्रियांमध्यें Coordination उत्पन्न होत नाही.

मी— Coordination म्हणजे काय तें मला समजावून सांगा.

फडनविस:— म्हणजे इंद्रियें आपली क्रिया बरोबर करीत नाहींत.

मी— याचा अर्थ एक रोग बसतो पण दुसरा उत्पन्न होतो असा समजूं काय?

फडनवीस:— समजा

परांजपे— Oh yes. I now understand why when I was using chromopathy in my family the round of sickness never came to an end; and also why a similar thing happened in your (Fadnis's) family.

अर्थ:— हां! आता मला समजतें! मी जेव्हां आपल्या कुटुंबामध्यें वर्णचिकित्सेचा उपयोग करीत होतो तेव्हां बिमारांचें रहाटगाडगें कधींच थांबत नव्हतें. आणि अहो फडणवीस ~~[illegible]~~ तुमच्याही कुटुंबांत असेंच होत असे. याचें कारण आतां मला समजलें.

मी— अहो फडणवीस तुमची मेथड मला आता सांगा.

फडणवीस— तें माझें Trade secret (व्यापाराचें गुह्य) आहे. तें मी सांगूं शकत नाही.

मी— याबद्दल मला फार वाईट वाटतें. पण मी तुम्हाला एक गोष्ट सांगून ठेवतो. ती मेथड जर तुम्ही उघड करून दाखवाल तर ती Homoeopathy (होमीओपॅथी) हून भिन्न नाहीं असें मी सिद्ध करून देईन.

(मागें पहा)

एकंदरीत असें दिसून येईल कीं, वर्णचिकित्सेचें तत्व निर्दोष नाहीं.

हें निरीक्षण संपविण्यापूर्वीं वर्णचिकित्सकांना एक सूचना करणें वावगें होणार नाहीं. ही चिकित्सा करतांना ते निरनिराळ्या रंगांच्या ज्या शीशा किंवा कांच वापरतात त्यांचा रंग शास्त्रीय पध्दतीनें ठरवित नाहींत असें मला दिसून आहे. कोणत्याही कांचाचा रंग ठरविण्याकरितां त्या कांचांतून सूर्याचे किरण घेऊन त्यांचे लोलकानें (Prism) पृथक्करण करावें. प्रत्यक्ष सूर्याच्या किरणांचेही दुसऱ्या एखाद्या लोलकानें पृथक्करण करावें. ह्या दोन्हीं पृथक्कृत वर्णचित्रांच्या तुलनेनें कांचेचा रंग साधा किंवा मिश्रित आहे कीं, काय व साधा असल्यास कोणता आणि मिश्रित असल्यास कोणत्या वर्णांचे मिश्रण त्या कांचाच्या वर्णांत आहे हें शास्त्रीयरीत्या नक्की ठरवितां येते. ह्या रीतीचा उपयोग करून जर वर्णचिकित्सक चिकित्सा करतील तर आपण अमक्याच वर्णानें चिकित्सा करतो हें त्यांना निश्चितपणें सांगतां येईल. असें न केल्यास त्यांच्या शास्त्रांत घोटाळा नेहमीं कायम राहील.

ह्या चिकित्सेंतील औषधें सुखप्राप्य आहेत व ह्या चिकित्सेंत जलचिकित्सेइतका (Hydropathy) त्रासही नाहीं, हें खरें आहे. तथापि ह्या औषधांचा चांगला उपयोग करून घ्यावयाचा असल्यास निरनिराळ्या वर्णांची सिद्धिचिन्हें ठरवून त्यांचा समचिकित्सापध्दतीनें उपयोग करावा हें पुनः सवडा सुचवून हें वर्णचिकित्सा निरीक्षण संपवितो.

—×—

(Electropathy) विद्युत चिकित्सा निरीक्षण

जल चिकित्सा आणि वर्णचिकित्सा ह्या उष्णतेवर अवलंबून आहेत. उष्णता ही एकप्रकारची गतिच आहे. आणि विद्युत ही एकप्रकारची गतीचें आहे. म्हणून आता विद्युत चिकित्सेचा विचार करूं.

1 विद्युत ही तीन प्रकारची आहे. गॅल्व्हानिक किंवा रासायनिक किंवा अविच्छिन्न विद्युत फॅरॅडिक किंवा विच्छिन्नप्रवाह ~~विद्युतांतरित~~ विद्युत आणि तिसरी स्टॅटिक किंवा घर्षणजन्य विद्युत. या तिन्हीं प्रकारच्या विजांचा रोगहरणाकडे उपयोग केला जातो. विद्युत चिकित्सेचें सामान्य तत्व पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. "The latest and most plausible theory regarding electricity is, that it is a mode of motion or other manifestation of a very exceptional form of matter called ether." (Electro therapeutical practice page 7 by Chas. S. Neiswangi M.D.)

Althaus gives excellent reasons for believing that the work of the brain cell is of an electrical nature ~~and compares the axons to conductors and their myeline sheaths as insulators, so that there is isolated conduction among the whole of fully matured nerve fibres, up to the point where they reach the peripheral or central terminations of the sensory organs or the muscles; where the myline sheath disappears and the axons become nacked, allowing of the free transmission of the current. Thus the axons of the neuron resemble the conducting cords of the battery.~~ - - - - - - - - - -

In health the nerves are all in a state of vibrations, due, in all probability, to the currents of electricity which traverse the body in every direction, and when a nerve loses its vibratory action its function is destroyed and degeneration commences. (page 8-9)

~~But~~ when we come to consider the fact that all animal and vegetable life is not only due to but dependent upon the electrical conditions that surround and are within them, is it not reasonable to suppose that we should be able to restore the equilibrium of the body (health) by supplying electricity from some outside source?
(page 8)

अर्थः— विजेसंबंधीं अगदीं आलीकडला आणि सर्वांस पसंत पडण्याजोगा सिध्दान्त असा आहे कीं, ईथर (आकाशतत्व) ह्या नांवाच्या विलक्षण पदार्थाची विज ही एक गति किंवा ~~अ~~ गतीसारखीच दुसरी कांहीं तरी विकृति आहे. मेंदूतील जीवाणूंचे काम देखील विजेच्याच स्वरूपाचें आहे असें मानण्यास कांहीं उत्तम प्रमाणें ऑल्थसनें दिलीं आहेत. - - - - - - - . निरोगी स्थितीमध्यें शरीरांतील ~~[illegible]~~ तंतूमध्यें कंपन चालू असतें. बहुतकरून त्यांचें कारण शरीरांत चोंहीकडे चालू असलेले विजेचे प्रवाह हेंच होत. आणि जेव्हां ~~[illegible]~~ तंतूचें कंपन नाहींसें होतें तेव्हां ~~[illegible]~~ तंतूची शक्ति नाहींशी होऊन विकार सुरू होतो. पशू आणि वनस्पति ह्यांतील जीवक्रिया त्यांत आणि त्यांभोंवती असलेल्या विजेमुळें होतात व विजेवरच

अवलंबून असतात असें जेव्हां आपणास दिसून येते तेव्हां शरीरास ^बाहेरून विद्युत् ~~बाहेर~~ पुरविल्यानें रोगग्रस्त शरीर पूर्वस्थितीवर आणतां येईल असें मानणें समंजस नाहीं अवा

ह्या उताऱ्यांवरून दिसून येईल कीं, मज्जातंतु-मंडळांत विजेचे प्रवाह चालू असतात ते प्रवाह नाहींसे झाल्यानें रोग उत्पन्न होतो आणि ते प्रवाह बाहेरून आंत घातल्यानें रोग बसतो असें ^विद्युत्~~[illegible]~~चिकित्सा शास्त्राचें मत दिसतें. विज म्हणजे मज्जातंतूंची विशिष्ट कंपनात्मक गति. ती नाहींशी झाली असतां बाहेरून विजेच्या सहाय्यानें मज्जातंतू~~ंनी~~ मध्यें ती गति उत्पन्न केल्यानें रोग नाहींसा होईल असा ह्या शास्त्राचा मतलब आहे.

आतां तिन्ही प्रकारच्या विजांचें शरीरावर जें विशिष्ट कार्य होतें त्याबद्दल माहिती सांगतो. ~~[illegible]~~

(१) रासायनिक विद्युत— 'While the positive pole will alleviate an inflamatory condition, a negative application will produce a state Simulating inflamation. (Page 31)

अर्थ:— विजेचा धन ध्रुव दाह शांत करतो व ऋण ध्रुव दाहसारखी स्थिति उत्पन्न करतो.

(२) फॅरॅडिक ~~किंवा विद्युत प्रवाह प्रेरित विद्युत्~~ किंवा विच्छिन्न ^प्रवाह विद्युत् ~~प्रवाह~~— या प्रकार~~च्या~~ विजें-तही प्रेरित विद्युत् प्रवाह आणि प्रेरक* विद्युत्प्रवाह असे दोन प्रकार आहेत. ह्यांच्या क्रियेविषयीं पुढील उतारा पहा. " The difference in the action of the two poles is not nearly so marked as in the Galvanic Current, though the positive is more Sedative and the negative more stemulating. The primary

* (हा रासायनिक
विद्युत् प्रवाहच असतो)
विद्युत

or inducing Current is more useful in stimulating muscular Contraction where sedation is not important; the secondary, or induced Current, is more useful where sedation is called for.

(Gynecology By James C. Wood A.M.; M.D.)
page 159.

अर्थ— रासायनिक विजेच्या दोन ध्रुवांच्या परिणाम जसा अगदीं परस्पर विरुध्द असतो (स्पष्टपणें दिसतो) तसा ह्या विजेच्या ध्रुवांचा नसतो (स्पष्टपणें दिसत नाहीं). तथापि ऋणध्रुव जास्त उत्तेजक आणि धनध्रुव शामक (रणारा) आहे. प्रेरकप्रवाह जेव्हा ~~जेथें~~ शमन ~~करण्याची~~ करणें महत्वाचें नसतें तेव्हां ~~तेव्हां~~ स्नायूंचें आकुंचन उत्तेजित करण्या~~च्या~~ ~~ला~~ अधिक उपयोगाचा आहे. प्रेरितप्रवाह शमन करण्याची जरूर असते तेव्हां अधिक उपयोगाचा आहे.

The effects of the faradic current depend also upon the frequency of the interruptions—interruptions of high frequency acting as a high sedative, whereas slow interruptions contract and relax muscular tissue. ~~The general or systematic effects~~ (page 159)
Gynecology By J.C. Wood.

अर्थः— ह्या विजेचे परिणाम विच्छेदाच्या प्रमाणावर अवलंबून आहे. विच्छेदांचें प्रमाण फारच जास्त असल्यास ही विज शामक परिणाम करते आणि विच्छेदांचें मान कमी असल्यास स्नायू आकुंचित होऊन ढिले होतात

(3) स्टॅटिक् किंवा ~~[illegible]~~ घर्षणजन्य विद्युत

Every time a spark passes between the prime Conductors of a static machine oscillations are set up, sometimes many millions per second, and these Vibrations, when the patient is included in the circuit, are conveyed to the nerves.

~~In a former chapter we noted the fact that~~ In health the nerves are all in a state of Vibration, and when they lose their Vibratory action their function is des~~troyed~~ troyed and degenerative changes Commence.

Cancelled.

~~A very simple illustration will serve to show how static electricity does its work and why it is especially adapted for the treatment of disturbances of the nervous system.~~

The nerves in normal Condition Vibrate differently, and each one will respond only to the Vibration that suits it; so, when the function of a nerve is destroyed, it becomes necessary to bring it within the range or subject it to a rate of Vibration equal to its own.

In static electricity we have a wide range of Vibration, from a few up to many millions per second; and as long as the patient Comes within this area of oscillation each nerve is taking the Vibration which suits it, which would account, in a measure, for the almost magical results we sometimes have in Certain forms of

Neuralgia, migraine etc. (page 60 – 61)

अर्थः— घर्षण विद्युत् यंत्रांच्या मुख्य वाहकामध्यें विजेची ठिणगी जेव्हां जेव्हां उत्पन्न होते तेव्हां तेव्हां कंपन सुरू होतें. ते कंपन कधीं कधीं एका सेकंदांत विसेक दशलक्ष होतें. हे कंपन विजेच्या ~~मार्गांमध्यें~~ मंडलांत बिमारही असला तर त्याच्या तंतूनाही प्राप्त होतें.

आरोग्यावस्थेमध्यें सर्वच तंतू कंपनात्मक स्थितींत असतात. आणि जेव्हां त्यांचें कंपन नाहीसें होतें तेव्हा त्यांची कार्यशक्ति नाहीशी होते आणि विकृति सुरू होते. आरोग्यावस्थेंत तंतु निरनिराळ्या प्रकारानें (वेगानें) कंपित असतात. आणि ज्या तंतूला ~~जी कंपनसंख्या~~ ज्या प्रकारचें कंपन मानवतें त्या प्रकारचेंच कंपन तो स्वीकारतो किंवा ग्रहण करतो आणि म्हणून जेव्हां कोणत्याही तंतूची कार्यशक्ति नाहीशी होते तेव्हां त्याच्या कंपनाचा जितका वेग असेल तितक्याच वेगाच्या कंपनाचा त्यावर प्रयोग करणें जरूर आहे.

घर्षण जन्य विजेच्या कंपनांच्या प्रकारांची मर्यादा फार मोठी आहे. म्हणजे हें कंपन एका सेकंदास फार थोड्या दशलक्षांपासून उच्चक दशलक्षांपर्यंत होतें. आणि जोपर्यंत बिमार हा मर्यादेच्या आंतमध्येंच असतो तोपर्यंत त्याचा प्रत्येक तंतू त्याला ज्या प्रकारचें कंपन मानवतें त्या प्रकारचें कंपन स्वीकारतो. आणि ह्या रीतीनें तंतुशूल, शिरःशूळ वगैरे रोगामध्यें जादूसारखा जो परिणाम दिसून येतो त्याची कांहींशी उपपत्ति लागते.

Conclusion

In Conclusion and briefly, static electricity is an equalizer of the nervous forces, hastens the elimination of waste products, such as urea, Carbon dioxide etc, and causes a dilatation of the Cutaneous Vessels. (P. 64)

अर्थ:— थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे घर्षण विद्युत् ही ~~[illegible]~~ तंतूंची विकृत शक्ति पूर्वस्थितीवर आणते. मूत्रसत्व कार्बोनिक ऑसिड वायु यांच्या उत्सर्जनाला प्रोत्साहन करते आणि त्वचेंतील रक्तवाहिन्याला विस्तृत करते.

I have observed also remarkable improvement in disturbed Visceral function (such ~~e.g.~~ as dyspepsia, habitual constipation, diabetes, Vertigo, Asthma etc.) after the use of static insulation for from ten to twenty minutes at a sitting. (Wood's Gynecology Gyn~~aeco~~cology page 165)

अर्थ:— आंतरेंद्रियांचीक्रिया बिघडली असतां म्हणजे ~~अग्नि~~ अपचन, मलावष्टंभ, मधुमेह, चक्कर, श्वास वगैरे रोगांत घर्षणजन्य विजेच्या ~~दर~~ प्रत्येक वेळीस दहा वीस मिनिटें प्रयोग ~~[illegible]~~ केल्यानें त्यांत भरण्याइतका फायदा झाल्याचें मला दिसून आलें आहे.

भाग १० वा समाप्त

११ वा सुरू

पृ. १८९०

ह्या इतक्या उताऱ्यांवरून मज्जातंतूंची कंपनात्मक गति नाहींशी होणें म्हणजेच रोग व ती गति तीनपैकीं कोणत्यातरी ~~वि~~ एका विजेचा शरीरावर प्रयोग करून ती गति रोगग्रस्त तंतुमंडळास ~~मज्जामंडळास~~ मिळवून देणें हेंच चिकित्सा हें ह्या शास्त्राचें रहस्य दिसतें. परंतु ~~मज्जा~~ तंतुमंडळांत ही कंपनात्मक गति कशी उत्पन्न होते ह्याचा विचार केल्यास रोगाचें हें स्वरूप व ही चिकित्सा कितपत खरी आहे हें दिसून येईल.

~~मेंदूतील~~ रासायनिक विद्युत् उत्पन्न करण्याकरितां ज्याप्रमाणें निरनिराळ्या पदार्थांनीं भरलेली बॅटरी (घट) ~~पाहिजे~~ व बॅटरीच्या दोन टोकांना जोडणाऱ्या तारा असतात

~~१३०~~ १६८

(त्याचप्रमाणें शरीरांतही मेंदूमध्यें पुष्कळ जीवाणू (cells) असून त्यांच्यापासून शरीराच्या प्रत्येक भागास तंतुरूपी तारा पसरलेल्या असतात. बॅटरीमध्यें रासायनिक क्रिया सुरू झाली म्हणजे तारांमधून वीज वाहूं लागते. त्याप्रमाणेंच मेंदूंतील जीवाणूमध्यें रासायनिक किंवा त्यासारखीच दुसरी कोणतीतरी क्रिया झाल्यानेंच तंतूमध्यें कंपनात्मक गति उत्पन्न होते हें निर्विवाद आहे. बॅटरींतील रासायनिक क्रिया ~~उत्पन्न~~ होण्यास ज्याप्रमाणें निरनिराळे पदार्थ लागतात त्याप्रमाणेंच मेंदूंतील जीवाणूंमध्यें तंतुमंडळांत कंपन उत्पन्न करणारी जी क्रिया होते ती क्रिया होण्यासही मेंदूंतील जीवाणूंतही अवश्य ते निरनिराळे पदार्थ अवश्य त्या प्रमाणांत असले पाहिजे हें उघड आहे. एकंदरीत तंतुमंडळांतील कंपन मेंदूंतील जीवाणूमधील पदार्थांवर अवलंबून असल्यामुळें तंतुमंडळांतील कंपनाच्या अभावाचें कारण मेंदूच्या जीवाणूंतील घटकद्रव्याचा अभाव हेंच ठरते आणि हेंच रोगाचें खरें स्वरूप होय. म्हणून रोगाची वास्तविक चिकित्सा जीवाणूंना त्यांचें घटकद्रव्य कोण्यातरी रीतीनें पोहोंचविणें हीच होय. म्हणून रोग व चि~~आतां~~कित्सा याबद्दल या चिकित्सापद्धतीचें जें रहस्य आहे तें मान्य होण्याजोगें नाहीं.

आतां विजेनें तंतुमंडळां~~ना~~ला उत्तेजित करून आम्हीं पुढें दाखविल्याप्रमाणें शरीरांतीलच शारीरिक घटकद्रव्याचें सद्गुणीकरण करतां येईल व अशारीतीनें रोग

हे दर्शवितां येईल, हे खरें. तथापि हें कार्य करतांना ~~सम~~ ~~चिकित्सा~~ शरीरावर केलेल्या कोणत्याहि क्रियेनंतर प्रतिक्रिया होते ह्या नियमाला व ह्या नियमावरच अवलंबून असलेल्या समांचे कि सांतत्वाला सोडतां येत नाही हें पुढील उता-याबरून दिसून येईल.

(page 187) ✱ See the reverse.

We ~~record ver~~ - - - - - - - - - ~~recall~~ very vividly one case, that of a man who fell from a street car and injured the nerve that supplies the ~~left~~ internal ~~recato~~ the muscle of the eye. In consequence of this injury he had diplopia or double vision. When we held up a ball before him, before the machine was in action he always saw two balls. - - - - - - - - Then when the machine was started he would after five or ten minutes see only one ball. The ~~reason for this was~~

~~Page 187~~

page 188 ~~If~~ As soon as the machine was stopped he again ~~saw~~ two balls.

~~Static~~ electricity is an equalizer of nervous forces. It will temporarily reduce a high temperature or it will elevate a low or sub-normal temperature. ~~It will reduce a high pulse or raise a low pulse~~

~~उर्फ~~ ____ ~~If a nerve~~

*If a nerve is not Vibrating normally, it will choose its Vibratory tone from the Currents generated by the Static machine and Vibrate in a normal way. Every nerve in the body is taking the Vibrations which are peculiar to it and they are normal for the time being. *(Page 187)

underlining is ours

(Conti-nue — We recall he after this)

अर्थः— जर एखादा ~~[illegible]~~ तंतू ~~स्वाभाविक प्रकारानें~~ योग्य तऱ्हेनें कांपत नसेल तर घर्षणजन्य विजेच्या यंत्रानें उत्पन्न केलेल्या प्रवाहांपैकीं, आपणांस योग्य ती कंपनात्मक गति तो निवडून घेईल आणि योग्य रीतीनें कांपूं लागेल. शरीरांतील प्रत्येक ~~[illegible]~~ तंतू त्याला त्याला अवश्य तें कंपन स्वीकारून तितक्या वेळापुरतो (यंत्र चालूं असतें तोंपर्यंतच) योग्य रीतीनें कांपूं लागतो.

